● पुणे, शनिवार, २० जुलै २०२४ ● RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 222 ● वर्ष ३ रे, अंक २२२ ● किंमत ₹ ६ ● पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS




आरटीई : एक किमीची सक्ती रद्द उच्च न्यायालय म्हणते : विद्यार्थ्यांबाबत असा निर्णय घटनाबाह्य P3



स्वच्छंद'च्या गिर्यारोहकांची 'माऊंट पोलोगोंगका' शिखरावर यशस्वी चढाई P12

## दहा जणांची फायर ब्रँड टीम तैनात

# भाजपचे प्रतिआक्रमण!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने केलेल्या आक्रमक प्रचाराला जशास तसे उत्तर देण्यासाठी भाजपने बचावात्मक पवित्रा सोडून देण्याचा निश्चय केला आहे. पुण्यात रविवारी, २१ जुलैला होणाऱ्या राज्य अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रदेश नेते सक्रिय झाले आहेत. लोकसभेला महाविकास आघाडीने संविधानाला धोका, आरक्षण, गुंतवणुकीत अपयश अशा मुद्द्यांवर भाजप व महायुतीतील शिंदे गट व अजित पवार गटाला घेरले होते. त्यामुळे वेळीच सावध होत भाजपने रोज सकाळ-संध्याकाळ विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देण्यासाठी दहा जणांची फायर ब्रँड टीम तैनात केली आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या नेत्यांच्या नावांची घोषणा केली आहे. रोज सकाळी नऊ वाजता प्रतिक्रिया देण्यासाठी नवनिर्वाचित आमदार पंकजा मुंडे, मुंबई शहराध्यक्ष आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांना नेमण्यात आले आहे. तर संध्याकाळी चार वाजता राज्याचे मंत्री सुधीर मुनगंटीवार व गिरीश महाजन, माधव भंडारी, अजित चव्हाण, अतुल भातखळकर आणि राम कदम हे सहा नेते प्रतिक्रिया देणार आहेत.

विभागवार बोलण्यासाठीही भाजपने २० नेत्यांच्या तगड्या टीमची घोषणा केली आहे. भाजपच्या विभागीय टीममध्ये केंद्रीय नागरी हवाई वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भारती पवार यांचा समावेश आहे.

**ना. मोहोळांचा समावेश**

● केवळ राज्य पातळीचा विचार न करता राज्यातील प्रत्येक विभागातील प्रभावशाली नेत्यांवर पक्षाचे धोरण आक्रमकरीत्या मांडण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पुण्याचे खासदार व केंद्रीय सहकार, नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री ना. मुरलीधर मोहोळ यांचा त्यात प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत बसलेला फटका लक्षात घेता विधानसभेला पक्षाने जास्तीत जास्त म्हणजे १७०ते १८० जागा लढवाव्यात, असा आग्रह पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी धरला आहे. महाराष्ट्र प्रभारी, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, केंद्रीय मंत्री आश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली भाजपच्या कोअर कमिटीची बैठक मुंबईत झाली. तीत पक्ष पदाधिकाऱ्यांनी ही भावना मांडली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेसाठी १०० जागांची मागणी भाजपकडे केली आहे. मात्र, शिंदे गटाची ही मागणी मान्य केली तर गेल्या निवडणुकीपेक्षा कमी जागा भाजपला लढाव्या लागतील. त्यामुळे १७० - १८० जागांपेक्षा कमी जागा भाजपने लढू नये, असा आग्रह स्थानिक भाजप नेत्यांनी धरला. पुण्यात होणाऱ्या एक दिवसीय संमेलनाच्या आधी भाजप विधानसभेच्या किती जागा लढेल हे निश्चित होईल.

## क्राऊडस्ट्राइक अपडेटमुळे मायक्रोसॉफ्टची सेवा ठप्पः

■ जगभरात 1400 फ्लाइट कॅन्सल; बँक, स्टॉक मार्केट व टीव्ही चॅनलवरही परिणाम

■ जगभरातील अनेक वापरकर्त्यांच्या विंडोवर दिसली निळी स्क्रीन

■ बॅकएंड वर्कलोडच्या कॉन्फिगरेशनमध्ये बदल झाल्याने समस्या




» सविस्तर वृत्त 11 वर

## अंत्यविधीस गेलेल्यांना ट्रकने चिरडले; ४ ठार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**आळेफाटा :** नगर-कल्याण महामार्गावर गुळंचवाडी येथे अंत्यसंस्कार उरकून घरी निघालेल्या जमावात भरधाव वेगाने येणारा दहा टायरचा ट्रक शिरल्याने तिघांचा घटनास्थळीच तर एकाचा उपचारादरम्यान अशा चार जणाचा मृत्यू झाला. दहा जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेने संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली. मृतांच्या कुटुंबांना योग्य न्याय देण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी रस्ता रोखून धरला होता.

शुक्रवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास हा अपघात झाला. घटनास्थळी आळेफाटा पोलिसांनी धाव घेत जखमींना पुढील उपचारासाठी हलवले. मृतांमध्ये एका लहानग्या मुलाचादेखील समावेश आहे. दत्तात्रय लक्ष्मण गोसावी (वय ६०), शितल योगेश दाते (वय २७, रा. आणे) श्रीयांश योगेश दाते (वय ६) व नंदाराम पाटीलबुवा भांबीरे » पान ११ वर

## उलटी गणती सुरू

## पूजावर यूपीएससीचा गुन्हा

**नवी दिल्ली:** वादग्रस्त शिकाऊ सनदी अधिकारी पूजा



खेडकर यांची विविध पातळ्यांवर चौकशी सुरू असतानाच आता थेट केंद्रीय लोकसेवा आयोगाने त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. तसेच, त्यांना तुमची आयएएसची निवड रद्द का करू नये, अशी नोटीस पाठवली आहे.

यूपीएससीने नागरी सेवा परीक्षा - २०२२ च्या तात्पुरत्या शिफारस केलेल्या उमेदवार पूजा मनोरमा दिलीप खेडकर यांच्या गैरवर्तनाचा तपशीलवार आणि सखोल तपास केला. या तपासणीतून त्यांनी यूपीएससी परीक्षा नियमांनुसार दिली नाही हे दिसून आले. आपले नाव, वडिलांचे आणि आईचे नाव, फोटो व स्वाक्षरी, ईमेल आयडी, मोबाईल नंबर आणि पत्ता बदलून खोटी ओळख निर्माण करत फसवणूक केली, असे नोटीसमध्ये म्हटले आह. त्या आधारावर यूपीएससीने पोलिसांत एफआयआर दाखल केला आहे.

थेट लोकसेवा आयोगाने कारवाई सुरू केल्यामुळे पूजा खेडकर यांची आयएएस म्हणून झालेली निवड रद्द होण्याची शक्यता आहे. **(अधिक वृत्त पान ३ वर)**

## तुतारी नव्हे ट्रम्पेट; राष्ट्रवादीची मागणी मान्य

**नवी दिल्ली:** लोकसभा निवडणुकीमध्ये शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला तुतारी अर्थात ट्रम्पेट या चिन्हाचा जोरदार फटका बसल्यानंतर शुक्रवारी निवडणूक आयोगाने या पक्षाला थोडासा दिलासा दिला. मराठीत या चिन्हाचा उल्लेख तुतारीऐवजी ट्रम्पेट असाच ठेवावा ही पक्षाची मागणी निवडणूक आयोगाने मान्य केली आहे. राज्यात काही मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी पवार गटाचे चिन्ह असलेले तुतारी वाजवणारा माणूस व तुतारी (ट्रम्पेट) यावरून मतदारांचा गोंधळ उडाल्याने पवार गटाला मिळणारी मते दुसऱ्याच उमेदवाराला मिळाल्याचे बोलले जात होते. विशेषत:, सातारा, दिंडोरी अशा मतदारसंघांमध्ये या चिन्हाचा फटका पवार गटाच्या उमेदवारांना बसला होता. दिंडोरीत पक्षाचे भास्कर भगरे विजयी झाले; मात्र साताऱ्यात पक्षाच्या शशिकांत कदम यांना भाजपचे » पान ११ वर

## सेना नेते वसंत मोरे यांना फोनवरून खुनाची धमकी

**पुणे :** उद्धव ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे आणि त्यांच्या भाच्याला खुनाची धमकी देण्यात आली आहे. अज्ञात व्यक्तीकडून त्यांना फोनवर धमकी देण्यात आली. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. याची एक ऑडिओ क्लिपही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. येत्या एक तारखेच्या आधी मी वसंत मोरेचा खून करणार, असे म्हणत संबंधित व्यक्ती शिव्या देऊ लागते. सद्यस्थितीत सुरू असलेल्या घटना लक्षात घेता ही गोष्ट गांभीर्याने घेणे महत्त्वाचे वाटले म्हणून फोन करून धमकी देणाऱ्या सदर व्यक्तीचा शोध घ्यावा, अशी मागणी वसंत मोरे यांनी केली आहे.

## छत्रपतींची वाघनखे साताऱ्यात प्रदर्शनार्थ

**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाघनखांच्या प्रदर्शनाचा भव्य उद्घाटन सोहळा थाटामाटात संपन्न झाला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

साताऱ्यातील वस्तू संग्रहालयात ही वाघनखे प्रदर्शनासाठी ठेवली आहेत. संबंधित वाघनखे शिवाजी महाराजांची नाहीत, असा दावा विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून केला जात आहे. या मुद्द्यावरून फडणवीस यांनी निशाणा साधला. ते म्हणाले, 'आपल्या देशामध्ये काही लोकांना उठसूट प्रत्येक गोष्टीत काही ना काही विवाद निर्माण करायची सवय जडली आहे. हा रोग आजचा नाही.

SINHGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY -PUNE
तमसो मा ज्योतिर्गमय

Sinhgad Institutes

SINHGAD INSTITUTES

Pune | Mumbai | Solapur (Maharashtra, India)

Accredited by NAAC

SINHGAD MANAGEMENT INSTITUTES

All the following institutes are Approved by AICTE; Recognized by Government of Maharashtra & Affiliated to Savitribai Phule Pune University

**Sinhgad Management Institutes**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041
Phone : 020 - 24358360
MBA > DTE Code: MB 6113 MCA > DTE Code: MC 6231
Director : MBA: Dr. (Mrs.) Prachi Padgaonkar [096203 35006]
Director : MCA : Dr. (Ms.) Chandrani Singh [08805010746]

**SKN Sinhgad School of Business Management**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041
Phone : 020 - 24354036
MBA > DTE Code: MB 6741
Director : Dr. (Mrs.) Priya Agashe [08975769599]

**Sinhgad Institute of Management and Computer Application**
Narhe Gaon, Via Dhayari, Off Sinhgad Road, Pune - 411 041
Phone : 020 - 66831896 / 907
MBA > DTE Code: MB 6131 MCA > DTE Code: MC 6239
Director: MBA : Dr. Vijaya Puranik [09657725091]
I/c Director : MCA : Dr. Vijaya Puranik [09657725091]

**Sinhgad Institute of Business Administration and Research**
Kondhwa (Bk), Kondhwa - Saswad Road, Pune - 411048
Phone : 020 - 67571101 / 02
MBA > DTE Code: MB 6132 MCA > DTE Code: MC 6236
Director : MBA : Dr. Dhananjay Mandlik [09623448939]
Director: MCA: Dr. (Mrs.) Netra Patil [09527012626]

**Sinhgad Institute of Business Administration and Computer Application**
Kusgaon (Bk), Off Mumbai-Pune Expressway, Lonavala, Maval, Dist. Pune - 410401
Phone : 02114 - 673306 / 07 / 08
MBA > DTE Code: MB 6205
Director : Dr. Vidya Nakhate [09881476714]

**Sinhgad Business School**
Erandwane, Smt. Khilare Marg, Off. Karve Road, Pune - 411004
Phone : 020 - 25434314 / 25431001
MBA > DTE Code: MB 6136
Director : Dr. Bharati Kumar [07391041482]

NBN Sinhgad Technical Institutes Campus
**NBN Sinhgad School of Management Studies**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041
Phone: 020 - 24355041 / 42
MBA > DTE Code: MB 6772
I/c HoD : Dr. Prakash Pise [07030209772]

RMD Sinhgad Technical Institutes Campus
**RMD Sinhgad School of Management Studies**
Warje, Pune-Mumbai Bypass Highway, Pune - 411058
Phone: 020 - 29996611 / 22 / 33
MBA > DTE Code: MB 6769
Dean : Dr. Swati Vijay [09607162777]

**Sinhgad College of Engineering**
(MBA Department)
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041
Phone : 020 - 24354705
MBA > DTE Code: MB 6177
HoD : Dr. Mamta Mishra [09371636797]

**Smt. Kashibai Navale College of Engineering**
(MBA Department)
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041
Phone : 020 - 24354938
MBA > DTE Code: MB 6178
HoD : Dr. Sachin Wankhede [07030209763]

Shrinath Shikshan Prasarak Mandal's
**RMD Sinhgad Management School**
Gat No. 37/1, 37/2, Kondhapuri, Tal: Shirur, Dist: Pune - 412209
Phone : 08669912747 / 48
MBA > DTE Code: MB 6127
Director : Dr. Dinesh Doke [09011033358]

| 230+ | 60+ | 5200+ | 2400+ | 300+ | 700+ | 500+ | 5000+ | 13 LAKH+ | 70% | 1250+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Total No. of Faculty | Ph. D. Faculty | Total No. of Students | No. of Publications | Start-ups | Alumni Entrepreneurs | Companies Visted | Internships Offered | Highest Package Offered | Campus Placements | Research Projects |

**Eligibility :** Graduation with at least 50% marks in aggregate or equivalent (45% for Reserved Category, Economically Weaker Section & Person with Physical Disability from Maharashtra State only) from any University recognized by University Grants Commission or Association of Indian University in any discipline & obtained a non-zero score in MAH-MBA-CET 2024 / CAT / CMAT / XAT / ATMA / MAT or GMAT.

**Note :** Sinhgad Institutes has not authorized any person / Agency / Organization / Association / Representative for admissions to the courses conducted by all institutes under Sinhgad Technical Education Society. The candidates are advised to remain in touch with the Institute's Director / Principal / HoD / Dean / Authorized College Staff only.

19/15, Erandwane, Smt. Khilare Marg, Off. Karve Road, Pune - 411004 Phone: 020 25431001 / 073500 07033 | Email: admissions@sinhgad.edu

*Subject to Pune Jurisdiction only

www.sinhgad.edu

Prof. M. N. Navale
Founder President

## गुगलसोबत करार; मुख्य ३२ रस्त्यांवरील चौकांमध्ये राबविणार

# वाहतुक सुधारणेसाठी अभिनव योजना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शहरातील मुख्य रस्त्यांवर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे वाहतुकीची गती संथ होते. त्याचा ताण शहरातील अंतर्गत रस्त्यांवर येतो. मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीचा वेग वाढविण्यासाठी चौकांमध्ये सुधारणा, अद्ययावत सिग्नल यंत्रणा, पार्किंग व्यवस्थापन, गतिरोधक, रस्त्यांची रचना, रस्त्यांवरील अतिक्रमण काढणे, वाहतूक नियंत्रणाची साधने बसविणे, मिसिंग लिंक्स पूर्ण करणे, पाणी साठणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती, नो-हॉकर्स झोन, रस्त्यांवरील अडथळा आणणाऱ्या आस्थापनांवर कारवाई अशा उपाययोजना करण्यात येणार आहेत.

वाहतूक कोंडीतून दिलासा मिळावा, यासाठी वाहतूक शाखा आणि महापालिका यांच्या समन्वयातून शहरातील प्रमुख ३२ रस्त्यांवरील चौकांमध्ये वाहतुकीत सुधारणा करण्यासाठी अभिनव योजना राबविण्यात येणार आहे. तसेच गुगलसमवेत करार करून वाहतुकीसाठी स्वतंत्र मोबाईल ॲप तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील आणि महापालिकेचे मुख्य अभियंता (पक्ष विभाग) अनिरुद्ध पावसकर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

शहर वाहतूक शाखा आणि महापालिकेकडून स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्यात येणार आहे. त्याद्वारे मुख्य रस्त्यांवरील सुधारणा व नियोजन करण्यात येणार आहे. भविष्यात या ॲपद्वारे नागरिकांच्या समस्यांचे निराकरण आणि नियोजन आहे.

शहरातील पार्किंग व्यवस्था, वाहतूक कोंडी, वाहतुकीत बदलांबाबत सूचना, बस थांबे, ऑटो स्टँड, पीएमपी थांबे आवश्यक माहिती मिळण्यासाठी शहर वाहतूक शाखेकडून गुगलसमवेत करार महत्वाचा ठरणार आहे. मानवी व अभियांत्रिकी चुकांमुळे अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत. जखमींना उपचार मिळण्यासाठी लागलेल्या कालावधीबाबत विश्लेषण करण्यासाठी सेव्ह लाइफ फाउंडेशनची मदत घेण्यात येत आहे, असे अतिरिक्त आयुक्त पाटील यांनी सांगितले.

या अभिनव योजनेमुळे पुणे शहरातील नागरिकांचे वाहतूक कोंडीतून पुणेकरांची लवकरच सुटका होणार आहे. पुण्यातील वाहतूक कोडीं कमी करणे आणि वाहतुकीचा वेळ कमी करण्यासाठी उपाय होणार आहे.

पुणे शहरातील मुख्य रस्त्यांना प्राधान्यक्रम देवून त्याची क्षमता वाढवण्यात येणार आहे. यामुळे वाहन चालकांचा मुख्य रस्त्यांवरुन जाण्याचा कल वाढेल. परिणामी रहिवाशी रस्ते, व्यापारी रस्ते यावरील ताण कमी हाईल. मुख्य रस्त्यावरुन वाहनांना एका सरासरी वेगाने जाता आले तर त्या रस्त्याची कॅरींग कपॅसिटी वाढते. म्हणजे वाहनांची संख्या वाढेल आणि जर सरासरी वेगापेक्षा कमी किंवा जास्त वेगाने वाहने गेली तर रस्त्यावर जाणाऱ्या वाहनांची संख्या घटते, हा फॉर्म्युला लक्षात घेऊन उपाय करण्यात येणार आहे.

### उपाययोजना खालील प्रमाणे

- वाहतुकीचा वेग ताशी दहा किलोमीटरवरून २० किलोमीटरपर्यंत आणण्याचा प्रयत्न
- अतिक्रमण, खड्डे, यू-टर्न, अद्ययावत सिग्नल यंत्रणेबाबत उपाययोजना
- शहर वाहतूक शाखेचे सर्व विभाग आणि क्षेत्रीय कार्यालये एकत्रित काम करणार
- ॲपच्या माध्यमातून वाहतूक कोंडी आणि तक्रारींचे निवारण
- रस्त्यांवरील वाहतुकीची क्षमता वाढविणार

## 'संविधान अभ्यास वर्ग' ला प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** युवक क्रांती दल, भारत जोडो अभियान, संविधान प्रचारक लोकचळवळ आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीच्या वतीने आयोजित संविधान अभ्यास वर्गाला गुरुवारी सायंकाळी चांगला प्रतिसाद मिळाला. गुरुवारी एस.एम.जोशी फाउंडेशन सभागृह, येथे हा वर्ग पार पडला. या अभ्यास वर्गामध्ये 'पंतप्रधान पदाचे महत्व आणि अधिकार' विषयावर राज्यशास्त्राचे आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अभ्यासक प्रा. अविनाश कोल्हे यांनी मार्गदर्शन केले.

संविधान प्रचारक नीलम पंडित यांनी प्रास्ताविक केले. संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. मनीष देशपांडे यांनी स्वागत केले. पंतप्रधानपदाबाबत संविधानातील तरतुदींची, अधिकार, कर्तव्ये यांची माहिती प्रा. कोल्हे यांनी दिली.

» Selected

## आत्मियता आणि आपुलकीची भावना हे जीवंत समाजाचे लक्षण : प्रमोद रावत



**पुणे :** आज जगामध्ये कौटुंबिक आणि सामाजिक प्रकारच्या अनेक समस्या आहेत. भारतीय संस्कृतीमधील संस्कारमूल्यांमुळे आपल्याकडे त्या कमी प्रमाणात समस्या भेडसावत आहेत. त्यामुळे सगळे देश आपल्या संस्कृतीकडे पाहतात. समाजाला देण्याची मानसिकता भारतीयांमध्ये असून आत्मियता आणि आपुलकीची भावना हे जीवंत समाजाचे लक्षण आहे, असे मत डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद रावत यांनी व्यक्त केले. गुरूवार पेठेतील प्रभात जन प्रतिष्ठान व सेवा सहयोग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार पेठेतील श्री नाकोडा भैरव जैन धर्मशाळा येथे आयोजित कार्यक्रमात शहराच्या पूर्व भागातील १२९ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य सप्रेम भेट उपक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी काची प्रतिष्ठानचे अध्यक्ष युवराज काची, शेखर अभ्यंकर, किशोर चव्हाण, विजय चौधरी, शिवराज बलकवडे, अमोल थोरात, हेमराज साळुंके, ओमकार नाईक, कुणाल जगताप, गौरव मळेकर उपस्थित होते. यावेळी १० वी व १२ वी मधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

## एनडीए मधील बाधितांना पुनर्वसित दाखला मिळावा : आप ची मागणी



**पुणे :** महाराष्ट्रात धरणासाठी बाधित असणाऱ्या ग्रामस्थांना पुनर्वसन दाखले मिळतात जेणेकरून पुनर्वसनांसाठी आरक्षित असलेल्या सरकारी नोकरी व इतर सुविधांसाठी त्या पुनर्वसन दाखल्यांचा वापर होतो. धरणांसाठी बाधित शेत जमीन आणि देशाचे संरक्षणासाठी उभारलेल्या संरक्षण प्रबोधिनीसाठी बाधित शेत जमीन या दोन्ही ही बाब एकच असल्यामुळे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये गेलेल्या बाधितांना धरण प्रकल्पग्रस्तांच्या धर्तीवर पुनर्वसन दाखला मिळावा अशी मागणी आप पुणे शहर उपाध्यक्ष निलेश वांजळे यांनी पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना निवेदन देऊन केली.

राष्ट्रसंचार बेजबाबदारपणा रा

## रुग्ण आणि नातेवाईकांची होतेय फरफट

### ससून रुग्णालयातील कारभार पुन्हा चव्हाट्यावर



**पुणे :** शहरातील एका संस्थेने तीन दिवसांपूर्वी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. यात ससूनसह चार रक्तपेढ्यांना बोलाविण्यात आले. शिबिरात सुमारे ३५० रक्तपिशव्यांचे संकलन होते. त्यांचे समान वाटप चारही रक्तपेढ्यांत करण्यात येते. त्यामुळे या शिबिरातून ससूनला एक दिवसाचा रक्तसाठा उपलब्ध होणार होता. परंतु, शिबिरात रुग्णवाहिका घेऊन जाण्यासाठी तिच्यात डीझेल नसल्याचा मुद्दा उपस्थित झाला.

ससूनपासून केवळ दोन किलोमीटर अंतरावर रक्तदान शिबिर असूनही केवळ डीझेल नसल्याने त्यावर ससूनच्या रक्तपेढीतील कर्मचारी शिबिरस्थळी जाऊ शकले नाहीत. ससून रुग्णालयात गेल्या काही दिवसांपासून रक्तपेढीमध्ये रक्ताची टंचाई जाणवत आहे. त्यामुळे नातेवाईकांना बाहेरून रक्त पिशव्या आणाव्या लागत आहे. त्यातच आता शहराच्या मध्यवर्ती भागातील रक्तदान शिबिराचे निमंत्रण रुग्णालयाला आले. मात्र, रुग्णवाहिकेत डीझेल नसल्याचे लक्षात आले.त्यामुळे शिबिराला जायचे कसे? असा प्रश्न निर्माण झाल्यानंतर एकच गोंधळ उडाला. त्यानंतर डीझेल भरण्यासाठी प्रशासनाने पैसे उपलब्ध करून दिले. मात्र, या सर्व प्रकारामुळे ससून रुग्णालयातील कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला आहे.

ससून रुग्णालयातील रक्तपेढीत सध्या रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा जाणवत आहे. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना दररोज ७० ते ८० रक्ताच्या पिशव्यांची गरज भासते. सध्या रुग्णालयातील रक्तपेढीत केवळ एक दिवसाचा रक्तसाठा शिल्लक आहे. सर्वसाधारणपणे रक्तपेढीत चार ते पाच दिवसांसाठी पुरेल एवढा साठा ठेवावा लागतो. मात्र, प्रशासनाची सध्याची अवस्था पाहता हे नियोजन करणेही अशक्य झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची फरफट होत आहे.

## विक्रेत्यांचे पावसापासून संरक्षण

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**सामाजिक उपक्रम :** रोटरीच्या डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या वतीने 'छत्रछाया' उपक्रमा अंतर्गत २४२५ छत्र्यांचे विनामूल्य वाटप करण्यात आले. यावेळी फोटोत (डावीकडून) अभय जोशी, मानसी शहा, प्रांतपाल शीतल शहा, पदपथ विक्रेत्या आणि रागिणी शहा.

### पथारीवाले, पदपथ विक्रेते यांना यंदा मिळणार पावसापासून संरक्षण

# तब्बल २४२५ छत्र्यांचे विनामूल्य वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पावसाळा सुरु झाला असताना शहरातील गरजू विक्रेत्यांना आणि त्यांच्या सामानाला पावसापासून संरक्षण मिळावे आणि त्यांना मदत व्हावी, या उद्देशाने रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या वतीने २४२५ छत्र्यांचे विनामूल्य वाटप करण्यात आले. रोटरीचे प्रांतपाल शीतल शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक ठिकाणी हे वाटप संपन्न झाले.

रोटरी इंटरनॅशनल ही संस्था १९०५ सालापासून जगभरात अनेक सामाजिक उपक्रम हाती घेत आली आहे. सदर वर्ष हे रोटरीचे २०२४-२०२५ हे वर्ष असून याचेच औचित्य साधत आम्ही पावसाळ्याच्या या दिवसात गरजू विक्रेत्यांना व त्यांच्या सामानाला संरक्षण मिळावे म्हणून छत्र्या विनामूल्य वाटण्याचा निर्णय घेतला असे सांगत शीतल शहा म्हणाले.

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या तब्बल १०५ क्लब्जने या उपक्रमात सहभाग घेतला आहे. एकाच उपक्रमात इतक्या मोठ्या संख्येने रोटरीचे क्लब सहभागी होणे ही रोटरीच्या इतिहासात एक ऐतिहासिक घटना आहे.

आता पुढे क्लब्जच्या माध्यमातून गरजू विक्रेत्यांना या छत्र्यांचे वाटप करण्यात येईल. या अंतर्गत पुणे शहर व जिल्हा, पिंपरी चिंचवड, मावळ, पनवेल आणि रायगड जिल्ह्याचा काही भाग, नाशिक रस्ता, सोलापूर रस्त्यावरील इंदापूर व बारामती इत्यादी ठिकाणी गरजू भाजी व फळे विक्रेते, रस्त्यावर व्यवसाय करणारे गरजू नागरिक यांपर्यंत ही छत्री पोहोचविण्यात आली."

'छत्रछाया' उपक्रमा अंतर्गत देण्यात आलेली ही छत्री साडे सहा फूट रुंद असून तिची उंची विक्रेत्यांना आपल्या गरजेनुसार ठेवता येणे शक्य होईल. शिवाय ही छत्री उभारण्यासाठी खाली एक जड स्टँड देण्यात आला असून योग्य व विक्रेत्याच्या सोयीने छत्रीचा वापरता करता येईल.

## पीएमसी एम्प्लॉईज युनियनच्या वतीने मनपा भवनसमोर आंदोलन



**पुणे :** महानगरपालिकेकडील सेवकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी पुणे मनपा मुख्य इमारतीसमोर भव्य आंदोलन करण्यात आले. या आंदोलनासाठी हजारो मनपा सेवकांनी उस्फुर्तपणे प्रतिसाद देत प्रशासनाला धारेवर धरले. कोणतीही अहर्ता तपासली गेली नाही , विभागीय परीक्षा पास नाहीत , त्यांचा लिपिक या पदावर 3 वर्ष काम केल्याचा अनुभव नाही तरीही मनपात वरिष्ठ लिपीक पदी नियुक्ती दिली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या मूळ सेवकांमध्ये तीव्र असंतोष असून प्राधान्याने मूळ सेवकांना प्रथम पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे.

### महापालिका आर्थिक कोंडीत सापडण्याची शक्यता

# अनुदानावरच पालिकेचा कारभार ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेची आर्थिक स्वायत्ता अडचणीत आली आहे. भविष्यात अनुदानावरच महापालिकेचा कारभार चालविण्याची वेळ प्रशासनावर येणार आहे. महापालिकेस वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी सध्या तब्बल पाच हजार कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. त्याबाबतचे प्रस्ताव केंद्र आणि राज्य शासनाकडे पाठवण्यात आले आहेत. या शिवाय तेवढेच कर्ज महापालिका भविष्यात घेणार आहे. त्यामुळे उत्पन्नाची शाश्वती कमी होत असल्याने भविष्यात पालिका आर्थिक कोंडीत सापडण्याची शक्यता आहे. गेल्या दहा वर्षांत पालिकेचे कर उत्पन्न अपेक्षेनुसार वाढलेले नाही. मिळकतकरातून सुमारे २,३०० कोटींचा महसूल मिळत असून कर विभागाची थकबाकी १० हजार कोटींवर गेली आहे

पालिकेकडे १४ लाख मिळकतींची नोंदणी असली, तरी प्रत्यक्षात ८ लाख मिळकतींचाच कर मिळत असून शासनाकडून वारंवार राजकीय गणितांसाठी कर माफ करणे, स्थानिक पातळीवर अभय योजना राबविणे, मतांच्या गणितासाठी कर वसुलीला स्थगिती देणे असे प्रकार केले जात आहेत. त्यामुळे महापालिकेचे कर संकलन घटले आहे.

कर संकलनासोबतच पालिकेस सर्वाधिक महसूल शासनाच्या "एलबीटी' अनुदानातून मिळतो. ही रक्कम सुमारे २,५०० कोटींची आहे. त्यामुळे पालिकेचा सर्वात मोठा उत्पन्नाचा स्रोत शासकीय अनुदान बनला आहे. तर बांधकाम विकास विभागाकडूनही गेल्या दोन वर्षांत दोन हजार कोटींचा महसूल मिळत असल्याने पालिकेस थोडाफार दिलासा मिळत आहे.

सन २०१७ पर्यंत महापालिकेची हद्द २४८ चौरस किलोमीटर होती. त्यानंतर ११ गावे आणि नंतर २३ गावे महापालिकेत समाविष्ट झाले. आता कॅन्टोंन्मेंट बोर्डही पालिकेत येणार असल्याने पालिकेची हद्द ५१९ चौरस कि.मी. होणार आहे. त्यामुळे शहराची लोकसंख्याही दहा ते बारा लाखांनी वाढली आहे. पालिकेस वर्षाला सुमारे आठ हजार कोटींचा महसूल मिळत असला, तरी त्यातील जवळपास चार हजार कोटी रु. खर्च वेतनाचाच आहे. जो एकूण उत्पन्नाच्या सुमारे ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे.



### महापालिकेवर वाढता भार..

- प्रकल्पांमध्ये महापालिकेचाही हिस्सा असल्याने महापालिकेकडे असला निधी याच कामांवर खर्च होत आहे. पालिकेकडे लहान कामांसाठी निधीच नसल्याचे चित्र आहे. तर, मेट्रोच्या विस्तारीत मार्गात केंद्रशासन अनुदान कमी करणार असल्याने त्याचाही भार महापालिकेवर असणार आहे.

## सरकारची ४१ महामंडळे तोट्यात का ? हिशोब द्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्याची आर्थिक पिछेहाट करणाऱ्या महायुती सरकारने जनतेच्या हिताचे प्रकल्प राबविण्याऐवजी टेंडर घ्या, कमिशन द्या, असा कार्यक्रम राबविला, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष, माजी आमदार मोहन जोशी यांनी केला असून सरकारची ४१ महामंडळे तोट्यात का गेली याचा हिशोब द्यावा, अशी मागणी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्र्यांकडे केली. मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना दिले.

काँग्रेस पक्षाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना भेटलेल्या शिष्टमंडळात प्रदेश प्रतिनिधी रमेश अय्यर, चंद्रशेखर कपोते, प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस प्रथमेश आबनावे, चेतन अगरवाल, सुरेश कांबळे, आयुब पठाण यांचा समावेश होता. राज्यात एकूण ११० सार्वजनिक उपक्रम, महामंडळे आणि कंपन्या आहेत. यातील ४१ महामंडळांचा संचित तोटा ५० हजार कोटींवर गेला आहे. एमएमआरडीए हा नफ्यातील उपक्रम कर्जात बुडाला आहे. महामंडळांना दिलेले पैसे कुठे खर्च होत आहेत? त्यातून काय कामे झाली? याची सखोल चौकशी व्हावी.

## उद्धट वर्तन करणाऱ्या कामगाराला मनसे कार्यकर्त्यांचा मराठी दणका

**विश्रांतवाडी :** धानोरी उपनगरातील एका व्यावसायिकाकडे काम करणाऱ्या परप्रांतीय कामगाराने मराठी ग्राहकांशी वाद घालत "मराठी भाषा मला कळत नाही, मराठीतच बोलणे हा नियम आहे का? मी मराठीत बोलणार नाही, काय करायचे ते करा?" असे म्हणत हेकेखोरपणे उद्धट वर्तन करणाऱ्या कामगाराला मनसे कार्यकर्त्यांनी मराठी दणका दिला. दोन दिवसांपूर्वी घडलेल्या या घटनेचा व्हिडीओ संपूर्ण राज्यात सोशल व्हिडीओवर प्रसिद्ध झाला. यामुळे धानोरीतील मनसे कार्यकर्त्यांनी त्या व्यावसायिकाकडे भेट दिली. त्याचे उद्धट वागणे व मराठीबद्दलची अनास्था पाहून मनसे कार्यकर्त्यांनी हे पाऊल उचलले.

### एकाच ठिकाणी तपासणीपासून शस्त्रक्रियेपर्यंत सर्वकाही मोफत

# कार्यसम्राट मोफत महा-आरोग्य शिबीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारताचे पंतप्रधान, नरेंद्र मोदी तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस यांची "स्वस्थ ग्राम - स्वस्थ भारत" या संकल्पना सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. तसेच गिरीश महाजन यांचे "रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा" हे ब्रीदवाक्य घेऊन संपूर्ण महाराष्ट्रातील गरजु व गरीब रुग्णांसाठी केले जाणारे सेवाकार्यसुध्दा समाजासाठी अतिशय मोलाचे आहे. या पार्श्वभुमीवर गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पुणे मतदारसंघातील गरजु रुग्णांच्या सेवेसाठी दिवंगत कार्यसम्राट आ. विनायक निम्हण यांच्या जयंतीनिमित्त सोमेश्वर फॉऊंडेशन, पुणे यांनी ४ ऑगस्ट, २०२४ रोजी 'कार्यसम्राट मोफत महा- आरोग्य शिबीर' कृषी महाविद्यालय मैदान- भोसलेनगर, पुणे येथे आयोजित केले आहे.



### शिबिराची कार्यपद्धती ..

- या शिबीराची सुरवात २२ जुलै पासून होणार आहे. **पहिला टप्पा:** दिनांक २२ जुलै ते २८ जुलै२०२४ पर्यंत घरोघरी जाऊन नागरिकांची उंची, वजन, रक्तदाब तपासणी करून माहिती संकलन केले जाणार आहे. **दुसरा टप्पा:** २७ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत शिवाजीनगर पासून पाषाण, सोमेश्वरवाडी पर्यंत ३६ ठिकाणी आरोग्य केंद्र उभारूण पूर्व तपासणी, प्राथमिक उपचार, इसीजी, रक्त, लघवी तपासणी, सोनोग्राफी, एक्स रे, टूडी इको, तणाव तपासणी व मुख्य शिबीराची नोंदणी केली जाईल. **तिसरा टप्पा :** 'मुख्य शिबीर' ४ ऑगस्ट'ला होणार असून मान्यवरांच्या उपस्थितीत शिबीराचे उदघाटन शासकीय कृषी महाविद्यालय मैदान, सिंचन नगर, शिवाजीनगर या ठिकाणी होणार आहे. सकाळी ९ ते दुपारी सायं ४ वाजेपर्यंत जगविख्यात डॉक्टरांचा सल्ला, तपासणी, औषधोपचार केले जाणार आहेत. **चौथा टप्पा:** ५ ऑगस्ट ते ५ ऑक्टोंबर या दरम्यान महाआरोग्य शिबीर पश्चात शिबीरात शस्त्रक्रिया अथवा उपचार याकरिता नोंद किंवा निवड करण्यात आलेल्या रूग्णांना लाभ.

#रा

### उच्च न्यायालय म्हणते : विद्यार्थ्यांबाबत असा निर्णय घटनाबाह्य

# आरटीई : एक किमीची सक्ती रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई:** आरटीई कायद्याअंतर्गत राखीव आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असलेल्या २५ टक्के जागांमधून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटर परिघातील शासकीय किंवा अनुदानित शाळांमध्येच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबतचा राज्य सरकारचा अध्यादेश मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत अचानक असा निर्णय घेणे घटनाबाह्य असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. या संदर्भातील परिपत्रक राज्य सरकारने ९ फेब्रुवारी रोजी काढले होते. यावर अनेक पालकांनी नाराजी व्यक्त केली होती. या परिपत्रकाविरोधात काही शाळांनी तसेच पालकांनी आक्षेप घेत मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. खासगी व विनाअनुदानित शाळांना आरटीईतून वगळण्याबाबत ९ फेब्रुवारी रोजी राज्य सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेला दिलेले आव्हानही उच्च न्यायालयाने स्वीकारले आहे. या अधिसूचनेला मे महिन्यातच न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली होती.

मात्र, या काळात अन्य विद्यार्थ्यांना दिलेले प्रवेश बाधित करू नयेत, असे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत. शिक्षण मराठी की इंग्रजीतून घ्यायचे हा अधिकार पालकांचा व विद्यार्थ्याचा आहे. अचानक नवीन नियम करून त्यावर गदा आणली जाऊ शकत नाही, असा दावा या याचिकाकर्त्यांनी केला होता. मुंबई उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांचा हा दावा मान्य केला आहे. तर आरटीईमुळे सरकारी शाळांतील विद्यार्थी संख्या घटत चालल्याचा दावा राज्य सरकारने केला होता.

#### मुलांमध्ये झाला असता भेदभाव

आरटीई प्रवेशाच्या पोर्टलवर आरटीई प्रवेशास पात्र असणाऱ्या शाळा व प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या जागांची जिल्हानिहाय माहिती दिली आहे. शासनाने आरटीई प्रवेशासाठी राज्य शासनाने ९ फेब्रुवारी २०२४ च्या नवीन आदेश काढले. त्यानुसार, शालेय शिक्षण विभागाने यंदा महत्त्वपूर्ण बदल केला. या बदलानुसार खासगी शाळेत प्रवेशाला विद्यार्थी मुकणार होते. विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून एक किलोमीटर परिसरात अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा असल्यास त्याच शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे. खासगी शाळेत प्रवेश देण्यात येणार नाही, असे परिपत्रकात म्हटले होते. शासनाच्या नवीन नियमांमुळे सर्वसामान्य मुलांना इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळेची वाट बिकट झाली होती. श्रीमंत मुलांसाठी इंग्रजी माध्यमांची खासगी शाळा, तर गरीब मुलांसाठी शासकीय शाळा अशी वर्गवारी यामुळे झाली असती.

## » Selected

### चालकाला फिट, बस शेतात!

**सोलापूर** : एसटी चालकाला फिट आल्यामुळे टेंभुर्णी-कुर्डूवाडी मार्गावर एसटी शेतात जाऊन उलटली. बसमध्ये ३५ ते ४० प्रवासी होते. या अपघातात २४ प्रवासी जखमी झाले आहेत. कुर्डूवाडी डेपोची बस वैरागहून स्वारगेटकडे जात असताना पिंपळनेरनजीक पलटी झाली. जखमींना उपचारासाठी सोलापूरला हलवले आहे. तर काही जखमींना कुर्डुवाडी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एसटी चालकाला अचानक फिट आल्यामुळे त्याचा पाय एक्सलेटरवर दाबला गेला आणि त्यामुळे बस रस्ता सोडून कडेला गेली. चालकाला काही समजण्याच्या आधीच ती थेट शेतात घुसली. थोड्या अंतरावर जाऊन ती उलटली. या प्रकारामुळे एसटीत असलेले प्रवासी चांगलेच भयभीत झाले. मात्र कोणालाही गंभीर इजा अथवा जीवितहानी झाली नाही. सुदैवाने अपघात कमी रहदारीच्या ठिकाणी घडला.

### राष्ट्रवादीचा नऊ जागांवर दावा

**जळगाव** : राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली असून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील २१ जुलैला जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. जिल्हा पदाधिकाऱ्यांकडून नऊ जागांवर दावा केला जाणार आहे. लोकसभा निवडणुकीपासून आतापर्यंत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा हा तिसरा दौरा आहे. लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर विधानसभा निवडणुकीत कोणत्या मतदारसंघात पक्षाला यश मिळू शकते, याचा अंदाज घेतला जाईल.

या अनुषंगाने रविवारी सकाळी १०.३० वाजता श्रीकृष्ण लॉन्स येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची जिल्हा बैठक आयोजित केली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीला फक्त एकाच जागेवर विजय मिळाला होता. यावेळीही किमान ८ ते ९ जागांचा आग्रह धरला जाण्याची शक्यता आहे

### उच्च न्यायालयाचे सरकारला खडे बोल; पावसाळ्यात कारवाईस मनाई

# विशाळगड कारवाईस स्थगिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई:** विशाळगडावरील अतिक्रमणाची कारवाई तातडीने थांबवण्याचे निर्देश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. पी. कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पुन्नीवाला यांच्या खंडपीठाने दिले आहेत. या प्रकरणाची शुक्रवारी तातडीने सुनावणी झाली. यावेळी उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि स्थानिक यंत्रणेवर ताशेरे ओढले आहेत.

पावसाळ्यात कारवाई तत्काळ थांबवा, सप्टेंबरपर्यंत कुठलीही नवी तोड कारवाई नको, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले. भर पावसात तिथल्या बांधकामावर हातोडा चालवण्याची काय गरज होती?,असा सवालही न्यायालयाने विचारला. विशाळगडावर आंदोलकांनी मशिदीवर चढाई केल्याचा याचिकाकर्त्यांचा आरोप गंभीर आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

विशाळगडावरील बांधकामांना याचिकेवरील अंतिम सुनावणीपर्यंत संरक्षण देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली होती. या बांधकामांविरोधातील कारवाईदरम्यान घडलेल्या घटनांविषयी याचिकेत उल्लेख याचिकाकर्त्यांनी केला होता. काही संघटना 'चलो विशाळगड', 'विशाळगड बचाव' मोहीम राबवत आहेत. या मोहिमेला आणि आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला होता.

उच्च न्यायालयाने शाहूवाडी पोलीस ठाण्याच्या मुख्य अधिकाऱ्यांना न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश जारी केले आहेत. याचिकाकर्त्यांनी विशाळगडावर झालेल्या तोडफोडीचे व्हिडिओ कोर्टात दाखवले. तिथे उपस्थित अधिकाऱ्यांनीच जमावाला मोकळीक दिल्याचा आरोप करण्यात आला. हा युक्तीवाद ऐकल्यानंतर विशाळगडावर तोडफोड होत असताना सरकार काय करत होते, असा सवाल न्यायालयाने केला. तसेच कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी कुणाची आहे, असे विचारत सरकारवर ताशेरे ओढले.

विशाळगडाच्या परिसरातील गजापूर आणि मुस्लीमवाडी परिसरातील घरादाराचे जमावाकडून नुकसान करण्यात आले होते. यानंतर कोल्हापूरचे खासदार शाहू महाराज छत्रपती यांनी विशाळगडाला भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली होती. ही घटना जिल्हा प्रशासन आणि पोलिसांचे अपयश असल्याचे त्यांनी म्हटले होते.

### लाडकी बहीण; भाजप-काँग्रेस आमनेसामने

**नागपूर :** जिल्ह्यातील शिर्शी गावात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या कार्यक्रमात गोंधळ होऊन काँग्रेस आणि भाजपचे कार्यकर्ते आमने-सामने आले. योजनेसाठी अर्ज भरून देण्याचा कार्यक्रम शिर्शीत भाजपकडून आयोजित करण्यात आला होता. यात काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घातल्याचा आरोप भाजपच्या स्थानिक नेत्यांनी केला. या प्रकरणी आता भाजपच्या स्थानिक नेत्यांनी तक्रार दाखल केली आहे. स्थानिक काँग्रेस नेत्यांचा आरोप आहे की, भाजपच्या नेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या हितासाठी ग्रामपंचायतीचे सभागृह बुकिंग न करता आणि शुल्क न देता वापरले.

# रिपब्लिकन आघाडी उभारण्याचे प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आतापर्यंत राज्याच्या राजकारणात युती किंवा आघाडीचाच एक भाग बनून राहण्यात समाधान मानणारे रिपब्लिकन पक्ष यावेळच्या विधानसभा निवडणुकांमध्ये एकसंघ राजकीय आघाडी मैदानात उतरवणार असल्याचे समजते. रिपब्लिकन पक्षाचे आठवले, गवई आणि कवाडे गट आता एकसंध निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची चिन्हे आहेत. एकीकृत रिपब्लिकन समितीच्या वतीने तसे प्रयत्न सुरू झाले आहेत. यात सध्या महायुतीचा भाग असलेला भाजपचा मित्रपक्ष आठवले गटही सहभागी झाल्यामुळे उत्सुकता निर्माण झाली आहे.

आगामी निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पक्षाचे वेगवेगळे गट, तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या आंबेडकरी विचारसरणीच्या विविध संघटनांची मोट बांधून एकसंघ रिपब्लिकन आघाडी तयार करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहे. नागपुरात या संदर्भातील एक प्राथमिक बैठकही झाली आहे.

विशेष म्हणजे, चर्चेच्या पातळीवर अशी राजकीय आघाडी उभारण्याच्या प्रयत्नात सध्या भाजपसोबत असलेला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट, तसेच शिंदेंच्या शिवसेनेसोबत असलेला जोगेंद्र कवाडे गट यांचे प्रतिनिधीही सहभागी झाले. त्यामुळे आठवले आणि कवाडे महायुतीतून बाहेर पडतील का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

बैठकीत आंबेडकरी विचारसरणीच्या सामाजिक संघटना, तसेच बौद्ध महासभेच्या प्रतिनिधींनीही सहभाग नोंदवला. एकसंघ रिपब्लिकन पक्ष उभारण्याचे अंतिम उद्दिष्ट या बैठकीत निश्चित करण्यात आले आहे. सर्व रिपब्लिकन पक्षांचा एक पक्ष तयार होण्यास वेळ लागत असेल तर सध्या रिपब्लिकन पक्षांची राजकीय आघाडी उभारावी आणि त्या माध्यमातून आगामी विधानसभा निवडणूक लढवावी, असा धोरणात्मक निर्णय या बैठकीत झाला आहे.

### लाड यांचा पलटवार; मराठा समाजासाठी कोणी काय केले याची चर्चा करा

# मि. जरांगे, योग्य माहिती घेऊन बोला!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** भाजपचे आमदार प्रसाद लाड यांच्यावर अत्यंत खालच्या भाषेत आगपाखड करणारे मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांना आ. लाड यांनी शुक्रवारी चोख उत्तर दिले आहे. लाड यांनी पुन्हा एकदा ट्विट करून, 'मि. जरांगे, योग्य माहिती घेऊन बोला', असे सुनावले आहे. गेल्या ६० वर्षात मराठा समाजासाठी कोणी काय केले याची एकदा चर्चा होऊनच जाऊ द्या, असे आव्हान त्यांनी जरांगे यांना दिले आहे.

राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असताना जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले होते. या वादात भाजपचे नेते प्रसाद लाड यांनी उडी घेत जरांगे यांना डीडी म्हणजे देवेंद्र द्वेष नावाचा आजार झाल्याची टीका केली होती. गेल्या ६० वर्षांत जे होऊ शकलं नाही ते फडणवीसांनी केले, मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवले, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले होते. जरांगे कोणाच्या छत्रछायेखाली हा द्वेष करत आहेत? हा संशोधनाचा विषय आहे, असे ते म्हणाले होते.

#### लाड यांचे ट्विट

“ **बाय द वे, मि. जरांगे,** मराठा समाजाला तुमच्याकडून न्यायाची अपेक्षा आहे, नरेटिव्हची नाही! काल आपण मला शिविगाळ करताना जे आकांडतांडव केले आणि जे प्रमाणपत्र फडणवीसांच्या एसपीने नाकारले असे सांगितले, त्याची मूळ हकीकत जाणून घ्या. हे प्रकरण ठाणे एसपींच्या हद्दीतील नाही, तर ठाणे पोलिस आयुक्तांच्या हद्दीतील आहे. सखाराम रामचंद्र ढाणे, जिंतूर (जि. परभणी) यांनी २०२३-२०२४ चे नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. त्यांच्याकडे २०२४-२५ या वर्षाचे प्रमाणपत्र होते. त्यामुळे त्यांनी स्वत: एक प्रमाणपत्र भरून खुल्या प्रवर्गातून संधी देण्यात यावी, असे हमीपत्र दिले. तुम्ही योग्य माहिती घेत जा आणि मग बोलत जा.

### जिल्हाधिकाऱ्यांवर आरोप : जबाबासाठी प्रतिसाद मिळेना

# खेडकरांना नोटीसवर नोटीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** वादग्रस्त प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांना पुणे पोलिसांनी दुसऱ्यांदा जबाब देण्यासाठी पुणे आयुक्त कार्यालयात हजर राहण्याची नोटीस बजावली आहे. पहिली नोटीस धुडकावल्यानंतर वाशिम पोलिसांच्या एपीआय श्रीदेवी पाटील यांनी खेडकरांना प्रत्यक्ष दुसरी नोटीस दिली. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यावर छळाचा आरोप केल्यासंदर्भात खेडकरांना शनिवारी पुणे येथे जबाब नोंदवण्यासाठी ही नोटीस आहे. दरम्यान, पूजा खेडकर यांनी केलेल्या आरोपाबाबत योग्य वेळ आल्यावर बोलेन, असे दिवसे यांनी म्हटले आहे.

खेडकर यांनी जे आरोप केलेले आहेत, त्याची नोटीस मला अद्याप मिळालेली नाही, अशी माहिती दिवसे यांनी दिली आहे. पुणे पोलिसांनी पहिल्या नोटीसमध्ये आपल्या तक्रारीसंबंधीचा जबाब नोंदवावा यासाठी हजर राहण्याचे निर्देश दिले होते. मात्र, पूजा जबाब नोंदवण्यासाठी न आल्याने पोलिसांनी दुसरी नोटीस पाठवली आहे.

पहिल्यांदा जबाब नोंदवण्यासाठी बोलावल्यानंतर आपल्याला लगेच त्यासाठी येणे शक्य नाही, असे उत्तर त्यांनी पोलिसांना दिले होते. त्यांनी आपला वाशिम येथील मुक्काम दोन दिवस वाढवला आहे. आपल्याला लागणाऱ्या गरजेच्या सर्व गोष्टी त्या आपल्या खोलीमध्येच मागवून घेत असल्याची माहिती आहे. गेल्या तीन दिवसांपासून त्या बंद खोलीत आहेत. त्यांना २० तारखेपर्यंत मसुरीच्या प्रशिक्षण केंद्रातही हजर राहावे लागणार आहे.

#### एक फोन; अन् मनोरमा खेडकर पोलिसांच्या जाळ्यात

● पोलिसांच्या जाळ्यात सापडलेल्या पूजा यांच्या आई मनोरमा यांना त्यांची एक चूक नडली. महाडजवळ लॉजमध्ये लपलेल्या असताना १७ तारखेला रात्री अकरा वाजेच्या सुमारास मनोरमा खेडकर यांनी त्यांचा फोन सुरू केला. त्यामुळे पुणे ग्रामीण पोलिसांना त्याचे लोकेशन लगेच समजले. त्यांनी तातडीने सूत्रे हलवत घटनास्थळी धाव घेतली आणि लॉजवरून मनोरमा खेडकर यांना ताब्यात घेतले. कॅब ड्रायव्हर दादासाहेब ढाकणे यांच्या आधार कार्डचा खेडकर यांनी गैरवापर केला आणि ड्रायव्हरच्या आईच्या आधार कार्डवरील नावाचा वापर करून त्यांनी इंदूबाई ढाकणे या नावाने हिरकणीवाडीत रूम बुक केली.

द्वितीय पुण्यस्मरण

तत्त्वदर्शी प्रज्ञावंत कवयित्री व लेखिका
वै. सौ. उर्मिला वि. कराड
थोर शिक्षणतज्ञ विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा.कराड यांच्या सुविद्य पत्नी
माईर्स एमआयटी परिवाराच्या वात्सल्यमूर्ती



फुललेला संसार....
भरला संसार हा माझा पाखरांची किलबिल
हास्यपुष्पांच्या कळ्यांची अंगणात पखरण
सुवासिक सुगन्धाची माझ्या दारी दरवळ
बाल निष्पाप जीवांच्या मूक भावांचे संगीत

अशा सुखद घरात जीव वेडा विहरतो
मातृवत्सल भावांनी माझे मन रिझवितो
वात्सल्याच्या संगीताने मातृत्वाला जागवितो
अंगाईच्या सुरातच सुख सारे साठवितो.
-उमा

शब्दाई प्रकाशन आयोजित
मा. उर्मिला वि. कराड लिखित
कृतज्ञ मी कृतार्थ मी, कीर्तनपुष्प, समीर
या पुस्तकांचा
|| प्रकाशन समारंभ ||

हस्ते
डॉ. श्रीपाल सबनीस
सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत

अध्यक्ष
मा. उल्हासदादा पवार
ज्येष्ठ अभ्यासक

प्रमुख उपस्थिती
प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड
संस्थापक-अध्यक्ष,
माईर्स एमआयटी विश्व शांती विद्यापीठ, पुणे, भारत
निर्माते - विश्व शांती घुमट

प्रा. इंद्रजित भालेराव
सुप्रसिद्ध कवी,
लेखक

डॉ. माधवी वैद्य
ज्येष्ठ लेखिका,
कवयित्री

स्थळ
संत ज्ञानेश्वर सभागृह
एम.आय.टी.वर्ल्डपीस युनिव्हर्सिटी, कोथरूड, पुणे | शनिवार, दि. २० जुलै २०२४ रोजी, सकाळी १०.३० वा.

याप्रसंगी
जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे वंशज
ह. भ. प. श्री. बापूसाहेब मोरे-देहूकर,
मु.पो. देहूगांव, पुणे यांचे सुश्राव्य कीर्तन शनिवार, दि. २० जुलै २०२४ रोजी, सायं. ५.१५ वाजता होईल व त्यानंतर महाप्रसाद दिला जाईल.

कार्यक्रम स्थळ : ज्ञानमंदिर, प्लॉट नं. १९, राजपथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, रामकृष्ण परमहंस नगर, पौड रोड,कोथरूड, पुणे-४११०३८

आपले विनित : समस्त कराड परिवार

# दूध दरवाढीमागचे अर्थगणित

महाराष्ट्रात दूध उत्पादक शेतकऱ्यांना गायीच्या दूधापोटी २५ ते २६ रुपये लिटर भाव मिळत आहे. मागच्या वर्षी हा भाव ३९ रुपये प्रति लिटर दर होता. मात्र याचा राजकीय फटका बसू नये म्हणून सरकारने २८ जुन रोजी पाच रुपये प्रती लिटर अंशदान जाहीर केले आहे. पण अंशदान घोषित करण्याची वेळ का आली? साधारणपणे देशातील सर्वात मोठी दुध उत्पादक कंपनी अमूल, मदर डेअरी आणि नंदिनी यांनी दुधाच्या किरकोळ किंमतीत दोन रुपये प्रती लिटरची वाढ केली. याउलट दक्षिण भारतातील नामांकित ब्रँड आरोक्या, डोलडा आणि काही अन्य कंपन्यांनी दूधाच्या किंमतीत घट केली. कारण शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या कमी किमतीचा फायदा या कंपन्या थेट ग्राहकांना देत आहेत. एकार्थाने हे संपूर्ण प्रकरण क्लिष्ट आहे. यातील दोन गोष्टी खऱ्या आहेत. एक तर शेतकऱ्यांना मिळणारा कमी दर आणि दुसरे म्हणजे डेअरी कंपन्यांसमोर वाढलेल्या अडचणी. या दोन्ही प्रकरणाला स्किम्ड मिल्क पावडर (एसएमपी) च्या किमतीतील प्रचंड घसरण कारणीभूत आहे. मार्च २०२३ मध्ये ३५० रुपये प्रति किलोवरून ती आता २१० रुपये प्रति किलोवर आली. म्हणून या अडचणींला एसएमपीच्या व्यावसायिक नजरेतून पाहणे गरजेचे आहे. यावर लवकर मार्ग निघत नसेल तर शेतकरी आणि डेअरी उद्योगासाठी आगामी काळात संकटाची मालिका सुरू होऊ शकते. कंपन्यांच्या किमती कमी होण्यामागे तोट्यातील एसएमपीची खरेदी करणे हे देखील मोठे कारण आहे. देशात अजूनही सुमारे तीन लाख एसएमपीचा स्टॉक उपलब्ध असून तो सहकारी संस्था अमूल, नंदिनी आणि खासगी डेअरी कंपन्यांकडे पडून आहे. त्याचा उत्पादन खर्च सुमारे ३०० ते ३५० रुपये प्रति किलो आहे. अशावेळी कंपन्यांना सध्याच्या किंमतीवर विकताना सुमारे ७०० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागू शकतो. देशात आजघडीला दरवर्षी सुमारे पाच लाख टन एसएमपीचे उत्पादन होते. एसएमपीच्या अडचणीत गायीच्या दुधामुळे अधिक वाढ होते आणि दूध उत्पादनात गायीच्या दूधाचा वाटा वाढत आहे. भारतात ॲनिमल फॅटचा खप वाढत आहे. त्यामुळे त्याचे उत्पादनही वाढले आहे. दुधातून जेव्हा फॅट (चरबीयुक्त पदार्थ) चे उत्पादन होते, तेव्हा आपोआपच 'एसएमपी'चे देखील उत्पादन वाढते. शंभर लिटर गायीच्या दूधापासून तयार होणारे चरबीयुक्त पदार्थ आणि एसएमपीच्या विक्रीतून ३३७१ रुपये म्हणजे ३३१७१ रुपये प्रति लिटरची कमाई डेअर कंपन्यांची होते. एसएमपी आणि फॅट उत्पादनासाठी प्रक्रिया, पॅकेजिंग आणि डेअरीचे अन्य खर्च गृहित धरता सुमारे ३.५ रुपये प्रती लिटर खर्च होतो. या संपूर्ण गणनेच्या आधारावर कोणताही नफा आणि नुकसानीचा विचार न करता डेअरी कंपन्या या शेतकऱ्यांना सुमारे २६.७१ रुपये लिटर भाव देऊ शकतात आणि महाराष्ट्रातील खासगी डेअरी कंपन्या शेतकऱ्यांना हाच भाव देत आहे. फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये दूध टंचाई जाणवत होती तेव्हा महाराष्ट्रातील डेअरी कंपन्या यलो बटर (लोणी) पासून ४३० ते ४३५ रुपये प्रती किलो कमाई करत होते. त्यांना एसएमपी ३१५ ते ३२० रुपये प्रति किलो भावाने मिळत होते. या कारणामुळेच गेल्यावर्षी कंपन्या शेतकऱ्यांकडून ३६ ते ३८ रुपये लिटर दराने दूधाची खरेदी करत होत्या. एसएमपीची जागतिक पातळीवरची किंमत २७६६ डॉलर प्रती टन आहे आणि रुपयांचा सध्याचा विनिमय दर सुमारे २३१ रुपये प्रति किलो आहे. देशांतर्गत किंमत २१० रुपये प्रति किलो आहे. अशावेळी देशात असणाऱ्या एसएमपीच्या साठ्याच्या निर्यातीची शक्यता असून नसल्यासारखी आहे. दुसरीकडे त्याचा उत्पादन सतत वाढत आहे. म्हशीच्या दूधासंदर्भात मात्र ही समस्या कमी आहे. कारण म्हशीच्या दुधात सात टक्के फॅट अणि नऊ टक्के एसएनएफ असते. गायीच्या दूधाच्या तुलनेत चरबीयुक्त पदार्थाचे उत्पादन केल्यास एसएमपीचे जवळपास दुप्पट उत्पादन होते. एसएमपीच्या विक्रीचे पर्याय देखील मर्यादित आहेत. ग्राहकांच्या पातळीवर थेट विक्रीचे प्रमाण अधिक नाही. भारताबाहेर ॲनिमल फॅटला फारशी मागणी नाही. तेथे डेअरी कंपन्यांची स्थिती भारतीय कंपन्यांपेक्षा वेगळी आहे. डेअरी उद्योगतील तज्ज्ञांच्या मते, भारताला यावरचा मार्ग स्वत:च शोधावा लागेल. त्यामुळे सरकारने एसएमपीचा बफर स्टॉक तयार करावा किंवा शेजारी देशाला स्वस्तात किंवा मोफत निर्यात करायला हरकत नाही. काही कंपन्यांनी तंत्रज्ञानाच्या बळावर विकास करून एसएमपीतून प्रोटीन वेगळे करत त्याचे उत्पादन सुरू केले. मात्र हे काम व्यापक प्रमाणात सरकारला हाती घ्यावे लागेल. त्या प्रोटीनचा फोर्टिफिकेशन किंवा दुसऱ्या पर्यायाचा वापर करता येऊ शकतो. तरीही एसएमपीचे संकट वाढत जाईल आणि त्याचा भुर्दंड दूध उत्पादक शेतकऱ्यांना कमी किंमतीच्या रुपातून सहन करावा लागेल, हे देखील खरे आहे. कारण दूध उत्पादनात गायीच्या दूधाचा वाटा वाढत आहे. विशेष म्हणजे निव्वळ दूधाची विक्री करणाऱ्यांना कोणतीच अडचण नाही. या कारणामुळे शेतकऱ्यांकडून स्वस्तात दूध खरेदी करणाऱ्या दक्षिणेतील कंपन्यांनी ग्राहकांसाठी दूधाचे भाव कमी केले. त्याचवेळी एसएमपीचा तोटा भरून काढण्यासाठी उत्तर भारतातील कंपन्यांनी भाव वाढविले. या संकटाकडे लक्ष देण्याची गरज आहे.डेअरी उद्योग क्षेत्र राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत ५ टक्के योगदान देते आणि ८ कोटीपेक्षा अधिक शेतकऱ्यांना स्थानिक रोजगारही मिळवून देते. भारत दुध उत्पादनात पहिल्या स्थानावर आहे आणि जगातील एकुण दूध उत्पादनात २५ टक्के योगदान देण्याचे काम करते. २०२३ मध्ये देशाने २३१ दशलक्ष टन दूधाचे उत्पादन केले आणि गेल्या दशकात सहा टक्के वाढीसह हे उत्पादन झाले होते. तज्ज्ञ मंडळी भारताला वार्षिक दूध उत्पादन दर वाढविण्याचा सल्ला देतात आणि तो अलिकडेच स्थिर झालेला आहे. यापूर्वीच्या अंदाजानुसार सात ते आठ टक्के वार्षिक वाढीसह २०२८ पर्यंत ३०० दशलक्ष टन उत्पादन करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. अर्थात अलिकडे ही वाढ वार्षिक ४ ते ५ टक्के राहिली आहे. चारा, वैरणाची वाढती किंमत आणि थांबलेल्या निर्यातीमुळे दुध उत्पादन आणि किंमतीत अस्थिरता आली. त्यामुळे पुरवठा कमी होताना दिसत आहे. यात एक प्रश्न उपस्थित होतो आणि तो म्हणजे पुरेसे उत्पादन असताना कंपन्या दूधाची किंमत का वाढवत आहेत ? मदर डेअरीने दुधाच्या वाढत्या किंमतीला वाढत्या उत्पादन खर्चाला जबाबदार धरले. एकंदरीतच वाढलेल्या उत्पादन खर्चाची भरपाई करण्यासाठी दुधाचे भाव वाढविल्याचे कंपनीकडून सांगण्यात येते आणि ही भाववाढ एका वर्षापेक्षा अधिक काळापासून होत आहे. दुधाच्या किंमतीने गेल्या काही काळात सतत वाढ नोंदविली आहे. २०२३ मधील किमंतीची नव्या किंमतीशी तुलना केली तर मदर डेअरचे फूल क्रीम (गोल्ड) आता ६८ रुपयांना मिळते. त्याचवेळी एक वर्षापूवी दोन्ही फुल क्रीम ६६ रुपये प्रती लिटर मिळत असे. २०२२ मध्ये अमुलने आपल्या किंमतीत तीनदा वाढ केली तर मदर डेअरीने अनेकदा किंमतीत दुरुस्ती केली. २०२२ मध्ये अमुलने शेवटची दरवाढ ऑक्टोबर महिन्यात केली आणि तेव्हा त्याने दोन रुपये वाढविले होते. तर मदर डेअरने शेवटची दरवाढ डिसेंबर महिन्यात दोन रुपयांनी केली होती.

भारतातील स्टार्टअप इकोसिस्टीमने गेल्या एक दशकांत महत्त्वाचे बदल आणि परिपक्वता प्रस्थापित केली आहे. आता उद्योगांसाठी अधिक पोषक वातावरण तयार झाले आहे. सरकारने उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी आणि व्यापारात सुलभता आणण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. भारत आपल्या व्यापक आणि वाढत्या ग्राहक बाजारापेठेमुळे व्यवसायासाठी आणि विस्तारासाठी एक आवडीचे ठिकाण ठरत आहे. याचा परिणाम म्हणजे काही कारणांमुळे परदेशांमध्ये गेलेल्या भारतीय स्टार्टअप कंपन्यांची पावले आता मायदेशाकडे वळू लागली आहेत.

# भारतीय स्टार्टअपची घरवापसी

कोणत्या ना कोणत्या कारणाने परदेशात गेलेल्या (फ्लिप) अनेक भारतीय स्टार्टअप कंपन्या मायदेशी परतत असल्याची बातमी आली असून ती अर्थातच सुखावह आहे. कोणत्याही भारतीय कंपनीने फ्लिप करणे म्हणजे असा व्यवहार की यात संस्थापक हा कोणत्याही परकी कंपन्याच्या अधिकार क्षेत्रात आपल्या कंपनीची नोंदणी करतो आणि त्यास स्टार्टअप कंपनीची होल्डींग कंपनी म्हणून ओळखले जाते. या कार्यवाहीमुळे भारतीय स्टार्टअपची मालकी परदेशातील कंपन्याकडे जाते. 'रिव्हर्स फ्लिपिंग' म्हणजे परदेशी कंपन्यांच्या अधिकारात सामील असलेल्या स्टार्टअप कंपन्या आता भारतीय मालकी मिळवू इच्छित आहेत. अशा प्रक्रियेला रिव्हर्स फ्लिपिंग म्हणतात. अलिकडच्या काळात फ्लिप करणाऱ्या भारतीय स्टार्टअप कंपन्या अनेक आहेत. यात फोन पे, ग्रो यांचा समावेश आहे. फ्लिपकार्टबरोबरच जेप्टो आणि रेजर पे हे देखील फ्लिप करण्याचा प्रयत्न करत आहेत.




अर्थात फ्लिप करणाऱ्या कंपन्यांचे आवडचे ठिकाण सिंगापूर, मॉरिशस, केमॅन आयर्लंड आणि ब्रिटन राहिलेले आहे. त्याचवेळी भारतीय स्टार्टअप कंपन्या या फ्लिपिंगच्या माध्यमातून भारताच्या विनिमय कक्षेतून बाहेर गेल्या होत्या. त्यांनी आता एका व्यावसायिक विनिमय व्यवस्थेत येण्याची तयारी दर्शविली आहे. फ्लिप करणारे स्टार्टअप म्हणजे त्याचे संस्थापक भारतीय आहेत आणि त्यांनी भारतीय स्रोत, मनुष्यबळ, भांडवल आणि सरकारी मदतीतून आपला उद्योग उभारलेला असतो. फ्लिप करण्याचे म्हणजे भारताबाहेर जाण्याचे पहिले कारण म्हणजे भारतीय नियामक प्रणाली, भारतीय कर कायदे आणि भारतीय अधिकाऱ्यांच्या तपासणीपासून वाचणे. दुसरे म्हणजे विविध आंतरराष्ट्रीय गुंतवणुकदारांचा दबाव. या दबावातूनच कंपन्यांना परदेशात फ्लिप करण्यास प्रवृत्त केले जाते. तिसरे म्हणजे अमेरिका, सिंगापूरसारख्या अनेक देशांनी स्टार्टअप आणि गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आखलेले अनुकुल धोरण. चौथे म्हणजे स्टार्टअप कंपन्या या आपल्या शेअरंना परदेशात लिस्टेड करू इच्छितात आणि म्हणून ते फ्लिप करतात. कारण त्यांना अशा विचारांमुळे चांगले मुल्यांकन राहू शकते, असे त्यांना वाटत असते. स्पेशल पर्पस एक्झिबिशन कंपनी हे असेच आकर्षित करणारे मॉडेल असून या मॉडेलने अनेक स्टार्टअप कंपन्यांना अमेरिकेत लिस्टेड करण्यासाठी आपल्या कंपन्यांच्या माध्यमातून भाग पाडले. पाचवे म्हणजे करप्रणाली. या आघाडीवर भारतीय देशांर्तगत गुंतवणूकदारांना समान संधी मिळण्याची शक्यता कमी राहत असल्याने परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय गुंतवणूकदारांच्या तुलनेत अधिक लाभ उचलला.

भारतातून कंपन्यांनी फ्लिपिंग करण्याचा पहिला आणि सर्वात मोठा फटका म्हणजे मालमत्ता आणि भांडवल निर्मितीला बसतो. एखादी भारतीय कंपनी परकी अधिकार क्षेत्रात एखाद्या कंपनीची सहायक कंपनी किंवा एक परकी कंपनी होते तेव्हा आपले सरकार केवळ भांडवली कर महसुलापासून वंचित राहत नाही तर स्टॉक एक्स्चेंजवरही त्याचा परिणाम होतो. कंपनीच्या लिस्टिगने संभाव्य भांडवल उभारणीपासून आपला शेअर बाजार दूर राहतो. दुसरे म्हणजे परदेशात देशाची बौद्धिक संपदा स्थानांतरित होणे आणि डेटावरचा अधिकारही परदेशाकडे जातो. बौद्धिक संपदेतील भविष्यातील वाढ आणि विस्ताराचे सर्व लाभ परदेशात जातात. तिसरे म्हणजे फ्लिप करणारे स्टार्टअप भारतीय कर अधिकार क्षेत्र आणि अन्य नियामक व्यवस्थेतून बाहेर पडणे उद्योग क्षेत्रात निराशाजनक चित्र निर्माण करणारे राहते. याप्रमाणे हे स्टार्टअप परदेशात अन्य भारतीय समकक्ष कंपन्यांच्याा पातळीवर आघाडी घेतात. चौथे म्हणजे फ्लिप केलेले स्टार्टअपचे मुख्यालय परदेशात असते. परिणामी त्यांच्या फंडचा स्रोत जाणून घेणे कठीण राहते. ही देशासाठी मोठी जोखीम आहे. पाचवे म्हणजे स्टार्टअप फ्लिप करण्याचे नुकसान म्हणजे भारतीय शेअर बाजाराच्या विकासावर प्रतिकुल परिणाम होतो.

सरकारच्या दाव्यानुसार भारताची सक्षम वाढ देशांर्तगत स्टार्टअपच्या रुपातून 'रिव्हर्स फ्लिपिंग'ची मानसिकता विकसित करत आहे. एकेकाळी भांडवल मिळवण्यासाठी अणि कराचा लाभ उचलण्यासाठी याच कंपन्या परदेशात जाण्यासाठी प्राधान्य देत असत; पण त्या आता मायदेशी परतत आहेत. या नव्या प्रवाहास आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबरच आणखी काही कारणे असून या माध्यमातून रिव्हर्स फ्लिपिंगला चालना मिळत आहेत. भारतातील स्टार्टअप इकोसिस्टीमने गेल्या एक दशकांत महत्त्वाचे बदल आणि परिपक्वता प्रस्थापित केली आहे. आता उद्योगांसाठी अधिक पोषक वातावरण तयार झाले आहे. सरकारने उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी आणि व्यापारात सुलभता आणण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. भारत आपल्या व्यापक आणि वाढत्या ग्राहक बाजारापेठेमुळे व्यवसायासाठी आणि विस्तारासाठी एक आवडीचे ठिकाण ठरत आहे. भारतात उद्योग भांडवल निर्मिती अणि खासगी पातळीवरची इक्विटी व्यवस्था प्रणाली विकसित झाली असून ती भांडवलाच्या शोधात असलेल्या स्टार्टअपसाठी फंडिंगची संधी उपलब्ध करून देते. परदेशातील समकक्ष कंपन्यांच्या तुलनेत भारतीय स्टार्टअप कंपन्या अधिक कर भरत असल्याने प्रारंभीच्या काळात व्हिसी (व्हेंचर कॅपिटल) साठी समान संधी मिळत नसे. परंतु आर्थिक अधिनियम २०२१–२२ च्या माध्यमातून सरकारने भारतीय 'व्हीसी'साठी देखील भांडवल लाभावरचा सेस ३७ टक्क्यांवरून १० टक्के केला आहे. गिफ्ट सिटीच्या धोरणाने परदेशात जाणाऱ्या स्टार्टअपचे चित्र बदलले आहे. कारण आता या कंपन्यांना आपल्या शेअरंना परदेशात लिस्टेड करण्यासाठी फ्लिप करण्याची गरज भासत नाही. ते गिफ्ट सिटीच्या माध्यमातून अशा प्रकारची कृती करू शकतात.

**प्रा. डॉ. अश्वनी महाजन,**
**ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ**

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

शनिवार, दिनांक २० जुलै २०२४
आषाढ शु. १४, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू, साईबाबा उत्सव प्रारंभ, शिर्डी. संत मामा दांडेकर पुण्यतिथी., नक्षत्र : पूर्वाषाढा, योग : वैद्रुती, करण : गरज विष्टि, सूर्योदय : स.०६.१४ सूर्यास्त : सायं.०७.१६ वा., पौर्णिमा प्रारंभ सायंकाळी ५.५९ मि., राहू काळ : राहू काळ : सकाळी : ९:०० ते १०:३०

**दिनविशेष**

*१८२२ : सजीवांच्या आनुवंशिकतेची वैज्ञानिक उपपत्ती मांडणारे शास्त्रज्ञ ग्रेगोर मेंडेल यांचा जन्म. *१८८१ : संत गुलाब महाराज जयंती. *१९३७ : रेडिओचा शोध लावणारे मार्कोनी यांचा स्मृतिदिन. *१५३१ : श्रेष्ठ कवी व संत तुलसीदास यांचा जन्म.*अमेरिकेचा अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग चंद्रावर उतरला. *१८५३ : भारतीय खगोलशास्त्रज्ञ, ज्योतिर्विज्ञान यांसारखे ग्रंथ लिहिणाऱ्या शं. बा दीक्षित यांचा जन्म. *१९०५ : ब्रिटिश शासनाने बंगालची फाळणी करण्याचा निर्णय जाहीर केला. *१९०८ : बडोद्याचे महाराज सयाजीराव महाराज यांच्या पुढाकाराने बँक ऑफ बडोदाची स्थापना.*१९६९ : अपोलो ११ चे चंद्रावतरण यान ईगल चंद्रावर उतरले.*२००० : दिलीप कुमार यांना राजीव गांधी राष्ट्रीय सद्भावना पुरस्कार जाहीर.

**राशीभविष्य**

* **मेष** : गाठीभेटी, प्रवास, पत्रव्यवहारासाठी खूप धावपळ होईल. ***वृषभ** : कुटुंबाच्या आवडी–निवडी, गरजांकडे लक्ष द्याल. ***मिथुन** : उत्साहाने कामे कराल.***कर्क** : कामाचा कंटाळा येईल. ***सिंह** : आर्थिक लाभ होतील. ***कन्या** : मानसन्मान लाभेल. ***तुळ** : मोठे आर्थिक खर्च होतील. ***वृश्चिक** : सर्दी पडसे होईल. ***धनु** : सहकार्याचे वातावरण राहील. ***मकर** : कामे वाढतील. ***कुंभ** : संततीचा सहवास लाभेल. ***मीन** : महत्त्वाची कामे स्वत: हातावेगळी कराल.

**मेसेज आया**

'अरे, बरीच रात्र झाली. निघतो मी, किती वाजले असतील?' रामू म्हणाला. त्यावर श्यामू म्हणाला, 'माझ्याजवळ घड्याळ नाही. पण, जरा थांब.' असे म्हणून त्याने तबला वाजवायला सुरुवात केली. इतक्यात शेजारी जागा झाला आणि म्हणाला, 'बंद करा हा धांगडधिंगा. रात्रीचे अडीच वाजले आहेत. झोपू द्या लोकांना.'



**शिक्षिका** : काय रे गोपू, तू एखाद्या मोठ्या लढाईची माहिती सांगू शकशील का?
**गोपू** : माफ करा मॅडम, पण माझ्या आईने घरातील गोष्टी बाहेर सांगायच्या नाहीत, असे मला सांगितले आहे.

**व्यक्तीविशेष**

### ग्रेगोर मेंडेल

ग्रेगोर मेंडेल ऑस्ट्रीयन नैसर्गिक विज्ञानवेत्ता आणि सेंट ऑगस्टीन पंथातील मठप्रमुख होता. सजीवांच्या आनुवंशिकतेची वैज्ञानिक उपपत्ती मांडून त्याने आधुनिक आनुवंशिकतेच्या शास्त्राचा पाया घालण्याचे महत्कार्य केले. मेंडेलचा जन्म ऑस्ट्रीयातील हाइनझेनडॉर्फ येथे २० जुलै १८२२ रोजी झाला. १८४३ मध्ये ब्रुनो येथील सेंट ऑगर्स्टन पंथाच्या मठात तो दाखल झाला. तेथे धर्मशास्त्राबरोबरच त्यांनी कृषी, फळसंवर्धन, द्राक्ष वेलीची लागवड या विषयांचा अभ्यास केला. त्यांच्या काळात वनस्पती आणि प्राणी यांच्या जातीत कृत्रिम संकरणाने इच्छित संकर मिळवण्यात यश आले होते. पण एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे लक्षणे उतरण्याची प्रक्रिया (अनुहरण) कशी होते हे माहीत नव्हते. मेंडेलने या विषयावर संशोधन करण्यासाठी वाटाण्याच्या वनस्पतीचा आधार घेतला. मोठ्या प्रमाणावर वाटाण्याच्या वनस्पतीतील वैशिष्ट्ये त्यांच्या पुढील पिढ्यांतही दिसून येतात हे दाखवून दिले. माणसाच्या पिढ्यांमध्येही आनुवांशिकतेची वैशिष्ट्ये कशी उतरतात यावरही त्याने संशोधन केल; पण त्याची दखल कुणी घेतली नाही. त्यांच्या मृत्यूनंतर त्याची दखल घेण्यात आली आणि त्याला आधुनिक आनुवंशिकीचे जनक मानले गेले.

**जिज्ञासा**

### वेदनाशामकांचा शोध

वेदनाशामक औषध म्हणून आपण ॲस्परिनसारख्या गोळ्या घेतो. अशा वेदनाशामक औषधांचा वापर फार प्राचीन काळापासून होता. मात्र तेव्हाची औषधे वेगळी होती. ग्रीक आणि रोममध्ये विलो झाडाच्या सालीचा काढा ताप आल्यावर किंवा कळांच्या वेदना बंद करण्यासाठी घेतला जात असे. हा विलोचा काढा मलेरियावरही गुणकारी ठरतो असे १७६३ मध्ये रेव्हरंड एडवर्ड यांनी दाखवून दिले. नंतर या सालाच्या इतर अनेक गुणकारी घटकांवर अभ्यास करणयात आला. त्यातून सॉलीसिन हा घटक वेगळा केला. १८८० मध्ये त्यापासून सॉली सायलीक ॲसिड शास्त्रज्ञांनी तयार केले. त्याचीच पुढची पायरी म्हणजे १८५३ मध्ये ॲसिटील सॉलीसायलीक ॲसिड गेर्हार्टद याने बनवले. गंमत म्हणजे १८९९ पर्यंत ॲस्पिरिनचा वापर कोणी करत नव्हते. त्याचे गुण तोपर्यंत समजले नव्हते. बेअर कंपनीचे प्रमुख डॉक्टर ड्रेसर यांच्या मतानुसार औषध किती प्रमाणात वीज वाहक आहे यावर ते गुणकारी ठरेल की नाही हे ठरवले जात असे आणि दुर्दैवाने ॲस्पिरीन हे विजेचे दुर्वाह होते त्यामुळे ते गुणकारी ठरणार नाही. या विचारातून त्यावर बंदी घातली होती. पण त्यांच्याच कंपनीतील प्रमुख औषध निर्माता आर्थर आयशेनग्रुन याला मात्र हा विचार पटला नव्हता. त्यांनी या औषधाची पुन्हा तपासणी केली त्याचे निरनिराळ्या माणसांवर आणि स्वतःवरही प्रयोग केले. या प्रयोगातून हे औषध डोकेदुखी आणि संधीवात यावर उपयोगी पडते हे दाखले. स्पायरिंग नावाच्या झाडात सॉलीसायलेट असते त्यावरून ॲस्पिरीन हे नाव त्याने या औषधाला दिले. पण याचे श्रेय मात्र आर्थरला मिळाले नाही. त्याचा मालक ड्रसेर याने या औषधावर बराच पैसा कमावला.



**नवं संशोधन**

### वेळेचे व्यवस्थापन

अंग मोडून येते. असे लोक त्या उर्वरित वेळेत भरपूर तास काम करीत असल्याचा दावा करतात. पण जांभया देत केलेले ते काम परिपूर्ण होत नाही. तेव्हा पाच तास झोपून १५ तास असे काम करण्यापेक्षा भरपूर तास झोप घेऊन प्रसन्न मनाने आणि शरीराने आठच तास काम करावे. ते काम त्या पंधरा तासांपेक्षा चांगले असते आणि आरोग्यावर कसलाही दुष्परिणाम न करता ते होते. कमी झोप घेणे हे काही वेळेचे व्यवस्थापन नव्हे.

आठ तास काम केले तरीही ते सलगपणे करु नये. सलग काम करण्यानेही थकवा, आळस, कंटाळा येतो. पहिले एक–दोन तास छान काम होते, पण त्या दोन तासानंतर छोटीशी विश्रांती घेतली नाही आणि तसेच काम पुढे रेटले तर तिसऱ्या तासानंतर पुरेसे काम होत नाही. मात्र या आठ तासात थोडीशी विश्रांती घेतली, उठून चार पावले चाललो, कामापासून थोडे दूर गेलो, चहा प्यालो, तोंडावर पाणा मारुन आलो तर मन प्रसन्न होते. त्यानंतर केलेले काम पुन्हा प्रसन्न मनाने होत असल्याने ते भरपूर होते. बऱ्याच लोकांनी उत्तम कामाचे हे रहस्यच सांगितले आहे. वेळेचे व्यवस्थापन म्हणजे कमीत कमी वेळेत जास्त काम करण्याचे कौशल्य. आपला अनुभव असे सांगतो की, आपली कामे कोणत्या वेळेत करावीत यावर ते अवलंबून असते. आपण उष्ण कटीबंधात राहतो, पण आपण आपल्या कामाच्या वेळा उन्हे तापल्यानंतरच्या ठरवल्या आहेत. भारत देश मागे राहण्याचे हे एक मोठ कारण आहे. पहाटे आणि उन्हे तापण्याच्या आधी काम करुन पहा, तुमच्या असे लक्षात येईल की, पहाटे काम करण्याने थकवा येत नाहीय दुपारी ११ ते ५ ही आपली कामाची वेळ असते. या वेळेत हवेत उष्मा असल्याने जास्त काम होत नाही. (क्रमशः)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

क्रमांक १६९

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 3 | | 2 |
| | 4 | | 1 |
| | 1 | | 4 |
| 4 | 2 | | 3 |

क्रमांक १६८ चे उत्तर

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 4 | 3 | 2 | 1 |
| 4 | 3 | 1 | 2 |
| 2 | 1 | 4 | 3 |

**महिलायन**

### निवड टी शर्टची

ज्या महिला सडपातळ आणि फारसा जाड नसतात अशांनी बॉडी फिटींगचे टी शर्टस् वापरावेत. ज्या स्त्रियांची शरीरयष्टी प्रमाणपद्ध असेल त्या इंग्रजी आय अक्षराच्यासारखा स्ट्रेचेबल सॉफ्ट टी शर्ट वापरु शकतात. शरीरयष्टी स्थुल असेल अशा स्त्रियांनी सैल आणि थोडासा लांब टी शर्ट वापरावा. यामुळे पोटाचा घेर झाकला जाऊ शकतो. तरुण मुलींना कोणताही रंग, कोणतीही प्रींट अथवा टी शर्टचा कुठलाही प्रकार चांगला दिसतो. पण तरीही टी शर्ट घालताना आपण तो कुठल्या ठिकाणी घालणार आहोत, किती वेळ घालणार आहोत याचा विचार आवश्यक करावा आणि जे टी शर्ट अधिक आरामदायी वाटतील त्यांचीच निवड करावी.

लहान बाह्यांचे कॉलर असलेले टी शर्ट डेनिम आणि लोअफेयर्स यासोबत आकर्षक दिसतात. टी शर्टचा लूक वेगळा येण्यासाठी बिल्ट आणि शूजचा रंग एकच असावा. शूज फॉर्मल नसावेत तर सेमी फॉर्मल असावेत. पोले टी शर्ट निवडणार असाल तर यामध्ये मरुन, ग्रीन, नेव्ही ब्ल्यू हे रंग छान दिसतात. जीन्स, स्किन टाईट ड्रेनपाईप असेल तर त्यावर लाँग ग्राफिक टी शर्ट चांगला दिसतो. फुल बाह्यांचा पोलोराउंड नेकचा टी शर्ट घालणार असाल तर त्यासोबत लेअरींग छान दिसते. यासाठी आतला टी शर्ट ज्या रंगाचा असेल त्याच रंगाच्या गटातील बाहेरचा टी शर्ट असावा.

उदा. आतला टी शर्ट ब्राऊन रंगाचा असेल तर त्यावर ग्रीन ब्राऊन स्ट्रीप्स् असलेला टी शर्ट असावा. आपले एकूणच व्यक्तीमत्व बऱ्याचअंशी कपड्यांच्या डिझाईनवर आणि रंगसंगतीवर अवलंबून असते. हीच गोष्ट टी शर्टच्या निवडीबाबतही लक्षात ठेवावी.(उत्तरार्ध)

**गंमतग्यान**

### हॉट एअर बलून आकाशात कसा उडतो?

पायलटने बर्नर सुरू करताच ही कॉईल गरम होऊन प्रोपेन गरम होऊ लागतो. जसजशी गरम हवा बलूनमध्ये जमा होते तस तसा तो वर उडू लागतो. यामधील वायूचा दाब बलूनद्वारे विस्थापित केलेल्या हवेच्या प्रमाणाइतका असतो. याच कारणामुळे एका विशिष्ट सीमेनंतर हा बलून वर जात नाही. कारण उंची जशी वाढत जाते तसे हवेचे प्रमाण कमी होत जाते. अलीकडे हॉट एअर बलूनमध्ये नायलॉनची पाकिटं असतात. त्यांच्या खालच्या भागात आगीचा प्रतिकार करणाऱ्या तत्वांचा एक थर असतो. त्यामुळे बलूनमध्ये आग लागत नाही. या बलूनमध्ये पॅराशूटचे व्हॉल्व्ह उघडण्यासाठी एक कार्ड लावलेले असते. हे कार्ड उघडल्या नंतर गरम हवा बाहेर जावू लागते आणि हा बलून हळूहळू खाली येऊ लागतो. (उत्तरार्ध)

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## कार्बनडाय ऑक्साईडचे इंधनात रुपांतर



पृथ्वीचे तापमान वाढवणाऱ्या 'ग्रीन हाऊस गॅसेस'चे प्रमाण कमी करण्यासाठी टेक्सासमधील राईस युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी मोठे यश मिळवले आहे. त्यांनी अशा प्रदूषणकारी वायूंचे इंधनात रुपांतर केले आहे. शिवाय यासाठी वापरण्यात येणारा इलेक्ट्रोलायजर पूर्णपणे रिन्यूएबल विजेच्या सहाय्यानेच काम करील.

युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी यासाठी एक कॅटेलिक रिॲक्टर विकसित केले आहे. ते कार्बन डायऑक्साईडचा वापर करून त्याला शुद्ध आणि दाट फॉर्मिक ॲसिडमध्ये रुपांतरीत करते. राईस युनिव्हर्सिटीतील केमिकल आणि बायोमॉलेक्युलर इंजिनिअर हाओटिआन वांग यांनी सांगितले की, आतापर्यंत फॉर्मिक ॲसिड ज्या पद्धतीने बनवले जात होते त्यामध्ये त्याला स्वच्छ करण्यासाठी अतिशय महाग आणि अत्याधिक ऊर्जा वापरणाऱ्या क्रियेचा वापर होत असे.

आता कार्बन डायऑक्साईडला थटच शुद्ध आणि दाट अशा फॉर्मिक ॲसिडमध्ये रुपांतरीत करण्याची नवी पद्धत शोधण्यात आली आहे. त्यामुळे त्याचा व्यावसायिक उपयोगही केला जाऊ शकतो. वांग आणि त्यांचे सहकारी ग्रीन हाऊस गॅसेसना उपयुक्त वस्तूंमध्ये रुपांतरीत करण्याबाबत दीर्घकाळापासून काम करीत आहेत. वांग यांनी सांगितले की, फॉर्मिक ॲसिडला इंधन म्हणूनवापरुन वीज निर्माण केली जाते. तो पुन्हा रिसायकल करून त्याचे रुपांतर फॉर्मिक ॲसिडमध्ये केले जाऊ शकते. त्याचा वापर केमिकल इंडस्ट्रीमध्ये अन्य रसायनांसाठी फ्रीडस्टॉक म्हणूनही होऊ शकतो. तसेच तो हायड्रोजनसाठी स्टोरेज मटेरियल म्हणूनही वापरता येऊ शकतो.

## खुर्ची परिधान करून फिरा



अनेक ठिकाणी आपण उभे असतो. रांगेत उभे असतो, स्टेशनवर, बसस्टॉपवर, अगदी चहाच्या गाडीवर चहा घ्यायलाही उभेच रहावे लागते. थोडक्यात आपल्याला बराच काळ उभेच रहावे लागते. अनेक वेळा तर उभे राहून राहून पाय थकून जातात, त्यांना रग लागते. पण बसायला जागा मिळत नाही. अशा वेळी वाटते, आहे तिथेच जमिनीवर फतकल मारून बसावे. पण तसे बसायची सोय नसते, कारण आपल्याकडी अगाध स्वच्छता! मग काय उभे राहण्याशिवाय गत्यंतर नसते. अशावेळी वाटते आपल्याबरोबर खुर्ची घेऊन फिरता आले असते तर किती बरे झाले असते.. आपल्या मनीची इच्छा ब्रिटनमधील एका कंपनीने पूर्ण केली आहे.

किकस्टार्टर नावाच्या एका कंपनीने अंगात घालायची खुर्ची तयार केली आहे. तुम्ही जिथे जाल तिथे तुमच्याबरोबरच ती असेल आणि जेव्हा गरज भासेल तेव्हा तुम्ही ती उघडून त्यावर बसू शकतात. या खुर्चीला 'लेक्स' असे नाव देण्यात आले आहे. लेक्स ही बायोनिक खुर्ची आहे. तिला दोन ॲल्युमिनियमचे पाय आहेत. ते तुम्ही कंबरेला बांधायचे. आणि जेव्हा बसायची इच्छा होईल तेव्हा ते पाय सोडून त्यावरील कुशनवर बसायचे. ते ॲल्युमिनियमचे पाय तुम्हाला चांगला आधार देतात.

हे साधन लोकप्रिय होईल असे कंपनीला वाटते. कंपनीने या खुर्चीचा व्हिडीओही ट्रीटरवर टाकला आहे. शिवाय ही खुर्ची केवळ तुम्हाला कुठेही बसायची सुविधाच देते असे नाही तर तुमच्या शरीराची ठेवणही व्यवस्थित करते. चालताना किंवा बसताना पाठीच्या कण्याला बाक येऊ न देण्याचे काम करते. मात्र या खुर्चीचे पाय फोल्ड होत नाहीत. त्यामुळे कंबरेला ती बांधल्यावर मागच्या बाजूला ते पाय लोंबकळत राहतात आणि ते दिसायला विचित्र दिसते. अर्थात ज्यांना दिसण्यापेक्षा आपली सोयसुविधा महत्वाची वाटते, त्यांच्यासाठी ही खुर्ची वरदान ठरेल यात शंका नाही.

## हेल्मेट न बसणारे डोके



प्रत्येक नियमाला अपवाद असतो असे म्हटले जाते. मात, वाहतुकीच्या नियमांनाही अपवाद पाहायला मिळेल असे कधी कुणाला वाटले नसेल. गुजरातमधील एक माणूस असा अपवाद म्हणून समोर आला आहे. त्याचे डोके इतके मोठे आहे की, त्याच्या मापाचे हेल्मेटच त्याला मिळत नाहीये. त्यामुळे त्याच्याविरुद्ध कोणती कारवाई करायची, याबाबत पोलिसही गोंधळून गेले आहेत !

सध्या देशात नवा मोटार वाहन कायदा लागू झाल्यापासून दंडाच्या अव्वाच्या सव्वा रकमेमुळे तो चर्चेचा विषय बनलेला आहे. हजारो, लाखोंचाही दंड वाहनचालकांकडून आकारला जात आहे. अशा स्थितीत गुजरातमधील हा प्रकार लोकांचे लक्ष वेधून घेत आहे. गुजरातमधील छोटा उदयपूर येथे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पोलिसांची कारवाई सुरु होती. त्यानुसार दुचाकीवरुन जाणाऱ्या आणि हेल्मेट न घातलेल्या झाकीर मेमन नावाच्या एका व्यक्तीला पोलिसांनी थांबवले. मात्र, त्याची अडचण ऐकून त्यांनाही काय करावे हे कळेना.

'माझ्या डोक्याच्या आकाराचे एकही हेल्मेट शहरात नाही' असे त्याने पोलिसांना सांगितले. मी कायद्याचा आदर करणारा व त्याचे पालन करणारा माणूस आहे. नियमांचे उल्लंघन करणे मला आवडत नाही. आवश्यक सर्व कागदपत्रेही माझ्याकडे असतात. मात्र शहरात कुठेही माण्या डोक्याच्या आकाराचे हेल्मेट नाही, त्याला काय करू ? असा त्याचा सवाल आहे ! शेवटी पोलिसांनीही त्याच्याकडून दंड घेतला नाही.

## ४८ महिने वाट पाहणारे कुत्रोबा



कुत्रा आपल्या मालकाशी किती एकनिष्ठ असतो याच्या अनेक कथा, कहाण्या, अनुभव आपण ऐकले, वाचले असतील. अगदी अनुभवले देखील असतील. प्रत्येक वेळी कुत्रा या प्राण्याविषयी त्यामुळे ममत्वच वाटत आले आहे. ही कहाणी थायलंडमधील कुत्र्याची आहे. या कुत्र्याची आपल्या मालकाशी ताटातूट झाली होती. तो एकाच जागी ४ वर्षे आपल्या मालकाची वाट पाहत राहिला. शेवटी सोशल मीडियामुळे त्याची मालकाशी भेट झाली. लियो नावाचा हा कुत्रा थायलंडमधील खोन केईन या शहरात आपल्या मालकाची वाट पाहत होता. येणारे जाणारे लोक त्याला जंगली कुत्रा समजत होते. पण हा कुत्रा एकाच ठिकाणी अनेक महिन्यांपासून बसलेला पाहून लोक त्याचे फोटो काढू लागले. आणि ते फोटो सोशल मिडियावर पोस्ट करू लागले. त्याच्यावर चर्चाही होऊ लागल्या.

या शहरातील एक महिला साओवालक रोज या कुत्र्याला रस्त्याच्या कडेला बसलेला पाहत असत. त्याच्या शरीरावर अनेक ठिकाणी जखमा झाल्या होत्या. साओवालकनी त्याला आपल्या घरी आणले. त्याच्यावर उपचार केले. खाऊपिऊ घातले. काही दिवसांनी लिओ बरा झाला आणि पुन्हा त्यांच्या घरातून निघून गेला आणि आपल्या ठिकाणी येऊन बसू लागला. तेव्हा साओवालक यांनी त्याला तेथेच राहू दिले. पण रोज त्या त्याच्यासाठी अन्न ठेवून येत होत्या. लिओचे फोटो अनेक महिने सोशल मिडियावर व्हायरल होत राहिले. शेवटी ते बॉन बॉन या शहरातील नेंग नोई यांच्यापर्यंत हे फोटो पोहोचले. नेंग यांच्या मुलीने त्यांना हे फोटो दाखवले आणि त्यांना त्यांचा हरवलेला लिओ सापडला.

फेब्रुवारी २०१५मध्ये नेंग लिओला घेऊन त्यांच्या मुलीला भेटायला गेल्या होत्या. सिग्नलपाशी गाडी थांबली तेव्हा गाडीच्या खिडकीतून उडी मारून लिओ पळून गेला. त्याला ट्रॅफीकमधून शोधून आणणे अशक्य झाले. नंतरही त्याला नेंग यांनी खूप शोधले. पण तो सापडला नाही. तेव्हा त्या बॉन–बॉनला परत आल्या. चार वर्षांनंतर जेव्हा लिओचा फोटो त्यांनी पाहिला तेव्हा त्यांना रडू कोसळले. त्या आपल्या मुलीबरोबर लिओ ज्या ठिकाणी बसत होता, तेथे गेल्या. लिओने त्यांना लगेच ओळखले. नेंग लिओला घेऊन घरी परतल्या.

## किलबिलाटही भाषाच!



पक्ष्यांचा किलबिलाट किंवा कुत्र्याचे भुंकणे हे केवळ आवाज आहेत की, ती त्यांची भाषाही आहे, याबाबत दीर्घकाळापासून संशोधन होत आले आहे. आता संशोधकांनी म्हटले आहे की, पक्ष्यांचा किलबिलाट ही एक भाषाच आहे त्यामध्ये आपल्या भाषेसारखेच अक्षर, शब्द आणि वाक्ये असतात. पक्षीही माणसासारखेच आपल्या भाषेत बोलून संवाद साधतात.

'प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेज' या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पक्ष्यांच्या आवाजांमध्येही माणसाच्या भाषेप्रमाणेच छोटी अक्षरे असतात. ही अक्षरे एकत्र येऊन एखादा शब्द किंवा वाक्याचे रुप घेतात. स्वित्झर्लंडमधील ज्यूरिख विद्यापीठाच्या संशोधक सबरी एंगेजर यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांच्या एका पथकाने याबाबतचे संशोधन केले. त्यांनी विशेषत: ऑस्ट्रेलियन पक्षी 'चेस्टनट –क्राऊंट–बब्लर'च्या आवाजाने अध्ययन केले. मानवी भाषेप्रमाणेच त्यांच्या आवाजात वेगवेगळ्या भागांमध्ये विभाजित करता येऊ शकते. त्यांनी या पक्ष्यांच्या आवाजांमधील अक्षरेही ओळखली असून त्यांना 'ए' आणि 'बी' अशी संज्ञा दिली आहे.

हे पक्षी 'ए' आणि 'बी' ला विशेष क्रमाने ठेवून संवाद साधतात. ते ज्यावेळी उडणार असतात त्यावेळी 'एबी'चा आवज काढतात तर घरट्यातील पिलांना खाऊ भरवणार असतील तर 'बीएबी'चा ध्वनी काढतात. मानवी बाळांच्या आवाजांचे अर्थ काढण्यासाठी ज्या तंत्राचा वापर केला होता त्याच तंत्राचा यासाठी वापर झाला.

## डायनासोरच्या गुणसूत्रांची उकल



एके काळी पृथ्वीतलावर डायनासोरच्या विविध प्रजातींचेच साम्राज्य होते. कोट्यवधी वर्षांपूर्वीचे हे जीव कसे होते, याबाबत आजही सर्वसामान्यांपासून संशोधकांपर्यंत सर्वांनाच कुतुहल वाटते. हे जाणून घेण्यासाठी डायनासोरच्या डीएनए रचनेचा अभ्यासही महत्त्वाचा आहे. आता संशोधकांनी डायनासोरच्या काही लोकप्रिय प्रजातींच्या डीएनएची संपूर्ण संरचना डिकोड केली आहे. यामध्ये वेलोसिरॅप्टर आणि टी–रेक्ससारख्या प्रजातींचा समावेश आहे. प्रागैतिहासिक काळातील हे जीव नेमके कसे दिसत होते, त्यांचे जीवन कसे होते, याबाबत भविष्यकाळात या संशोधनामुळे मोलाची माहिती मिळू शकते.

ब्रिटनच्या केंट युनिव्हर्सिटीतील डॅरेन ग्रिफिन यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांच्या एका टीमने याबाबतचे संशोधन केले. त्यांनी वेगवेगळ्या पशू–पक्ष्यांचेही यासाठी अध्ययन केले. विशेषत: पक्षी आणि कासवांच्या जनुकीय संरचनेचा (जीनोम) त्यांनी अभ्यास केला. हे पक्षी आणि कासवं २६ कोटी वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात आहेत. डायनासोरच्या उत्पत्तीपूर्वी दोन कोटी वर्षांपासून या प्रजाती पृथ्वीतलावर अस्तित्वात होत्या हे विशेष. उत्क्रांतीच्या टप्प्यात सरीसृपांच्या पूर्वजांच्या गुणसूत्रांमध्ये कसे बदल होत गेले हे अभ्यासण्यात आले. डायनासोरच्या काळातील आणि सध्याही अस्तित्वात असलेल्या अनेक जीवांच्या गुणसूत्रांमध्ये फारसा फरक झालेला नसल्याचेही यामधून आढळले. सुरुवातीच्या काळातील डायनासोर आणि त्यानंतरचे थेरोपॉडस डायनासोर यांच्यामधील गुणसूत्रांचे पक्ष्यांमधील गुणसूत्रांशी साधर्म्य आहे.


## रंगीबेरंगी गाव



जगभरात अनेक रंगीबेरंगी गावं पाहायला मिळतात. काही गावं तेथील ग्रामस्थांनीच एखाद्या विशिष्ट किंवा वेगवेगळ्या रंगांमध्ये रंगवलेली आहेत. तैवानमध्ये एक गाव असे आहे जिथे एका चित्रकाराने आपल्या कलेच्या सहाय्याने सप्तरंगी रंगात रंगवलेले आहे.या माणसाचे नाव आहे हुआंग यंग. तो पहाटे तीन वाजताच उठून गावातील घरांच्या भिंतींवर पेंटिंग करणे सुरू करतो. तो गावात रोज चार तास पेंटिंग करतो. त्याची ही रंगीबेरंगी चित्रे अतिशय प्रसिद्ध झाली आहेत. हे गावही इतके प्रसिद्ध झाले आहे की दरवर्षी सुमारे दहा लाख लोक हे गाव पाहण्यासाठी येतात. हुआंगने गावातील भिंतींवर रंगीबेरंगी पक्षी, प्राणी, प्रसिद्ध व्यक्तींची चित्रे बनवलेली आहेत. त्याची ही मेहनत आता खरोखरच 'रंग लायी है'!

## जगातील अनोखी जंगले!

जंगलांचे संपूर्ण जीवसृष्टीसाठी महत्त्वाचे योगदान असते. ऑक्सिजनच्या पुरवठ्यासाठी किंवा जैवविविधतेच्या विकासासाठी जंगले महत्त्वाची असतात. मात, काही जंगले भयावह आणि रहस्यमयही आहेतट. अशाच काही जंगलांची ही माहिती...




- **ब्लॅक फॉरेस्ट :** जर्मनीतील या जंगलाचे 'ब्लॅक फॉज रेस' असे नावही भयावहच आहे. या जंगलाबाबत तिथे अनेक दंतकथा प्रचलित आहेत. मात, दक्षिण जर्मनीतीवल या जंगलात हायकिंगसाठी जाणारे साहसवीर आपला अनुभव सुंदर होता असेच सांगतात.



- **हेलेबोस फॉरेस्ट :** बेलिज्ञयममधील या जंगलामध्ये दरवर्षी वसंत ऋतूत सुंदर फंलांची चादरच पसरलेली असते. निळ्या, जांभळ्या रंगाच्या या फुलांनी हे जंगल एखाद्या परिकथेसारखे अद्भुतरम्य बनलेले असते.




- **गॉब्लिन फॉरेस्ट :** न्यूझीलंडमधील या जंगलात चमकणारी झाडे आहेत. या इिकाणी वर्षातून बहुतेक काळ पाऊस पडत असतो. त्यामुळे झाडांवर हिरवे शैवाल चढत असते. त्यामुळे या झाडांमधून रिवट चमक दिसून येते.




- **राटा फॉरेस्ट :** हे जंगलही न्यूझीलंडमध्येच आहे. तेथील झाडांचे वैशिष्टय म्हणजे ती अतिशय वेडीवाकडी आहेत. त्यांच्या सुकलेल्या फांद्यांमधून वाट काढणे अवघड होते. मात्र, या जंगलात हायकिंगससाठी अनेक मार्ग बनवलेले आहेत.



- **क्रुकेड फॉरेस्ट :** पोलंडमधील या जंगलातील झाडे खोडात वाकलेली आहेत आणि जणू काही नृत्य करीत असल्यासारखी दिसतात. त्यामळे त्यांना 'डान्सिंग ट्री' असेही म्हटले जाते. हे पाईन पृक्ष नैसर्गिकरीत्याच असे वाकलेले आहेत. त्याचे कारण अद्याप समजलेले नाही.




- **मॉस स्वॉम्प फोरेस्ट :** रोमानियामध्ये अनेक सुंदर डोंगर आणि जंगले आहेत. त्यामध्येच या जंगलाचा समावेश होतो. मात्र, तेथील बॉग मॉसने झाकलेल्या ठिकाणी जात असताना बरीच सावधगिरी बाळगावी लागते.




- **आओकीगहोरो :** जपानमधील हे जंगल माऊंट फिजीच्या पायथ्याशी आहे. त्याला 'झाडांचा समुद्र' असेही म्हटले जाते. अतिशय घनदाट असे हे जंगल असून तिथे धोका अधिक असतो.



- **होईया फॉरेस्ट :** रोमानियामधील या जंगलाची तुलना 'बर्म्युडा ट्रँगल'शीही केली जाते. याठिकाणी उडती तबकडी(युफो) अनोखे प्राणह आणि भूतंखेतंही पाहिली गेल्याचे दावे करण्यात आलेले आहेत. जंलाच्या मध्यभागी असलेल्या विचित्र गोळ्याविषयीही अनेक दंतकथा आहेत.



- **ओजारेटा फॉरेस्ट :** स्पेनमधील या जंगलातच गोर्बिया नॅचरल पार्क आहे. या सुंदर पार्कमध्ये अनेक प्राचीन वृक्षही आहेत. मात्र, येथील वातावरणात बऱ्याच वेळा धुके पसरलेले असते आणि एक रहस्यमय वातावरण निर्माण होते.



- **सिंगी फॉरेस्ट** मादागास्करमधील या जंगलात चुनखडीचे अनेक टोदार दगड आहेत. काही शिळा तर ७० मीटर उंचीच्या आहेत. येथील भूरचनाच या जंगलाला वेगळे बनवते.

## २१ हजारांपेक्षा अधिक महिलांनी भरले अर्ज

# 'लाडकी बहीण' योजनेला महिलांचा मोठा प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्वकांक्षी योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचे अर्ज स्वीकारण्यासाठी महापालिकेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या सुविधा केंद्रांवर महिलांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे दिसून येत आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १२३ सुविधा केंद्रांवर २१ हजारांपेक्षा अधिक महिलांनी मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरले आहेत. या योजनेचे अर्ज ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत असल्याने येत्या काळात मोठ्या प्रमाणात ही संख्या वाढणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली.



१२ जुलै २०२४ पासून ऑनलाईन पद्धतीने तर १७जुलै पासून ऑफलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार अ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत १८५२ अर्ज स्वीकारण्यात आले आहेत, ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत १५०३ अर्ज, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत १३०९ अर्ज, ड क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत २११५ अर्ज, ई क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत १५११ अर्ज, फ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत ११८८ अर्ज, ग क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत २४७० अर्ज, ह क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत १८३१ अर्ज तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सहयोगिनी मार्फत ३९३१ अर्ज आणि अंगणवाडी नागरी प्रकल्पामार्फत ३३७४ अर्ज भरण्यात आले आहेत.

महापालिकेच्या वतीने गुरुवारी सायंकाळी ४ वाजेपर्यंत एकूण ११ हजार ५०२ अर्ज ऑनलाईन तर ९५३८ अर्ज ऑफलाईन पद्धतीने भरण्यात आले आहेत.

> नागरिकांनी ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरताना अर्ज परिपूर्ण भरून आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत तसेच अचूक मोबाईल क्रमांक द्यावा. अर्ज भरण्यासाठी आवश्यक असलेल्या ओटीपीसाठी महापलिकेच्या वतीने विचारणा करण्यात आल्यास खात्री करूनच माहिती द्यावी
>
> -तानाजी नरळे, सहाय्यक आयुक्त, समाज विकास विभाग

या योजनेचे अर्ज स्वीकारण्यासाठी महापालिकेच्या वतीने १२३ सुविधा केंद्र, ८ऑफलाईन अर्ज स्वीकृती केंद्र, ८० कोपा पास कर्मचारी, ८१डाटा एन्ट्री ऑपरेटर, १०४ महापालिका शाळेतील डाटा एन्ट्री ऑपरेटर, २३७ महिला आर्थिक विकास महामंडळाचे सहयोगिनी अशी यंत्रणा कार्यरत आहे.

## चांदखेड पुलाच्या कामाला मंजुरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** अपघातग्रस्त असलेल्या चांदखेड पुलाच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. साडेतीन कोटींचा निधी मंजूर झाला असून, या पुलाच्या कामाचा प्रश्न सुटला आहे.

बहुचर्चित असलेल्या मारुंजी, कासारसाई, चांदखेड, बेबडओहोळ, परंदवडी, सोमाटणे या रस्त्याच्या दोन्ही बाजूला रुंदीकरण व खडी डांबरीकरणाचे काम चंदनवाडी घाट वगळता एक वर्षापूर्वी पूर्ण करण्यात आले. हे काम करताना अनेक ठिकाणी असलेल्या छोट्या ओढ्या नाल्यावर मोऱ्या टाकण्यात आल्या. परंतु या रस्त्यावरील दळणवळणासाठी महत्त्वाचा असलेल्या व सतत अपघाताला निमंत्रण देणाऱ्या चांदखेड येथील आढले नदीवरील पुलाच्या कामाकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने वाहतुकीसाठी हा पूल धोकादायक झाला होता. या पुलावर अपघाताचे प्रमाण वाढल्याने पुलाचे काम तातडीने करावे, अशी मागणी चांदखेड येथील नागरिकांनी केली होती.

### Selected



## सांगवी-बोपोडी पुलाच्या जोड रस्त्यांची कामे प्रलंबित

**जुनी सांगवी :** जुनी सांगवी येथील मुळा नदी पुलावरील सांगवी-बोपोडी पुलाचे काम पूर्णत्वाकडे आले आहे. किरकोळ कामे व पुलाची भार चाचणी पूर्ण करून हा पूल रहदारीसाठी खुला होईल. मात्र, जोड रस्ते लवकर मार्गी न लागल्यास या भागात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर, पूल तयार झाला; तर जोड रस्त्यांचे काय ? असा प्रश्न निर्माण होत आहे. मुळा नदी किनारा रस्ता परिसरात गेली तीस ते चाळीस वर्षांपासून कष्टकरी, कामगार वर्गासह रहिवाशांची घरे आहेत. २०१२ मधे येथे रूंदीकरण कारवाईत राहती घरे बाधित झाली होती. तर वेळोवेळी येथील आराखडा बदलण्यात आला. भूसंपादन एका बाजूने करण्याऐवजी दोन्ही बाजूंनी करावे. त्यामुळे, एका बाजूची काही घरे व जागा वाचतील, असे रहिवाशांचे म्हणणे आहे.



## लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना शरदचंद्र पवार गटाकडून अभिवादन

**पिंपरी :** लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार, कष्टकरी संघर्ष महासंघ महाराष्ट्र,नॅशनलिस्ट ट्रेड युनियन फेडरेशनतर्फे चिंचवड येथील कार्यालयामध्ये अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी संघटित कामगार विभागाचे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ नखाते, सचिव तुषार घाटूळे, सलीम डांगे,ओमप्रकाश मोरया,चंद्रकांत कुंभार, अनिल जाधव,विद्या सोनवणे, अंजना कांबळे आदी कामगार बांधव उपस्थित होते. यावेळी नखाचे म्हणाले की अण्णाभाऊ कापड गिरणीतही काम केले. १९३४ चा मुंबईत लाल बावटा गिरणी कामगार युनियनच्या नेतृत्त्वाखाली ऐतिहासिक संप झाला. त्या संपात ते कामगार म्हणून प्रत्यक्ष सहभागी होते.त्या संपात शिवडी परिसरात कामगार व पोलिसात जी आंदोलनात झटापट-चकमक झाली,त्याचेही ते साक्षीदार होते.

## वाहनांची तोडफोड करून एकास लुटले, गुन्हा दाखल

**पिंपरी :** वाहनांची तोडफोड करून त्याबाबत जाब विचारणाऱ्या व्यक्तीला तिघांनी मिळून लुटले. शिवीगाळ करत पोलिसात तक्रार दिल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन आरोपी निघून गेले. अनिकेत विश्वकर्मा आणि त्याच्या दोन साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी दिलीप गुलाबराय सबनानी (वय ४२, रा. नढेनगर, काळेवाडी) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सबनानी यांना त्यांच्या घराबाहेर काचा फुटण्याचा आवाज आला. त्यामुळे ते बाहेर गेले. घराबाहेर पार्क केलेल्या त्यांच्या कारची काच फोडल्याचे दिसल्याने त्यांनी आरोपींना माझ्या कारची काच का फोडली, असे विचारले. त्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ केली. लोखंडी रॉडने मारण्याची धमकी देऊन फिर्यादी यांच्या खिशातून ७०० रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली.

## ज्येष्ठ नागरिक संघाला मिळाली हक्काची जागा

**पिंपरी :** ज्येष्ठ नागरिक संघ, विकासनगर किवळे या संघाला पीसीएमसी नवीन नियोजित इमारतीत पाचव्या मजल्यावरील हॉलमध्ये कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे जागेअभावी होणारी गैरसोय आता थांबली असून, अठरा वर्षानंतर स्वतःची हक्काची जागा मिळाल्याने संघाच्या सर्व सदस्यांनी आनंद व्यक्त केला. महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ यांच्या हस्ते फीत कापून दीपप्रज्वलन करून नवीन हॉलमध्ये सर्वांनी प्रवेश केला.

### राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## शहरात आढळले डेंग्यूचे २३ रुग्ण

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रात डेंग्यु आजाराच्या निदानासाठी एकुण ३००२ संशयित रुग्णांचे रक्तजल नमुने तपासणीसाठी पाठविले होते. त्यामध्ये डेंग्यू आजाराचे २३ आढळून आले आहेत. या रुग्णांपैकी ११ पुरुष व १२ महिला रुग्ण आहेत. आकुर्डी येथील विवेकनगर परिसरातील रहिवाशी सोसायटी मधील ३ रुग्णांना डेंग्यू सदृष्य आजाराची लक्षणे असल्याने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर रुग्ण सद्यस्थितीत डेंग्यू संशयित असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. रुग्णांचा डेंग्यू चाचणीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. वैद्यकीय विभागामार्फत सदर रहिवाशी सोसायटी व शेजारील रहिवाशी सोसयटी येथे किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण केले असता त्यांच्या शेजारी बांधकाम साईट येथे डेंग्यू आजारास कारणीभूत असलेल्या डासांच्या अळ्या आढळून आलेल्या आहेत. या ठिकाणी औषध फवारणी,औष्णीक धुरीकरण करुन डासांची उत्पत्ती स्थाने नष्ट करण्यात आले. तसेच बांधकाम विकसकाकडून १० हजार इतका दंड वसूल करण्यात आला आहे.




## गजर विठूरायाचा...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**चिंचवड :** आषाढी एकादशीनिमित्त प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

## प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलमध्ये रंगला पालखी सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** चिंचवड येथील कमला शिक्षण संकुलाचे संस्थापक सचिव डॉ.दीपक शहा यांच्या प्रेरणेने, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सविता ट्रॅव्हीस यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांनी पालखी मिरवणूक काढली. इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त शालेय व नागरी परिसरात दिंडीची वाजत-गाजत मिरवणूक काढली. शालेय विद्यार्थ्यांनी विठू नामाचा गजर करत माऊली, माऊली नामाचा जयघोष केला.

विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी "हरी पांडुरंग हरी" या गीतावर नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांना नृत्य शिक्षक सागर पवार व भारती सोनार व संगीत शिक्षक अथर्व शिंदे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमास प्राचार्या सविता ट्रॅव्हीस, उप-प्राचार्या, लिजा सोजू, समन्वयक गुलनाज खान व अमृता कांबळे उपस्थित होत्या. विविध मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाची स्तुती केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिता पाटील यांनी केले.

# शहरात सीएनजी गॅस निर्मिती प्रकल्प कार्यान्वित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शहरात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया (Bhosari) करून सीएनजी गॅस निर्मिती करणारा प्रकल्प महापालिकेने मोशी येथे उभारला आहे. त्यासाठी हॉटेल्स, मंगल कार्यालय, रेस्टॉरंट धारकांनी १०० टक्के ओला कचरा विलगीकरण करून महापालिकेच्या ओला कचरा संकलित करणाऱ्या विशेष वाहनातच टाकावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.



महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील आयुक्त यांच्या दालनात हॉटेल व्यावसायिक संघटनांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उप आयुक्त मनोज लोणकर, संदीप खोत, अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंग बन्सल, अग्निशमन अधिकारी ऋषिकेश चिपाडे यांच्यासह विविध हॉटेल संघटनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

शहरात निर्माण होणाऱ्या विविध कचऱ्याचे व्यवस्थापन करून योग्य विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेच्या वतीने मोशी येथे कचऱ्यापासून उर्जा निर्मिती करणारा प्रकल्प उभारण्यात आला आहे. याच ठिकाणी हॉटेल वेस्ट मधील ओल्या कचऱ्यापासून सीएनजी वायू निर्मितीचा प्रकल्प साकारण्यात आला आहे. यासाठी शहरातील हॉटेल्स, मंगल कार्यालये, रेस्टॉरंट, खानावळ, कॅन्टीन, खाद्यपदार्थ विक्रीची दुकाने अशा ठिकाणी निर्माण होणारा ओला कचरा महापालिकेच्या विशेष वाहनाद्वारे संकलित करण्यात येत आहे. संकलित करण्यात आलेल्या ओल्या कचऱ्यावर मोशी येथील कचरा डेपो येथे प्रक्रिया करून सीएनजी वायू तयार करण्यात येत आहे. त्यासाठी १०० टक्के ओला कचरा विलगीकरण करणे आवश्यक आहे.

जेणेकरून शुद्ध सीएनजी तयार करण्यास मदत होईल. त्यामुळे शहरातील हॉटेल्स, मंगल कार्यालये, रेस्टॉरंट, खानावळ, कॅन्टीन, खाद्यपदार्थ विक्रीधारकांनी आपल्या व्यवसायात निर्माण होणारा ओला कचरा १०० टक्के विलगीकरण करून विशेष वाहनातच टाकावे, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी केले आहे.

## सिग्नलवरच प्रवाशांना उतरवणे ठरतेय धोकादायक

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पीएमपी बस बीआरटी मार्गिकेतून जाताना प्रवाशांना बस थांब्यावर उतरविण्याऐवजी सिग्नलवर उतरविले जाते. दरम्यान, अशाप्रकारे अचानक बसमधून प्रवासी उतरल्याने पाठीमागून येणाऱ्या वाहन चालकांचा गोंधळ उडतो. अपघाताचा धोकाही निर्माण होतो.

बीआरटी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसमध्ये बसण्यासाठी व उतरण्यासाठी ठिकठिकाणी थांबे उभारलेले आहेत. या थांब्यावर बस थांबवून सुरक्षितरित्या प्रवाशांना उतरविणे आवश्यक आहे. मात्र, काही बसचालक सिग्नलवर बस थांबविल्यानंतर प्रवाशांना उतरायला लावतात. दरम्यान, बसमधून उतरणाऱ्या प्रवाशांचे पाठीमागून येणाऱ्या वाहनांकडे लक्ष नसते. तसेच पाठीमागून येणाऱ्या वाहन चालकालाही अचानक बसमधून उतरणाऱ्या प्रवाशाचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण होतो. त्यामुळे बस चालकांनी निश्चित करून दिलेल्या थांब्यावरच प्रवाशांना उतरविणे आवश्यक आहे.

### पाणीपातळीत विक्रमी वाढ

# पवना धरण परिसरात पावसाचा जोर वाढला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मागील काही दिवसांपासून पवन मावळ भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे पवना धरण क्षेत्रात पाण्याची आवक वाढली आहे. शनिवार - रविवार दोन दिवस झालेल्या जोरदार पावसामुळे पवना धरणाच्या पाणीसाठ्यात कमालीची वाढ झाली असून धरणाचा पाणीसाठा ३३ टक्क्यांच्या पार गेला आहे.

आत्तापर्यंत झालेल्या पावसात पिंपरी-चिंचवड शहरासह मावळकरांची तहान भागविणाऱ्या पवना धरणात ३३.२६ टक्के इतका पाणीसाठा झाला आहे. पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस होत असल्याने धरणातील पाणीसाठ्यात घसघशीत वाढ होत आहे. सोमवारी सकाळी ६ वाजता घेतलेल्या नोंदीनुसार २४ तासात पवना धरण परिसरात ८१ मी.मी. इतक्या पावसाची नोंद झाली असून १ जूनपासून ७४३ इतका पाऊस झाला आहे. पवना विभागाचे उपविभाग अभियंता अशोक शेटे यांनी ही महिती दिली.



**दिवसाला ६१५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा :** पालिका दिवसाला पवना धरणातून ५२०, आंद्रातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) १५, असे ६१५ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी उचलते.

> धरणात पुरेसा पाणीसाठा आहे. जुलै महिन्यात पाण्याची कोणतीही अडचण येण्याची शक्यता नाही. पाऊस पडण्याचा अंदाज आहे. त्यामुळे तूर्तास पाणी कपातीची आवश्यकता नाही. जुलै महिन्यातील पावसाचा अंदाज घेऊन परिस्थितीनुसार पाणी कपातीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, महापालिका

#रा

# नवीन मालमत्तांसाठी कर आकारणीची कार्यपध्दती जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्यावतीने अत्याधुनिक ड्रोनच्या माध्यमातून शहरातील नवीन, वाढीव आणि वापरात बदल झालेल्या अशा मालमत्तांचे सर्वेक्षण सुरू आहे. या सर्वेक्षणामुळे मालमत्तांची अचूक माहिती आणि करयोग्य मूल्य निश्चित केले जाणार आहे. नव्याने आढळणा-या मालमत्तांसाठी पालिकेच्या वतीने कर आकारणीची कार्यपध्दती जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये गेल्या सहा वर्षांपासून मालमत्ताधारकांना कराची आकारणी केली जाणार आहे. मात्र, मालमत्ता कधी उभारली, याची योग्य कागदपत्रे सादर केल्यास तेव्हापासूनच कराची आकारणी केली जाणार असल्याचे महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत इमारत व जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी व वसुली कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार शहरातील कर कक्षेत नसलेल्या मालमत्तांना कर कक्षेत आणण्यासाठी महापालिकेच्या वतीने मे. स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि. कंपनी मार्फत ड्रोनच्या सहाय्याने सर्वेक्षण सुरू आहे. या सर्वेक्षणात नविन, वाढीव, वापरात बदल अशा मालमत्ता आढळणार आहेत. या मालमत्तांसाठी कर आकारणीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. आढळलेल्या इमारत, मोकळ्या जमीन यांना सुलभ व सलग क्रमांक देण्यात येणार आहेत. सर्व मालमत्तांची अंतर्गत बिनचूक मोजमाप होणार आहे. मालमत्तेचे चटई क्षेत्र (कारपेट) घेण्यात येणार असून त्यावर २० टक्के बिल्टअप आकारले जाणार आहे.

मालमत्तेची मोजमापे चौरस मीटर पद्धतीने होणार आहे. कर आकारणीसाठी मालमत्तेचा बांधकाम दर्जा, वापर, क्षेत्रफळ विचारात घेण्यात येणार आहे. तसेच मालमत्ता अधिकृत किंवा अनधिकृत आहे, याचीही माहिती घेतली जाणार आहे.

## मालमत्तेचे असे होणार करयोग्य मुल्यांकन

● सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन मालमत्तांचे कर आकारणीसाठी मालकी हक्क, बांधकाम पूर्णत्व, भोगवटा या संबंधीची कागदपत्रे उपलब्ध न झाल्यास संबंधित मालमत्तेचे मालक, भोगवटादारांना महापालिका अधिनियमाप्रमाणे कागदपत्रे मागणीपत्र द्यावयाचे आहे. आकारणी न झालेल्या नविन, वाढीव, वापर बदल मालमत्तांचे करयोग्य निश्चिती करण्यासाठी चालू आर्थिक वर्षाच्या दरपत्रकानुसार बांधकाम दर्जा, क्षेत्रफळ, वापर, बांधकाम प्रकार विचारात घेऊन मालमत्तेच्या करयोग्य मुल्याचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. ज्या मालमत्तावर यापूर्वी आकारणी झाली आहे. त्यांच्या करयोग्य मुल्यात कोणताही बदल होणार नाही. कर आकारणीसाठी बांधकाम कधी झाले याबाबत सबळ पुराव्याची कागदपत्रांचे ग्राह्य धरली जाणार आहेत. कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्यास नियमानुसार जास्तीत जास्त ६ वर्षे मागे जाऊन कर आकारणी केली जाणार आहे. मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत कागदपत्रानुसार मालक, भोगवटादार यांचे नाव नोंदवावे. मात्र कागदपत्रे उपलब्ध न झाल्यास सद्यस्थितीत भोगवटा करीत असलेल्या भोगवटादाराच्या "धारक" नावाने आकारणी केली जाणार आहे. मालमत्ता कर आकारणीची विशेष नोटीस, तसेच मोठ्या निवासी मालमत्तेस फलोरेज कर नोटीस देण्यात येणार आहे. त्यानंतर करयोग्य मूल्य विभागीय कार्यालय स्तरावर निश्चित करून कर आकारणीची विशेष नोटीस तयार केली जाणार आहे.

**मालमत्ता कर आकारणी विशेष नोटीसवर सुनावणी झाल्यानंतर आवश्यकतेनुसार स्थळ पाहणी करून करयोग्य मूल्य निश्चित केले जाणार आहे. मालमत्ता धारकास विशेष नोटीस मधील आकारणी मान्य असल्यास लेखी पत्राद्वारे किंवा ऑनलाईन पद्धतीने संमती देता येईल. त्यानंतर अशा मालमत्ता धारकास करयोग्य मुल्य निश्चिती आदेशाची विशेष नोटीस दोन समक्ष, अथवा ऑनलाईन पद्धतीने देण्यात येणार आहे. मालमत्तेचे करयोग्य मुल्य निश्चित झाल्यानंतर मालमत्ताधारकास बिल समक्ष किंवा ऑनलाईन पद्धतीने देण्यात येणार आहे.**

-शेखर सिंह, महापालिका आयुक्त तथा प्रशासक

## टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** दुचाकीला भरधाव टेम्पोने धडक दिली. त्यात दुचाकीस्वार जखमी झाला आहे. हा अपघात १५ जुलै रोजी सायंकाळी क्वालिटी सर्कल चौक, भोसरी येथे घडला.

ओमकार नंदुकुमार घेवडेकर (वय २२, रा. चिखली) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. त्यांनी याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात टेम्पो चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी घेवडेकर हे त्यांच्या दुचाकी (एमएच १४/एलसी ९४९१) वरून इंद्रायणीनगर भोसरी येथे बँकेत जात होते. क्वालिटी सर्कल चौकात आल्यानंतर त्यांच्या पाठीमागून आलेल्या भरधाव टेम्पोने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यात घेवडेकर गंभीर जखमी झाले. त्यानंतर टेम्पो चालक घटनास्थळावरून पळून गेला. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

Selected




## जिज्ञासा परिषदेत सहाशे सीए विद्यार्थांचा सहभाग

**पिंपरी :** आयसीएआय पिंपरी चिंचवड शाखा अंतर्गत सीए विद्यार्थी परिषदेच्या वतीने सीए विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय परिषदेमध्ये देशभरातून सहाशे सीए विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी आयसीएआयचे केंद्रीय सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, सीए अभ्यासक्रम मंडळाच्या अध्यक्ष राजकुमार अडुकिया, सीए विद्यार्थी परिषदेचे पश्चिम विभागाचे अध्यक्ष पियुष चांडक, वसंत ग्रुप चे संचालक अनिल मित्तल, पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्ष पंकज पाटणी, विकासा अध्यक्ष सचिन ढेरंगे, उपाध्यक्ष वैभव मोदी, सचिव सारिका चोरडिया, खजिनदार शैलेश बोरे, माजी अध्यक्ष सचिन बन्सल, सुहास गार्डी, विजयकुमार बामणे, सुनील कारभारी, चंद्रकांत काळे, प्रसाद सराफ, बबन डांगले आमोद भाटे आदी मान्यवर उपस्थित होते.



## लेट पासिंगसाठी आकारलेली दंडाची रक्कम परत करा

**पिंपरी :** रिक्षांना परिवहन विभागाच्या अंतर्गत फिटनेस सर्टिफिकेट पासिंग साठी दररोज पन्नास रुपये दंड आकारण्यात आला होता; परंतु महाराष्ट्र रिक्षा पंचायत ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशनच्या पाठपुराव्याला यश आले आहे. हा दंड रद्द केल्याने यापूर्वी दंडाची रक्कम भरलेल्या रिक्षा चालकांना दंडाची रक्कम परत करावी, अशी मागणी फेडरेशनने केली आहे. महाराष्ट्र रिक्षा पंचायत प्रदेश युवक अध्यक्ष शुभम तांदळे यांनी पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाचे संदेश चव्हाण यांच्याकडे लेखी पत्रकाद्वारे केली आहे महाराष्ट्र सरकारने विधानसभेमध्ये नुकतीच घोषणा करून लेट फिटनेस पासिंग साठी दररोज येणारा पन्नास रुपये रद्द करण्याची घोषणा केली असून याबाबत परिवहन विभागाने परिपत्रक काढून हा दंड रद्द केला आहे.

## मावळातील अनधिकृत शाळांवर कारवाईची मागणी

**मावळ :** मावळ तालुक्यात एकूण चार शाळा अनधिकृत असल्याचे शासनाने घोषित केले आहे. त्यामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण असून यात आमची चूक काय? असा सवाल पालकवर्ग करीत आहेत. तालुक्यातील चार शाळा अनधिकृत असल्याची माहिती असताना देखील त्यांच्यावर आजवर कारवाई का करण्यात आली नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर सह्याद्री विद्यार्थी अकादमी मावळ यांच्या वतीने गटशिक्षणाधिकारी एस.आर. वाळुंज यांना निवेदन देण्यात आले आहे.

## महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी चंद्रकांत इंदलकर

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रिक्त असलेल्या



अतिरिक्त आयुक्त (३) या पदाचा पदभार सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्याकडे सोपविण्यात आला असून याबाबत सामान्य प्रशासन विभागाने स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.

अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी २० सप्टेंबर १९८८ रोजी वायरलेस ऑपरेटर या पदापासून महापालिका सेवेची सुरूवात केली, त्यानंतर त्यांनी २० जुलै २०११ रोजी कामगार कल्याण अधिकारी, १६ जुलै २०१६ रोजी सहाय्यक आयुक्त, १४ ऑक्टोबर २०२० रोजी उप आयुक्त तसेच १९ मे २०२३ रोजी सह आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारला होता.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## नवयुग साहित्यच्यावतीने कविता स्पर्धेचे आयोजन

**पिंपरी :** नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळाच्यावतीने ३१ व्या श्रावणी काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून इच्छुक कवींनी ३१ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत आपल्या कविता पाठवाव्या, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष राज अहेरराव यांनी केले आहे. सदर




काव्यस्पर्धेत काव्यलेखनासह प्रत्यक्ष सादरीकरणाचे गुण ग्राह्य धरले जाणार असून कवितेला विषयाचे बंधन नाही. कविता वीस ओळींपेक्षा दीर्घ असू नये. कवितेच्या आधी 'नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ आयोजित श्रावणी काव्यस्पर्धा ३१' असा उल्लेख करून शीर्षक, कविता, कवीचे संपूर्ण नाव, परिसर आणि संपर्क क्रमांक नमूद करावा. कवितेतून कोणत्याही प्रकारची राजकीय, सामाजिक, जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क नाही. पारितोषिकप्राप्त कवींना रोख रक्कम, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ प्रदान करून सन्मानित करण्यात येईल. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. कविता व्हॉट्सॲपवर टाईप करून नवयुग सहसचिव अश्विनी कुलकर्णी यांना ९२२६१२५९४९ या व्हॉट्सॲप क्रमांकावरच पाठवावी. कागदावर लिहून त्याचा फोटो काढलेल्या कविता ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. मुदतीत पाठवलेल्या कविता स्पर्धेसाठी पात्र ठरतील. श्रावणी काव्यस्पर्धा ११ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ठीक ३ वाजता पिंपरी – चिंचवड परिसरात आयोजित करण्यात येणार असून कार्यक्रमाचे स्थळ स्पर्धकांना आठ दिवस आधी कळविण्यात येईल.

## अग्निशमन प्रशिक्षण...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** अग्निशमन विभागाकडून महापालिकेच्या काळभोरनगर माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आग रोखण्याबाबत प्रात्यक्षिके देण्यात आली.

# महापालिकेच्या विद्यार्थ्यांना अग्निशमन प्रशिक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड अग्निशमन विभागाकडून महापालिकेच्या काळभोरनगर माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आग रोखण्याबाबत प्रात्यक्षिके देण्यात आली. आगीसारखा बाका प्रसंग उद्भवल्यास काय खबरदारी घ्यावी, याची माहिती अग्निशमन दलाच्या जवानांनी दिली. यावेळी सुमारे ६० विद्यार्थी, शाळेतील शिक्षक उपस्थित होते.

प्राधिकरण अग्निशमन उपविभागाचे फायरमन अनिल माने, विशाल पोटे, ट्रेनी ऑफिसर शुभम पिंपळे, ट्रेनि फायरमन साहिल देवगडकर, शिवाजी पवार, वाहन चालक विजय चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. आगीसारखी दुर्घटना घडल्यानंतर तात्काळ आग विझवण्यासाठी शाळेमध्ये ठीक ठिकाणी फायर एक्स्टींग्यूशर (अग्निशामक यंत्र) बसवलेले असते. मात्र ते कसे चालवायचे याबाबत प्रशिक्षण नसल्याने अनेकदा मोठी दुर्घटना घडते.

तसेच एखाद्या ठिकाणी आग लागल्यानंतर तिथून सुरक्षित ठिकाणी कसे पोहोचावे. तसेच इतरांची मदत कशाप्रकारे करावी, याबाबत अग्निशमन दलाच्या जवानांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. अग्निशमन दलाच्या जवानांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखविली. तसेच विद्यार्थ्यांचा सरावही करून घेतला.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची धडक कारवाई

# पूजा खेडकर कुटुंबियांची थर्मोव्हेरिटा प्रा. लि कंपनी सील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी-चिंचवड :** तळवडे येथील खेडकर कुटुंबाशी संबंधित असलेली आणि पालिकेचा कर थकविल्याबद्दल वादग्रस्त कंपनी थर्मोव्हेरिटा प्रायव्हटे लिमिटेडला महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि.१९) सील ठोकले आहे. या कंपनी संचालकाकडे महापालिकेचा दोन लाख ७७ हजार रूपयांची कराची थकबाकी आहे.

तळवडे गावठाण, ज्योतिबानगर येथे थर्मोव्हेरिटा प्रायव्हटे लिमिटेड ही कंपनी आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्या कुटुंबाशी निगडीत आहे. त्यामुळे कंपनी वादाच्या भोव-यात अडकली आहे. कंपनी म. दि. खेडकर यांच्या नावे आहे. महापालिकेने यासंदर्भातची सर्व कागदपत्रे तपासली आहेत.



कंपनीमार्फत २००९ पासून व्यावसायिक कर भरला जात होता. शेवटचा कर २०२२ मध्ये भरण्यात आला. त्यानंतर कर भरला नाही. कंपनीकडे दोन लाख ७७ हजार २८१ रूपयांचा कर थकविला आहे. त्यामुळे नियमानुसार मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने करण्यात आली. कारवाईवेळी प्रशासन अधिकारी नाना मोरे, एल. एम काळे संबंधित गटलिपिक, एमएसएफ जवान उपस्थित होते.

# आणखी एका अनधिकृत शाळेवर गुन्हा

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने अनधिकृत शाळांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. चिंचवडमधील लिटील स्टार इंग्लिश मीडियम स्कूल आणि ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूल या दोन अनधिकृत शाळांपाठोपाठ आता पिंपळे गुरव येथील आयडियल इंग्लिश मीडियम स्कूल या शाळेवरही गुन्हा दाखल केला आहे.

महापालिकेच्या शिक्षण विभागाचे प्राधिकृत अधिकारी विलास दयाराम पाटील (रा. नवी सांगवी) यांनी सांगवी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चंद्रकांत खोडदे (रा. जवळकरनगर, पिंपळे गुरव) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. एप्रिल २०२४ पासून अद्यापपर्यंत शाळेचे संचालक चंद्रकांत खोडदे यांनी शासनाने ठरवून दिलेल्या कोणत्याही नियम व अटीची पूर्तता केली नाही. अनधिकृतपणे विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन पालकांकडून फी वसूल केली. शाळा अनधिकृत असताना अधिकृत असल्याचे भासवले. तसेच विद्यार्थ्यांचे दाखले व इतर शैक्षणिक कागदपत्रे ताब्यात घेऊन फसवणूक केली आहे.

## महापालिकेचे शहरवासियांना आवाहन

# डेंग्यू मुक्तीसाठी आठवड्यातील एक तास द्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील डेंग्यूसारख्या किटकजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेने मोहिम हाती घेतली आहे. प्रत्येक आठवड्यातील १ दिवस १ तास ही मोहिम नागरिकांच्या घरांभोवतालची डासोत्पत्ती स्थळे नष्ट करण्यासाठी हाती घेतली आहे. नागरिकांनी आपापल्या घरी व घरा भोवतीच्या परिसरात "प्रत्येक रविवारी" स्वच्छता करून, पाण्याची डबकी नष्ट करावीत व कच-याची विल्हेवाट लावावी, असे आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने केले आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या काही दिवसांपासून डेंग्यूचे रुग्ण आढळत आहेत. शहरातील डेंग्यूची रुग्णसंख्या २३ वर पोहोचली आहे. त्यामुळे डेंग्यूचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी महापालिकेने विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक आठवड्यातील १ दिवस १ तास ही मोहिम नागरिकांच्या घरांभोवतालची डासोत्पत्ती स्थळे नष्ट करण्यासाठी हाती घेतली आहे. या मोहिमेत नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

डेंग्यू आजाराला रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग असणे अत्यावश्यक आहे. डेंग्यूला रोखणे हे महापालिकेचे उद्दिष्ट असून नागरीकांचा सहभाग वाढविण्यासाठी आणि आंतरविभागीय समन्वय राखण्यासाठी बीट डेंग्यू मोहिम उपयुक्त ठरणार आहे. नागरिकांचा सहभाग यामध्ये महत्वाचा असून डेंग्यूला रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत नागरिकांनी जागरूक असणे गरजेचे आहे. या मोहिमेअंतर्गत संपूर्ण आठवडाभर विविध क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शासकीय आणि खाजगी रुग्णालये येथे डास उत्पत्ती स्थळांची तपासणी करणे, पॅम्प्लेट वितरित करणे आणि मार्गदर्शक सूचनांच्या प्रसारासाठी बैठकांना उपस्थित राहणे याचा समावेश असेल. सरकारी आणि खाजगी कार्यालयांत देखील डास उत्पत्ती स्थळ तपासणी, जनजागृती, व्याख्याने आणि पॅम्फ्लेट वाटप याचा समावेश असेल. प्रार्थनेच्या वेळी शाळांमध्ये डेंग्यू जागरूकता व्हिडिओ किंवा ऑडिओ क्लिप प्ले केला जाईल.

#रा

## विठ्ठलाच्या भक्तीमय गीतात रसिक दंग

**पुणे :** सहजीवन गणेश मित्र मंडळ ट्रस्ट आणि सर्वोत्कर्ष ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठलाच्या भक्तीमय रचनांचा भजनरंग कार्यक्रम मोठ्या उत्साहात सहजीवन गणेश मित्र मंडळ ट्रस्ट गणेश मंदिर, सहकार नगर येथे पार पडला. कार्यक्रमाची सुरवात जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांनी रचलेल्या "सुदंर ते ध्यान" या अभंगावरती शिल्पा दातार यांनी नृत्य सादर करून झाली. या कार्यक्रमात विठ्ठल भक्तीवरती विविध अभंग, गवळण, भावगीते आणि भक्ती गीते सादर करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी उपस्थित राहिल्या होत्या. या कार्यक्रमात गायक राजेश दातार आणि गायिका जयश्री कुलकर्णी यांनी "येग येग विठाबाई, अमृतहूनी गोड, माझे माहेर पंढरी, अबीर गुलाल उधळीत रंग, भुलविले वेणू नादे, पायी माझ्या रुतला काटा, अशी गीते सादर केली. तर कार्यक्रमाचे वाद्यवृंदाची साथ विजय दास्ताने - तबला, जयंत साने - हार्मोनियम, चारुशिला गोसावी व्हायोलिन, विनय दास्ताने साईड रिदम यांनी केली. यावेळी भगवंत विठ्ठल आणि आवली यांच्यावर प्रहसन सादर करण्यात आले होते.कार्यक्रमाचे निवेदन मधुरा टापरे यांनी केले तर आभार नितीन पाटील यांनी मानले.




# कृतज्ञतेच्या भावनेतून वंचितांच्या कल्याणासाठी कार्यरत राहावे

## आरिफ मोहम्मद खान यांचे प्रतिपादन

### डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंडचे उद्घाटन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वारजे :** "ज्ञान, दान आणि बंधुभाव हा भारतीय संस्कृतीचा गाभा आहे. कृतज्ञतेच्या भावनेतून वंचित, दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत राहावे. सामाजिक सेवाकुंडच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, रोजगारनिर्मिती आणि पर्यावरण संरक्षणाचे काम होईल. हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून, वंचितांचे जीवनमान उंचावण्यासाठी पूरक ठरेल," असे प्रतिपादन केरळचे राज्यपाल महामहिम आरिफ मोहम्मद खान यांनी केले.

डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंडच्या उद्घाटनप्रसंगी आरिफ मोहम्मद खान बोलत होते. वारजे येथे झालेल्या या कार्यक्रमावेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिलकुमार गायकवाड, ग्लोबल स्ट्रॅटेजिक पॉलिसी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. अनंत भागवत, सेवाकुंडचे अध्यक्ष अश्वजीत गायकवाड, उपाध्यक्ष नंदकिशोर शहाडे, महासचिव अभिजित गायकवाड, खजिनदार रतनभाई चोईथानी, सचिव रमेश जाधव, विश्वस्त संजय कर्णिक, अनिल सोनपाठकी, अतुल भोसले, ॲड. महेंद्र दलालकर, महेश चौहान आदी उपस्थित होते.

आरिफ मोहम्मद खान म्हणाले, "ज्ञान ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे. मात्र, त्याचा प्रसार जितका व्हायला हवा होता, तसा झालेला नाही. आज ग्रामीण, आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात निरक्षरता आहे. आरोग्य व शिक्षणाच्या सोयीसुविधांचा अभाव आहे. अशावेळी सामाजिक भावनेतून काम करणाऱ्या संस्था पुढे येत असतील, तर या समस्या सुटण्यास मदत होईल. डॉ. अनिलकुमार गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांकडून हाती घेण्यात आलेला सेवाकुंड उपक्रम समाज परिवर्तनाच्या कार्यात महत्वाची भूमिका बजावेल."

> समाजातील वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे, गरजूना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, आदिवासी व ग्रामीण भागातील गरजूना सर्वतोपरी साहाय्य करण्यासह उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून देणे आदी उपक्रम सेवाकुंडच्या माध्यमातून हाती घेतले आहेत. गेल्या दोन वर्षांपासून सेवाकुंडचे कार्य सुरु आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार व पर्यावरण या चार क्षेत्रात येत्या काळात भरीव योगदान देण्याचा आमचा प्रयत्न आहे."
> — डॉ. अनिलकुमार गायकवाड

यावेळी राज्यपालांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. डॉ. अनंत भागवत यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. नयन जयप्रकाश यांनी सूत्रसंचालन केले.

# स्पेस एज्युकेशनचा शालेय स्तरावरील भारतातील प्रयोग

## 'नासा ट्रेनिंग प्रोग्राम' निवडीसाठी ऑक्टोबरमध्ये परीक्षा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अमेरिकेतील नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशनच्या (नासा) सहकार्याने हन्टस्वीले, अल्बामा येथे उभारलेल्या यूएस स्पेस अँड रॉकेट सेंटरमधील 'नासा'च्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी (नासा ट्रेनिंग प्रोग्राम) महाराष्ट्रात घेण्यात येणारी निवड चाचणी परीक्षा ऑक्टोबर २०२४ मध्ये होणार आहे. भारतामध्ये स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनच्या पुढाकारातून ही परीक्षा घेण्यात येणार आहे. इयत्ता ६ वी ते १० वीच्या मुलांना ही परीक्षा देता येईल या परीक्षेसाठी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत अर्ज करता येईल, अशी माहिती स्वान फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी दिली.

### खगोलशास्त्रात रुची निर्माण व्हावी

● आज संपूर्ण जग विकासाच्या वाटेवर आहे. माणूस पृथ्वीपुरताच मर्यादित न राहता अवकाशातही प्रवास करू लागला आहे. चंद्र, मंगळ हे ग्रह तर मानवाच्या अगदी ओळखीचे झाले आहेत. अंतराळासंबंधित प्रयोग, अभ्यास आणि संशोधन हे प्रत्येक देश स्वतःच्या पद्धतीने करत असतो. संबंधित संशोधनासाठी अनेक देशांनी स्वतःची अंतराळ संस्था (स्पेस एजन्सी) तयार केली आहे. जगातील १९५ देशांपैकी फक्त ७२ देशांकडे स्पेस एजन्सी आहेत. 'नासा' ही त्यापैकी सर्वांत सुप्रसिद्ध एजन्सी आहे. तीस वर्षांपूर्वी डॉ. वॉन ब्राऊन यांनी विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरच खगोलशास्त्रात रुची निर्माण व्हावी आणि या माध्यमातून प्रात्यक्षिक दाखवता यावीत, यासाठी यूएस स्पेस अँड रॉकेट सेंटर सुरु केले.

> स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनच्या वतीने भारतामध्ये पहिल्यांदाच ट्रेनिंग प्रोग्रामच्या निवडीसाठी महाराष्ट्रामध्ये सहावी ते १० वीच्या विद्यार्थ्यासाठी परिक्षा घेण्यात येत आहे. महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, कर्नाटक, तेलंगना, बिहार या राज्यात, तसेच भारताबाहेरील सार्क देशामधील नेपाळ, बांगलादेश, भूतान, श्रीलंका, मालदीव या देशामध्ये ही परीक्षा होणार आहे. प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका असेल. प्रामुख्याने गणित, विज्ञान, भूगोल, बुद्धिमापन यावर आधारित प्रश्नपत्रिका असेल. यामुळे विद्यार्थी चाकोरीबाहेर जाऊन विषयांचा अभ्यास करणार आहेत.
> — शशिकांत कांबळे

## पटसंख्येअभावी पालिकेच्या १० शाळांचे विलीनीकरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेच्या मराठी माध्यमांच्या पाच शाळा, इंग्रजी माध्यमांच्या दोन शाळा, तीन उर्दू माध्यम शाळा अशा एकूण १० शाळांची पटसंख्या १५० पेक्षा कमी आहे. त्यामुळे या दहा शाळांचे त्याच इमारतीत किंवा नजीकच्या इमारतीत विलीनीकरणाचा प्रस्ताव पालिका प्रशासनाने सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी ठेवला आहे. १० शाळांचे विलीनीकरण केल्यास एकूण ८ बालवाडी शिक्षिका, ८ बालवाडी सेविका, ८ शिपाई, १ रखवालदार यांचे अन्य शाळांवर बदलीने समायोजन करता येणार आहे. तसेच अतिरिक्त ठरलेले मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बदली करून समायोजन केले जाणार आहे. पालिकेच्या प्राथमिक विभागाकडील शाळा एकाच इमारतीत पण सकाळी आणि दुपारच्या सत्रात भरत आहेत. या शाळामधील पटसंख्या कमी झाली आहे. शाळा व्यवस्थापनामध्ये अडचणी येत आहेत.

पटसंख्या कमी झाल्याने राज्यसरकारने मान्य केलेल्या संच मान्यतेमध्ये १ ते ८ वीच्या आठ तुकडयांना स्वतंत्रपणे आठ शिक्षक मान्य होत नाहीत. त्या ठिकाणी शिक्षकांना जोड वर्ग घ्यावे लागतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. पटसंख्या १५० पेक्षा कमी असल्याने त्यांना मुख्याध्यापक पद मान्य होत नाही.

### कुसुमवत्सल्य फाऊंडेशनकडून पदाधिकाऱ्यांची निवड

# जिथे कमी तिथे आम्ही माणुसकी संवर्धनाचा वसा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सामाजिक कार्य आणि अनेक समाजोपयोगी उपक्रमाच्या माध्यमातून नेहमी कार्यरत असणा-या कुसुमवत्सल्य फाऊंडेशन कडून संस्थेच्या चळवळ विस्तारासाठी पदाधिका-यांची निवड नुकतीच गुरूवारी फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा वैशाली पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. आत्मनिर्भर समाज बांधणीसाठी निराधारांना स्वावलंबी बनविण्यासाठी अनाथ, अपंग, गरजुवंत आणि मागासलेल्यांना आधार देऊन लोक प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य व सहभागातून कार्याला गती मिळेल याच साठी हि नियुक्ती आहे असे प्रतिपादन वैशाली पाटील यांनी केले. जनसंपर्क अधिकारी अंजली चव्हाण, कार्याध्यक्ष स्वाती हीरवे, मनिषा समर्थ, अर्चना कल्याणी, दीपक शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

आगामी उपक्रमाबद्दल चर्चा संस्थापक अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी केली चांदणी तांदळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## गर्भाशयमुखाचा कर्करोग व एचपीव्ही लसीकरण विषयावर मार्गदर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरूड :** गर्भाशयमुखाचा कर्करोग एचपीव्ही लसीकरण (Pune)आणि त्याबद्दलचे गैरसमज तसेच या कर्करोगामुळे कुटुंबावर आणि समाजावर होणारे परिणाम स्त्री व पुरुषांचे लैंगिक व प्रजनन आरोग्य आणि अधिकार तज्ञ मार्ग याबद्दल येत्या मंगळवारी (दि.२३) तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. परिषदेसाठी संस्थेच्या अध्यक्षा फ्रेणी तारापोर आणि उपाध्यक्ष गीतांजली देशपांडे उपस्थित होत्या.

हे मार्गदर्शन मंगळवारी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत कोथरुड येथील गोरान ग्रासकोफ फॅमिली क्लिनिक, वेद भवन शेजारी, कोथरुड चांदणी चौक येथे केले जाणार आहे फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या गोरान ग्रासकोफ फॅमिली क्लिनिक मार्फत उपाध्यक्ष गीतांजली देशपांडे यांनी संस्थेच्या कार्याविषयी व देण्यात येणाऱ्या सेवांविषयी माहिती दिली.

# 'जय जवान जय किसान'च्या नाऱ्याव्दारे शेतकरी आणि सैनिकांच्या मागण्या




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणेः**- आमदार आणि खासदारांचे निवृत्ती वेतन बंद करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या परिवाराला प्रति महिना पंचवीस हजार रूपये पेन्शन सुरू करावी, शेतमालावरील निर्यातबंदी रद्द करावी, शहीद जवानांच्या परिवाराला शासनाच्या नियमाप्रमाणे तात्काळ जमीन पट्टे वाटप करून त्यांच्या पाल्यांना शासकीय सेवांमध्ये सामाविष्ट करून घेण्यात यावे, यासह जवान आणि किसानांच्या विविध मागण्या आज 'जय जवान जय किसान'चा नारा देत भव्य मोर्चाव्दारे मांडण्यात आल्या.

भारतीय जवान किसान पार्टी आणि शेतकरी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांचे ज्येष्ठ नेते आणि शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील आणि भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी आत्महत्यांचा कलंक पुसण्यासाठी तसेच जवान आणि किसानांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आज भव्य जवान-किसान मोर्चा काढण्यात आला. राज्यभरातील शेतकरी, शेतकरी कार्यकर्ते, भारतीय जवान किसान पार्टी आणि शेतकरी संघटना भारतीय जवान किसान पार्टी आणि शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते, वीरपत्नी आणि जवानांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने ट्रॅक्टर आणि दुचाकी घेऊन या जवान-किसान मोर्चात सहभागी झाले होते. घोरपडी पेठेतील युध्द स्मारकाजवळ आंदोलक शेतकरी आणि सैनिकांची मुस्कटदाबी करून त्यांना सुरूवातीला अडविण्यात आले. पण चर्चेअंती घोरपडी पेठ, कँप, जिल्हाधिकारी कार्यालय, रेल्वे स्टेशनसमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा या मार्गे विधान येथे येऊन हा मोर्चा धडकला. यावेळी शेतकऱ्यांचे ज्येष्ठ नेते आणि शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील आणि भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे यांच्या नेतृत्वाखालील शिष्ट मंडळाने पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ चंद्रकांत पुलकुंडवार यांना मागण्यांचे निवेदन दिले.

### महाराष्ट्रात ४६ टक्के जीडब्ल्यूपी वाढीची नोंद

# दोन वर्षात दुप्पट बाजारपेठ मिळविण्याची अपेक्षा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपन्यांपैकी एक असलेली मणिपालसिग्ना हेल्थ इन्शुरन्स आरोग्य विमा वित्त पुरवठ्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संपूर्ण पश्चिम भारतात आपली उपस्थिती वाढवत आहे. आपल्या नाविन्यपूर्ण आरोग्य विमा उत्पादनाच्या माध्यमातून कंपनी नवीन ग्राहक वर्गापर्यंत पोहोचत आहे. भारताच्या पश्चिमेकडे राज्यांमध्ये कंपनीची झपाट्याने वाढ होताना दिसून येत असून वित्त वर्ष २०२३ - २४ मध्ये कंपनीच्या ग्रॉस रिटेन प्रीमियममध्ये (Gross Written Premium - जीडब्ल्यूपी) पश्चिम क्षेत्राचा ३५ टक्के वाटा आहे. आरोग्य विमा क्षेत्रातील तज्ञ असलेल्या मणिपालसिग्ना हेल्थ इन्शुरन्सने पश्चिम क्षेत्रात दमदार वाढ बघितली आहे. कंपनीने वित्त वर्ष २०२३- २४ मध्ये ५०० कोटी रुपयांचे ग्रॉस रिटेन प्रीमियम मिळवून ४६ टक्के वाढ साध्य केली आहे. या आरोग्य विमा कंपनीकडे १२,००० पेक्षा जास्त आरोग्य विमा सल्लागार असून आपल्या मजबूत अशा मल्टीचॅनेल वितरण जाळ्याच्या माध्यमातून ते संपूर्ण क्षेत्रात पसरले आहेत. या स्वतंत्र आरोग्य विमा कंपनीकडे महाराष्ट्रात १७०० पेक्षा अधिक रुग्णालयांचे जाळे आहे. राज्यात आपल्या विस्ताराचा एक भाग म्हणून पुढील बारा महिन्यात पिंपरी, सातारा, नागपूर आणि रत्नागिरी येथे नवीन शाखा कार्यालय उघडण्याची तसेच २५०० सल्लागार बाळगण्याची मणिपालसिग्ना हेल्थ इन्शुरन्सची योजना आहे.

### महापालिका क्षेत्रात आभा कार्ड नोंदणी वाढविण्याची गरज- डॉ. शेटे

# पालिका क्षेत्रात 'आयुष्मान भारत कार्ड'ची गरज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयुष्मान भारत-महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ गरजूंना मिळावा यासाठी दोन्ही महानगरपालिकांच्या क्षेत्रात आभा कार्ड नोंदणीचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. नागरिकांनीही या योजनेचा लाभ लक्षात घेऊन कार्ड काढण्यासाठी पुढे यावे, असे प्रतिपादन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले.

एकत्रित आयुष्मान भारत- महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय येथे खासदार मेधा कुलकर्णी, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ येमपल्ले, सहायक आयुक्त धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे निरीक्षक पी. एम. आंधळे आदी उपस्थित होते. डॉ. शेटे म्हणाले, पुणे जिल्ह्यात ६३ लाख ६१ हजार पात्र लाभार्थ्यांच्या तुलनेत १३ लाख १० हजार लाभार्थ्यांचे 'आभा (आयुष्मान भारत) कार्ड' तयार करण्यात आले आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी सर्व शिधा पुरवठा केंद्रे, सामान्य सुविधा केंद्रे (सीएससी), आपली सेवा केंद्रे, संग्राम केंद्रे आदी ठिकाणी शिबीरे आयोजित करावीत. आयुष्मान भारत ॲपवरही याची सुविधा असून त्याची माहिती नागरिकांना द्यावी, असेही ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले, राज्याची पूर्वीची महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि २०१८ पासून सुरू करण्यात आलेली केंद्र शासनाची आयुष्मान भारत योजना एकत्रित करुन राबविण्यात आली. २८ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व कुटुंबांसाठी 'एकत्रित आयुष्मान भारत- महात्मा फुले जन आरोग्य योजना' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून १ जुलै २०२४ पासून विस्तारीत व्याप्तीसह ही योजना राबविण्यात येत आहे. ही भारतातील रोख रक्कम विरहीत (कॅशलेस) मोठी योजना आहे. दीड लाख रुपयांवरुन ५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार यात कॅशलेस मिळतात.

> शहरात सर्वसामान्यांची नामांकित मोठ्या रुग्णालयांत उपचार मिळण्याची इच्छा असते, परंतु आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना ते शक्य होत नाही. त्यासाठी अशा रुग्णालयांना योजनेंतर्गत पॅनेलमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रशासनाने पाठपुरावा करावा. त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून सहयोग दिला जाईल. — मेधा कुलकर्णी, खासदार

> योजनेंतर्गत रुग्णावरील उपचारासाठी ठरवून देण्यात आलेल्या पॅकेजेसचे दर कमी असल्याने त्यात वाढ करण्याच्या रुग्णालयांच्या मागणीच्या अनुषंगाने १ जुलैपासून त्यामध्ये सरासरी २० टक्क्याहून अधिक वाढ करण्यात आली आहे. तसेच वेळेवेळी उपचाराचे पैसे चुकते केले जात असल्यामुळे रुग्णालयांनी रुग्णांना योजनेचा लाभ द्यावा. त्यांनी कॅशलेस काऊंटर सुरू करावेत, असे सांगून कामगिरीत कमी असलेल्या रुग्णालयांना आपली कामगिरी सुधारण्यासाठी काही वेळ दिला जाईल. तथापि, त्यानंतरही कामगिरी सुधारली नाही तर योजनेच्या पॅनेलमधून त्यांना वगळण्यात येईल. — डॉ. ओमप्रकाश शेटे, आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख

#रा

## जेजुरी देवसंस्थान : मुख्य कार्यकारी अधिकारी

# राजेंद्र जगताप यांचा सेवापूर्तीबद्दल सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्री खंडोबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणारे श्री मार्तंड देवसंस्थानचे मुख्यकार्यकारी अधिकारी राजेंद्र माणिकराव जगताप यांच्या प्रामाणिक व शिस्तबद्ध सेवे बद्दल देवसंस्थान,पुजारी सेवक वर्ग,ग्रामस्थ मंडळाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

जेजुरी येथील श्री मार्तंड देवसंस्थानचे मुख्यकार्यकारी अधिकारी राजेंद्र जगताप यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरव समारंभाचे आयोजन श्री खंडोबा मंदिरातील म्हाळसा बानाई अन्नसेवा कक्षामध्ये करण्यात आले होते. या वेळी देवसंस्थानचे विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे, डॉ. राजेंद्र खेडेकर, पोपट खोमणे, मंगेश घोणे, ॲड. विश्वास पानसे, पुजारी सेवक वर्ग,ग्रामस्थ मंडळाचे पुजारी,देवाचे मानकरी उपस्थित होते. श्री राजेंद्र जगताप यांचा देवाची पगडी, मानपत्र, शाल बुके देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.



जेजुरी देवसंस्थान चे मुख्यकार्यकारी आधकारी राजेंद्र जगताप यांचा सेवापूर्ती बद्दल देवसंस्थान च्या वतीने सत्कार करताना.

राजेंद्र जगताप हे बारामती तालुक्यातील मुरूम गावचे असून ते १९८५ साली सैन्य दलात रुजू झाले. त्यांनी कारगिल युद्ध ,राजस्थान बॉर्डर युद्ध लढले, ॲडिशनल डायरेक्टरेट जनरल ऑफ सिगनल्स, इंटेलिजन्स, आर्मी, हेडक्वार्टर, न्यु दिल्ली. डायरेक्टरेट जनरल ऑफ मिलीटरी इंटेलिजेन्स आर्मी हेडक्वार्टर, न्यू दिल्ली. देशातील बहुतेक सर्वच राज्यातील सैनिकांबरोबर सेवा केली. सैन्यदलातर्फे ५० वर्षे स्वतंत्र्य मेडल, कारगिल युद्धाच्या वेळी ओपी विजय मेडल, अशी पदके मिळालेली आहेत.

सैन्यदलातून निवृत्त झाल्यानंतर मुरूम गावामध्ये सामाजिक कार्यात सहभाग. त्यामध्ये ग्राम देवतांचे मंदीर व्यवस्थापन, मंदीरातील सणांचे व्यवस्थापन, ग्रामदेव यात्रेचा जमाखर्च ताळेबंद व्यवस्थापन, गावातील श्री. मल्लिकार्जुन मंदीर जिर्णोद्धार अशा विविध कामांमध्ये सहभाग घेतला होता.
सैन्यदलातील निवृत्तीनंतर महाराष्ट्रातील नाबार्ड पुरस्कृत पायलट प्रोजेक्ट, इंग्लिश व्हर्जन पॅकेज, मुरुम विविध कार्यकारी सोसायटी व यशवंत विविध कार्यकारी सोसायटी, होळ या सोसायट्यांमध्ये काम केले.

महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाच्या मार्तंड देवसंस्थानमध्ये ते मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर रुजू झाले. येथील विश्वस्त मंडळासोबत अन्नदान कक्ष, मारुती मंदीर जिर्णोद्धार, घोड्याची पागा, तसेच जेजुरीमध्ये नविन जागा खरेदी, तसेच विकास आराखडा मंजुरीकरीता लागणारा स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट ,वर्षभरात येणाऱ्या आठ यात्रा जत्रांचे शिस्तबध्द काम केले.नियोजन केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व्यवस्थापक सतीश घाडगे तर आभार नूतन व्यवस्थापक आशीष बाठे यांनी मानले.

## Selected



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लोहगाव विमानतळ येथे स्वागत

**लोहगांव :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लोहगाव आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले. त्यांच्या समवेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार होते. प्रशासनाच्यावतीने विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार व जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पुष्पगुच्छ देवून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पोलीस सह आयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त विजय कुमार मगर, हिंमत जाधव, विक्रांत देशमुख आदी उपस्थित होते.

# सासवडच्या कलासिद्धी नृत्यालयाच्या नृत्यांगनांनी सादर केला "अरंगेत्रम्"

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** जोग रागातील पुष्पांजली, कल्याणी रागातील अलारिपु व वर्णम् अरबी रागातील जतिस्वरम्, चारुकेशीतील पदम् या शिवाय अबीर गुलाल उधळीत रंग आणि खेळ मांडियेला या आणि या सारख्या बहारदार नृत्यश्रृंगार अर्थात् अरंगेत्रम या सादरीकरणाने उपस्थित नृत्यप्रेमींनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत कार्यक्रमाची रंगत वाढवली. सासवड येथील कलासिध्दी नृत्यालयाच्या वतीने वानवडी येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवनात आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. कलासिध्दी नृत्यालयाच्या संस्थापिका धनश्री लोमटे व त्यांचा सहकारी कल्याणी राजेंद्र जगताप यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

अरंगेत्रम या नृत्य प्रकारातील चेतना सुरेश बाबर, ओजस शंकरराव शिरोळे, डॉ प्रिती रमेश कुंभार, पल्वीवी निखिल धुळे, ईशा संजय आंधळे या उच्च शिक्षित नृत्यांगनांसह स्वतः धनश्री स्वानंद लोमटे व कल्याणी राजेंद्र जगताप यांनी सहभाग नोंदवत कार्यक्रम उंचीवर नेऊन ठेवला.

सिंधु बलराज यांचे गायन, दक्षिणामूर्ती यांचा मृदंग, संजय शशिधरण यांची बासरी, बालसुब्रमण्यम शर्मांचे व्हायोलिन

सेल्वी दक्षिणामुर्ती यांचे घटम् याच बरोबर मेधा अद्वैत यांचे सुरेख निवेदन व स्वानंद लोमटे यांनी केलेले आभार प्रदर्शन यामुळे कार्यक्रम लक्षवेधी ठरला.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर चे कुलगुरू डॉ डी टी शिर्के,पुण्याचे आयकर आयुक्त डॉ नितिन वाघमोडे, के जे कॉलेजच्या कार्यकारी संचालक हर्षदा जाधव, गरवारे कॉलेजचे प्राचार्य डॉ आर जी कुळकर्णी, कागल कॉलेजचे प्राचार्य डॉ प्रविण चौगुले या प्रमुख अतिथिंसह अनेक रसिक या कार्यक्रमास उपस्थित होते.

## नृत्याविष्कार

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**सासवड :** - जोग रागातील पुष्पांजली, कल्याणी रागातील अलारिपु व वर्णम् अरबी रागातील जतिस्वरम्, चारुकेशीतील पदम् या शिवाय अबीर गुलाल उधळीत रंग आणि खेळ मांडियेला या आणि या सारख्या बहारदार नृत्यश्रृंगार अर्थात् अरंगेत्रम् या सादरीकरणाने उपस्थित नृत्यप्रेमींनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत कार्यक्रमाची रंगत वाढवली.


## जाहीर नोटीस
### दौंड येथील मे. उपविभागीय अधिकारी, दौंड यांचे कोर्टात पिठासन अधिकारी श्री. मिनाज मुल्लासो

फौज / जन्म - मृत्यू / एसआर/७७/२०२४ अवेट क्र.

श्री. बाबासाहेब भालचंद्र कांबळे — अर्जदार
विरूध्द
कोणी नाही — जाब देणार

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील भालचंद्र कांबळे यांचा मृत्यू खाटीक गल्ली, दौंड, ता.दौंड, जि. पुणे येथे राहत्या घरी झाला असून, त्यांचे मृत्युची नोंद नगरपरिषद दौंड यांचे दप्तरी नसलेने सदर मृत्यू नोंद होणेबाबत परवानगी मिळणेसाठी व तसा मृत्यू दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांचे वडील भालचंद्र कांबळे यांचा मृत्यू दाखला मिळणेचा आदेश बाबत मागणी केलेली आहे.

तरी या जाहिर नोटीसीद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील नेमलेली दिनांक . रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांच्या आत स्वतः अगर वकिलांमार्फत लेखी हरकत मा. उपविभागीय अधिकारी, दौंड यांचेकडे किंवा मा. मंडल अधिकारी, दौंड यांचेकडे नोंदवावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरहू अर्जदार यांना त्यांचे अर्जदार यांचे वडील भालचंद्र कांबळे यांचा मृत्यूचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस असे.

ही जाहीर नोटीस असे.
दौंड.
दिनांक : १७/०७/२०२४
शिक्का

ॲड. अरविंद धोत्रे
बी. कॉम. एलएलबी
कोर्ट, दौंड, ता. दौंड, (पुणे)
मो.नं. ९७६६००५४३०



## PUBLIC NOTICE

Notice is nearby given that share certificate no.49, Distinctive Nos from 481 to 490 of **Paradiso Co-Operative Housing Society Limited,** Survey no. 240/2. Hissa no.2 Behind Datta mandir, Wakad, Pune 411057. In the name of **Gadre Mrunmayi Prakash** have been reported lost / misplaced and an application has been made to the society for issue of duplicate share certificate. The society hereby invites claims or objections (in writing) for issuance of duplicate share certificate **within the period of 15 days** from the publication of this notice. In no claim / objections are received during this period the society shall be free to issue duplicate share certificate.

**Place : - Pune**
**Dated : - 20/07/2024**

**For & On Behalf of Paradiso Co-Op Housing Society Ltd**
**(Hon. Chairman)**


# गौणखनिज विना परवाना प्रकरणी दंडात्मक कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगांव गणपती :** भांबर्डे ता. शिरुर जि. पुणे येथील सिध्दीविनायक पोल्ट्री बिंडींग फार्म ॲन्ड हॅचरिज या कंपनीचे संचालक अजय विनायक देशपांडे यांनी भांबर्डे ते रांजणगाव गणपती प्रजिमा ५२ या रस्त्यावरती अनाधिकृतपणे मुरुम टाकला होता. सदर २३५ ब्रास मुरुम हे गौणखनिज विना परवाना वापरल्यामुळे स्वामित्वधन व दंडात्मक रक्कम १७,०५,०३० रुपये १५ दिवसात शासकिय कोषागारात भरण्याचा आदेश तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी दिला असल्याची माहिती तक्रार कर्ते सरपंच संदीप रोडे यांनी दिली. आहे.

जर यात कसूर केला तर सदरची रक्कम जमीन महसुलाची थकबाकी समजून सक्तीच्या मार्गाने वसुल करण्यात येईल असे ही महसूल विभागाने दिलेल्या पत्रात म्हटले आहे. सिद्धी विनायक पोल्ट्री बिडींग फार्म ॲन्ड हैरिज कंपनीचे संचालक अजय विनायकराव देशपांडे यांचे तर्फे ॲड. आर.डी. साठे यांनी लेखी म्हणणे सादर केलेले आहे. तसेच सदरच्या लेखी महणण्यासोबत त्यानी गौणखनिज खरेदी केलेबाबतच्या बिलांच्या पावत्यांची छायांकित प्रती सादर केलेल्या आहे. परतु वापरण्यात आलेले मुरुम गौणखनिज वाहतूक परवाना व गौणखनिज रॅायल्टीच्या पावत्या करणेत येत आहे.

# कलेचे मानधन राष्ट्रीय व सामाजिक सेवेसाठी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** जेजुरी वार्ताहर दिनांक १८ आषाढी वारी निमित्त संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सिने व नाट्य बाल कलावंत श्रीश व दर्श खेडेकर यांच्या कडून आपल्या कलेच्या मानधनातून वारकरी बांधवांची मोफत आरोग्य तपासणी ,मोफत औषोधपचार करण्यात आले. सोबतच वारीला जाणाऱ्या चालून थकलेल्या वारकऱ्यांचे तीळ तेलाने पायाचा मसाज करून पालखी सोहळ्यात सेवा अर्पण केली आहे.

संबंधित बालकलाकार दिव्यांग कल्याण व्यसनमुक्ती पर्यावरण व संस्कृती संवर्धन यासाठी काम करतात अशा सेवाभावी उपक्रमांना मदत करतात. श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट, श्री मार्तंड देवस्थान जेजुरी ताराचंद हॉस्पिटल यांनीही या उपक्रमाला हातभार लावला आहे. श्रीश व दर्श खेडेकर या दोघा बंधूंनी आपल्या अभिनयातून आलेले संपूर्ण मानधन पूरग्रस्त ,दिव्यांग कल्याण ,व्यसनमुक्ती , मुख्यमंत्री सहाय्यता निधी ,मंदिर तसेच वारकऱ्यांच्या सेवेसाठी दिले आहेत. सिने नाट्य बालकलाकार श्रीश आणि दर्श यांनी या आषाढी वारीच्या काळात जेजुरीच्या श्री खंडोबा मंदिरावर येणाऱ्या भाविकाला प्रसाद रुपी शिरा प्रसाद श्रींच्या चरणी अर्पण करून वारकऱ्यांची सेवा केली. मंदिरावर येणारा कोणताही वारकरी उपाशी जायला नको खंडोबाचे दर्शन आणि प्रसाद घेवून तृप्त व्हावा या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. बाल कलाकार श्रीश खेडेकर पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार नामांकन प्राप्त असून महाराष्ट्राचा बेस्ट एनसीसी कॅडेट आहे तसेच बालकलाकार दर्श हा आंतरराष्ट्रीय लघुपट चित्रपट महोत्सवातील सर्वोत्कृष्ट बालकलाकार म्हणून सन्मानित आहे.

दोन्ही बालकलाकारांनी आजपर्यंत अभिनयातून मिळवलेले मानधन जवळपास साडेचार लाख रुपये सामाजिक,राष्ट्रीय कार्यासाठी दिले आहेत. तसेच रायगडाला जेव्हा जाग येते, वाघनख छावा जय भवानी जय शिवाजी , स्वराज्य जननी जिजामाता, घेतला वसा टाकू नको , रंग माझा वेगळा, हर हर महादेव, टिकल्या ग्रेट माय इंडिया, निर्वधी देव पावला आदी मालिकांमध्ये चित्रपटांमध्ये काम केलं आहे.

या दोघा बाल कलाकारांना त्यांचे वडील डॉ राजेंद्र खेडेकर तसेच आई मनीषा खेडेकर यांचेकडून या राष्ट्रीय व सामाजिक सेवेसाठी प्रोत्साहन मिळाले.

POSITIVE NEWS!

## लोणी-धामणी

### शिष्यवृत्ती प्रदान सोहळा संपन्न



# श्री दत्तगुरु शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिरकणी विद्यालय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणावळा :** आदर्शगाव गावडेवाडी (ता.आंबेगाव ) येथील श्री दत्तगुरु शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिरकणी विद्यालयात श्री व सौ.मंदाकिनी अंकुश गावडे सभागृहात या वर्षीच्या शिष्यवृत्ती प्रदान सोहळा संपन्न झाला.या प्रसंगी सन्माननीय अतिथी, सिएसआर विदेशी व्यवहार प्रमुख दीप्ती सिंग, सुश्री भुवनेश्वरी जयरामन यांनी लीला पुनावाला फौंडेशन पुणे चे कौतुक केले.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की माध्यमिक उच्च माध्यमिक आणि पदवी पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी गुणवत्ता आणि गरजेच्या आधारीत शिष्यवृत्तीच्या माध्यमातून शैक्षणिक दृष्ट्या उत्कृष्ट आणि आर्थिक दृष्ट्या मुलींना आधार देऊन भारतीय महिलांच्या सक्षमीकरणात योगदान देण्याचे लीला पुनावाला फौंडेशनचे ध्येय कौतुकास्पद आहे. श्रीमती लीला पूनावाला एक विपुल नेत्या, उत्तम वक्ता आणि एक अभूतपूर्व व्यक्ति आहे, लहानपणापासूनच त्यांनी जीवनातील चढ-उतार पाहिला आहे.त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले चौथा सर्वोच्च नागरी सन्मान, कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे मधून पदवी घेतलेल्या पहिल्या महिला यांत्रिक अभियंता,अल्फा लावल आणि टेट्रा पाक इंडियाच्या माजी सीएमडी, लीला पूनावाला फाउंडेशनच्या अध्यक्षा, किंवा आई म्हणून 16,000 मुली आहेत. २० मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी पाठिंबा देऊन लीला पूनावाला फाउंडेशने आपले कार्य सुरू केले. आणि त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही.आज त्याच्या फाउंडेशने २९ व्या वर्षात, १६०००/ पेक्षा जास्त मुलींना आधार दिला जात आहे.सर्वांसाठी शक्तीचा आधारस्तंभ आहे. फाउंडेशनचे संस्थापक विश्वस्त' समतुल्य फिरोज पूनावाला-धीटपणा आणि खंबीरपणाचा चेहरा. अतुलनीय पाठिंबा महत्वाचा आहे.त्यामुळेच हे अलौकिक कार्य होत आहे.या प्रसंगी लीला पुनावाला म्हणाल्या की महाराष्ट्रातील पुणे,वर्धा,अमरावती , नागपूर , तेलंगणातील हैदराबाद आणि कर्नाटक मधील बेंगलूर या भारतातील सहा शहरात काम करत आहो.या कार्यात पालकांची भूमिका महत्वाची आहे मुलींना शेवटपर्यंत शिक्षण द्यावे मधेच लग्न करून देऊ नये.

# श्री विठ्ठल मंदिरात अल्पहाराचे वाटप



**पुणे :** मौजे कुष्णूर येथे पुरातन श्री विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर आहे दर्शनासाठी गावातील व पंचक्रोशीतील भक्तांची गर्दी होते. या निमित्ताने भाविकासाठी नावंदे परिवारातर्फे अल्पउपहाराची व्यवस्था करण्यात आली होती ते सौ पूनम ताई राजेश पवार (महिला प्रदेश अधक्ष भाजपा) यांच्या हस्ते भाविकांना साबुदाणा खिचडी,पापडी चटणी व केळीचे वाटप करण्यात आले. सौ पुनम ताई पवार यांनी भजनी मंडळ सोबत चर्चा करून त्याना भजन संगीतासाठी टाळ मृदंग देण्याचे आश्वासन दिले. सदर कार्यक्रमास श्री किशोर नावंदे (सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक) श्री बालाजी नावंदे (माजी सैनिक)श्री अमोल नावंदे श्री गोविंद नावंदे तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक,सामाजिक व राजकीय कार्यकर्ते सन्माननीय ग्रामपंचायत सदस्य. सांप्रदायिक क्षेत्रातील भजनी मंडळी विशेष करून महिला भक्तांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सदर कार्यक्रम नावंदे परिवारातर्फे आयोजित करण्यात आला होता.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की माझे पती नितीन निवृती खुटवड यांचे दि. 22.5-2014 रोजी निधन झाले आहे. त्यांचे नावे प्रा.प. कार्यालय, पुणे येथे वाहन क्र. MH.12 Gf 0321 नोंद आहे. त्यांचे पश्चात वारसदार म्हणून मी त्यांची पत्नी शर्मीला नितीन याद्वारे असे कळविते की, उपरोक्त वाहन माझे नावे करण्याकरता अर्ज दिला असून खुटवड सोबत कोणाची तक्रार नसल्याचे हमीपत्र दिले आहे.

सबब या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्या कोणाची तक्रार अथवा हरकत असल्यास त्या संबंधीत व्यक्तीने प्रा. प. कार्यालय, पुणे येथे १५ दिवसांचे आत समक्ष अथवा लेखी कळवावे. अन्यथा ह्याबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाहन माझे नावे हस्तांतरीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही. कळावे.

पुणे दि.

पत्नी : शर्मीला नितीन खुटवड
पत्ता : १०६/९१. आसरा अपा
गुलटेकडी पुणे ४११०३७



## जाहीर नोटीस
### दौंड येथील मे.उपविभागीय अधिकारी, दौंड यांचे कोर्टात पिठासन अधिकारी श्री.मिनाज मुल्लासो

फौज/कावि/ ३०१/२०२४ अवेट क्र. १०४/२०२४

श्री. ज्ञानेश्वर अरूण जमदाडे — अर्जदार
विरूध्द
कोणी नाही — जाब देणार

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आजोबा ज्ञानदेव श्रीपती जमदाडे यांचा मृत्यू दिनांक १२/१२/१९९२ रोजी दौंड, ता. दौंड, जि. पुणे येथे राहत्या घरी झाला असून, त्यांचे मृत्यूची नोंद दौंड नगरपरिषद यांचे दप्तरी नसलेने सदर मृत्यू नोंद होणेबाबत परवानगी मिळणेसाठी व तसा मृत्यू दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांचे आजोबांचा मृत्यू दाखला मिळणेचा आदेश बाबत मागणी केलेली आहे.

तरी या जाहिर नोटीसीद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील नेमलेली दिनांक ०१/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत स्वतः अगर वकिलांमार्फत लेखी हरकत मा.उपविभागीय अधिकारी, दौंड यांचेकडे किंवा मा.मंडल अधिकारी, दौंड यांचेकडे नोंदवावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरहू अर्जदार यांना त्यांचे आजोबांच्या मृत्यूचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस असे.
दौंड.
दिनांक :- ३०/०६/२०२४
शिक्का

ॲड. राजेंद्र बोडखे
नोटरी (भारत सरकार)
प्रदिप प्लाझा, दौंड (पुणे)
मो.नं. ९४२२००६९७७ / ९०२८००६९७७



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली परिशिष्ट मध्ये नमूद केलेली सदनिका मिळकत ही श्रीमती ललिता वसंत सामक यांच्या मालकीची होती व आहे. सदर मिळकत श्रीमती ललिता वसंत सामक यांनी आमचे अशिल सौ. वीणा मकरंद सामक यांना मृत्यूपत्राद्वारे दिल्याचे सांगण्यात आले होते. सदर मृत्यूपत्र दि. ३०/४/२००२ रोजी 'नोटराईज' केल्याचे दिसत आहे. तसेच श्रीमती ललिता वसंत सामक या आमचे अशिलांच्या चूलत सासूबाई होत्या. श्रीमती ललिता वसंत सामक या दि. ११/१/२०२० रोजी पुणे येथे मृत्यू पावल्या आहेत. सदर सदनिकेवर आमचे अशिलांनी कोणत्याही प्रकारचा हक्क, ताबा, दावा, क्लेम, वारसहक्क, करार केलेला अथवा सांगितलेला नव्हता व नाही. त्यामुळेच सदर सदनिकेवर आमचे अशिल सौ. वीणा मकरंद सामक यांचा कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नव्हता व नाही. सदर सदनिका श्रीमती ललिता वसंत सामक यांनी मृत्यूपत्र केल्यानंतर विकल्याचे प्रस्तूत कागदपत्रांद्वारे निदर्शनास येते. तसेच सदर सदनिके संदर्भात मे. पुणे न्यायालयात दावा चालू असल्याचेही प्रस्तूत कागदपत्राद्वारे कळून येते. सदर विक्रीकरार, न्यायालयीन दावा अथवा भविष्यातील दावे, प्रतिदावे, अपिल, विक्रीकरार याच्याशी आमचे अशील सौ. वीणा मकरंद सामक यांचा कोणताही व कसल्याही प्रकारचा हितसंबंध नव्हता व नाही. त्यामुळे सदर सदनिकेसंदर्भात कोणतीही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास आमचे अशिलांना तसदी देवू नये, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, तालुका हवेली, में सब रजि. हवेली, जि. पुणे यांचे हद्दीतील आणि पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील गाव मौजे कोथरुड येथील स.न. ८१, हिस्सा नं. २/१ या मिळकतीवरील सिध्दार्थ अपार्टमेंट या इमारतीमधील तळमजल्यावरील निवासी सदनिका क्र.१ यांसी क्षेत्र ३०३.७५ चौ छूट यासी चतू:सीमा खालीलप्रमाणे :-

पूर्वस : सदनिका क्र. २ पश्चिमेस : मोकळी जागा
दक्षिणेस : ओढा उत्तरेस : नांगर यांचे घर

सर्व हक्कांसह दरोबस्त असे.

पुणे
दि. १९/७/२०२४

ॲड. स्वाती सिधये (मानसी साठ्ये)
फ्लॅट क्र. १६, तिसरा मजला, दौलत राज सोसायटी,
हिंगणे (खु), संतोष हॉल समोर. सिंहगड रोड. पुणे ५१
मो. नं. 8459848132

## ऑनलाईन पद्धतीने डिजिटल स्वाक्षरीत अर्जदाराला मिळणार

# ...आता घरबसल्या मिळणार "क" प्रत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** मोजणी झाल्यानंतर अर्जदारांना मोजणी नकाशाच्या "क' प्रती पुरविल्या जातात. या मोजणी नकाशाच्या "क' प्रतीमध्ये जागेवर प्रत्यक्ष मोजणी वेळी वहिवाटी अथवा ताब्याप्रमाणे अभिलेखाप्रमाणे येणाऱ्या हद्दी दर्शवून योग्य परिमाणात संबधित टिपा नमूद मोजणी नकाशाची "क' प्रत पुरविली जाते.



या प्रणालीनुसार जमीन मोजणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जमिन मोजणीचा नकाशा अर्थात "क' प्रत ही ऑनलाइन पद्धतीने डिजिटल स्वाक्षरीत अर्जदाराला मिळणार आहे.

भूमि अभिलेख विभागाकडून जमिनीची हद्दकायम, पोटहिस्सा, बिनशेती, कोर्टवाटप व कोर्टकमिशन व विविध प्रकल्पांसाठी भूमि संपादन आदींसाठी मोजणीचे काम केले जाते. "ई मोजणी 2.0 प्रणालीमध्ये जमीनधारक स्वत:च मोजणीसाठी ऑनलाइन अर्ज भरू शकतात. तसेच मोजणी फी सुद्धा ऑनलाइन भरण्याची सुविधा आहे.याचसह मोजणी अर्जाबाबतची प्रगती अर्जदाराला "एसएमएस'द्वारे कळणार आहे. याचसह जमीन मोजणीच्या नकाशाची प्रतही ऑनलाइन मिळत आहे. या प्रणालीचा वापर पुणे जिल्ह्यातील वेल्हा, बारामती, पुरंदर या तालुक्यांमध्ये सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती भूमि अभिलेख विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

जमीन मोजणीच्या प्रक्रियेमधील मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी भूमि अभिलेख विभागाने 'ई मोजणी 2.0 ही नवीन संगणक प्रणाली आणली आहे. यामध्ये प्रामुख्याने जमीन मोजणीचा अर्ज ज्या क्रमाने येणार, त्याच क्रमाने मोजणी केली जाणार आहे.

मोजणीवेळी उपस्थित असणारे भूकरमापक, लगतचे शेतकरी, जागामालक यांचे छायाचित्रही अपलोड करावे लागणार आहे. तसेच मोजणी नकाशावर अक्षांक्ष व रेखांशही (कोर्डिनेट्स) समाविष्ट असतील. या सर्व प्रक्रियेमुळे जमीन मोजणीमध्ये पारदर्शकता येणार असून वशिलेबाजीला लगाम बसणार आहे.

या संगणक प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येणारे मोजणी अर्ज जीआयएस आधारीत रोव्हर्सद्वारे मोजणी करण्यात येत आहे. त्यामुळे मोजणी नकाशामध्ये प्रत्येक हद्दीचे अक्षांश व रेखांश प्राप्त होत आहेत. त्यामुळे जमीन मोजणी प्रकरणांमध्ये लगतच्या धारकांचे हद्दीबाबत मोजणीवेळी मानवी चुकांमुळे होणारे लगत गटांमधे एकमेकांच्या हद्दी जाणे अथवा दोन मोजणीमुळे हद्दीमध्ये अंतर पडणे ययासारखे वाद, तक्रारी कमी होण्यास मदत होणार आहे.मोजणीसाठी ऑनलाइन अर्ज केला तरी, त्याची प्रिंट काढून उप अधीक्षक कार्यालयात जमा करावा लागते. त्यावेळी मोजणीसाठीची तारीख दिली जाते.

मोजणीसाठी बऱ्याच वेळा वशिलेबाजीने मोजणीची तारीख लवकर दिली जाते.त्यामुळे प्रामाणिकपणे मोजणीसाठी वाट पाहणाऱ्यांवर अन्याय होतो. या पार्श्वभूमीवर ई मोजणी 2.0 मध्ये "फिफो' अर्थात (फस्ट इन फस्ट आऊट ) प्रथम ये्रणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात येणार आहे.

# शिरूर तालुक्यातील शाळा डिजिटल करु - जयंत आसगावकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर:** शिरूर तालुक्यातील सर्व शाळा डिजिटल करुन शिरुर तालुक्यातील सर्व माध्यमांच्या सर्व प्रकारच्या शाळांचे तसेच शिक्षकांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती पुणे विभाग शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी दिली आहे.

विठ्ठलवाडी ता. शिरुर येथील श्री पांडुरंग विद्या मंदिर या ठिकाणी शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मुख्याध्यापक शिक्षक सहविचार सभेमध्ये बोलत होते, याप्रसंगी पुणे जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष निवृत्तीअण्णा गवारे, ज्येष्ठ नेते कांतीलाल गवारे, बाजार समितीचे संचालक राहुल गवारे, समता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र ढमढेरे, कृषी लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रवींद्र धनक, शिक्षक संघाचे प्रवक्ते दादासाहेब गवारे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तुकाराम बेनके, सचिव मारुती कदम, मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघ, बाळासाहेब चव्हाण, अशोक सरोदे, एकनाथ चव्हाण, रामनाथ इथापे, वसंत रणसिंग, राजाराम ढवळे, प्रविणकुमार जगताप, सुभाष देशमुख, प्रा. संदीप गवारे, शिक्षकेतर संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल गवारे यांसह आदी पदाधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. दरम्यान शिक्षण विभागाशी संबंधित संस्थांचे, शाळांचे, शिक्षकांचे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे, मुख्याध्यापकांचे अनेक प्रलंबित प्रश्न असून मुख्याध्यापक मान्यतेसाठी जाचक नवे नियम, जुनी पेन्शन, योजना टप्पा, अनुदान वेतनेतर अनुदान अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न, वैयक्तिक संच मान्यता, शालार्थ आयडी इत्यादी अनेक अडचणी व प्रश्न शिक्षकांनी मांडले. तर यावेळी बोलताना चालू शैक्षणिक वर्षात शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवले जातील असे सांगत गुणवत्ते सोबत अनेक उपक्रमांचे माहेरघर असलेले श्री पांडुरंग विद्यामंदिर हे खऱ्या अर्थाने संस्काराचे ज्ञान मंदिर असल्याचे देखील पुणे विभाग शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी म्हटले, यावेळी मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघ यांनी सर्वांचे आभार मानले.

## संवाद

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**विठ्ठलवाडी :** विठ्ठलवाडी ता. शिरुर येथे शिक्षकांशी संवाद साधताना पुणे विभागाचे शिक्षक आमदार प्रा. जयंत आसगावकर.

# मोकाट कुत्र्यांमुळे बेल्हेकर त्रस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर:** बेल्हे (ता.जुन्नर) येथील नागरिक मोकाट कुत्र्यांच्या सुळसुळाटाने त्रस्त झाले आहेत. रात्रभर भुंकणे अन् दिवसा वाहनाच्या मागे धावणे, पादचाऱ्यांवर गुरगुरण्यामुळे नागरिक हतबल झाले असून, ग्रामपंचायत प्रशासन आणि पशुवैद्यकीय विभागाने या कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

बेल्हे येथे मोकाट कुत्री हा एक गंभीरप्रश्न बनला आहे. दिवसेंदिवस या मोकाट कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. नागरिकांवर हल्ले करण्यापर्यंत मोकाट कुत्र्यांची मजल गेली आहे. शाळेत जाणारे विद्यार्थी, रस्त्यावरून जाणारे नागरिक, दुचाकीस्वार यांना कुत्र्यांकडून लक्ष केले जाते.

## नामदेव सदाशिव खेडकर यांचे निधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**रांजणगाव गणपती :** रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथील जुन्या पिढीतील प्रगतशील व प्रयोगशील शेतकरी नामदेव सदाशिव खेडकर (वय ८४) यांचे गुरूवारी (ता. १८) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रांजणगाव चे माजी आदर्श सरपंच भिमाजी खेडकर यांचे ते धाकटे बंधू होत. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# लोहगाव वाघोली पाणीपुरवठा योजनेचे झाले भूमिपूजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या लोकसंख्येने मोठया असणाऱ्या वाघोली व लोहगाव गावासाठी पिण्याची पाण्याची योजना लवकरात लवकर कार्यान्वित व्हावी यासाठी लोकप्रतिनिधी ग्रामस्थ व ग्रामपंचायतचे आजी-माजी पदाधिकारी यांच्याकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्याकडे पाठपुरावा सुरू होता.

राज्य शासनाने याची दखल घेऊन पुणे महानगरपालिकेला भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेत योजनेत समावेश करावा अशा सूचना शासनाने दिल्या होत्या. त्यानंतर पुणे महानगरपालिकेने लोहगाव वाघोली साठी पाण्याची पाण्याची योजना मंजूर करून त्यात २८३ कोटी नियोजित आराखडा केला होता.लोहगाव येथील गजानन मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लोहगाव वाघोली परिसरातील नागरिकांसाठी समान पाणीपुरवठा योजनेसाठी 230 कोटी रुपये मंजूर झाल्याने या योजनेचे भूमिपूजन 11 फेब्रुवारी 2024 रोजी सायंकाळी 5:30 च्या सुमारास झाले होते. हा कार्यक्रम आमदार सुनील टिंगरे यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रम पत्रिकेत शिरूर हवेलीचे आमदार अशोक पवार यांचे देखील नाव होते.

POSITIVE NEWS!

कोलवडी-साष्टेतील

महिलांचा प्रतिसाद



**उपसरपंच रमेश मदने यांच्या मोफत माझी लाडकी बहिण शिबिरात कोलवडी-साष्टेतील महिला अर्ज भरताना.**

# लाडकी बहिण,आधारकार्ड मोफत शिबिराचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** महाराष्ट्र शासनाने राबवविलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना व आधारकार्ड शिबिराचा कोलवडी-साष्टे गावातील महिला भगिनींनी लाभ घेण्याचे आवाहन ग्रामपंचायतीचे उपसरपंच रमेश मदने यांनी केले आहे.

कोलवडी-साष्टे परिसरातील महीलांसाठी माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज ग्रामपंचायतीचे उपसरपंच रमेश मदने यांच्या माध्यमातून मदने वस्तीतील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात राबविलेल्या शिबिरात मोफत भरून दिले जात आहेत. तसेच मोफत आधारकार्ड शिबीराचेही आयोजन मदने यांच्या वतीने करण्यात आले.यात नविन आधारकार्ड काढने,नाव,पत्ता,जन्मतारीख दुरूस्त करणे,मोबाईल नंबर लिंक करणे या सेवा दिल्या जात आहेत.तसेच



माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज भरणे शिबिर चालू असून शिबिराला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. या शिबिरात आत्तापर्यंत एकूण माझी लाडकी बहिण योजनेचे ७४ अर्ज दाखल केले असून कोलवडी-साष्टे परिसरातील सर्व महिला बघिनिंचे अर्ज दाखल करेपर्यंत हे शिबिर सुरू राहणार असल्याचे उपसरपंच रमेश मदने यांनी सांगितले.

## Selected



**निमगांव :** निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथे कुत्र्यांच्या तावडीतून जीवदान दिलेले कासव ताब्यात घेताना प्राणीमित्र.

## निमगाव म्हाळुंगीत कुत्र्यांच्या हल्ल्यातून कासवाला जीवदान

**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील काळेवस्ती येथे कुत्रे व कावळ्यांच्या हल्ल्यातून एका कासवाला जीवदान देण्यात नागरिकांना यश आले असून सदर कासव प्राणीमित्राच्या ताब्यात देण्यात आले आहे. निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील काळेवस्ती येथे काही कुत्रे व कावळे कशावरतरी हल्ला करत असल्याचे संतोष काळे यांना दिसले, दरम्यान संतोष काळे यांनी पाहणी केली असता त्यांना कासव दिसून आले, याबाबतची माहिती सरपंच बापूसाहेब काळे यांच्या माध्यमातून निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख यांना दिली असताना शेरखान शेख यांनी सदर ठिकाणी धाव घेत त्या कासवाला ताब्यात घेतले, यावेळी सरपंच बापूसाहेब काळे, संतोष काळे, माजी सैनिक अंकुश काळे, नामदेव भोरडे, दशरथ काळे हे उपस्थित होते, दरम्यान शेरखान शेख यांनी याबाबतची माहिती शिरुर वनविभाग वनपरीमंडल अधिकारी गौरी हिंगणे व नियतक्षेत्र अधिकारी प्रमोद पाटील यांना देत कासवाला निसर्गाच्या सानिध्यात मुक्त करण्यात आले आहे.



## रक्तदात्यांस पाच लाखांचा विमा

**वाल्हे :** पुरंदर तालुक्यातील शिवरी येथील स्वामीदास गणेशानंद महाराज यांच्या वाढदिवसा निमित्त गुरु पादुका मठात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले यामध्ये ५८ स्वामी भक्तांनी रक्तदान करून समाजाला नवा आर्दश दिला आहे.संपूर्ण महाराष्ट्रातील स्वामी भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या यमाई शिवरी येथील स्वामी समर्थ गुरुपादुका मठाचे सर्वेसर्वा स्वामिदास गणेशानंद महाराज यांच्या वाढदिवसा निमित्त सर्व सेवेकरी सेवाभावी मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन मठामध्ये करण्यात आले होते. यावेळी 58 अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## ज्येष्ठ नागरिकांनी काढली दिंडी



**पुणे :** शिक्रापूर ता. शिरुर येथील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राच्या वतीने नुकतेच आषाडी एकादशीच्या निमित्ताने ज्येष्ठ नागरिकांच्या दिंडीचे आयोजन करण्यात आलेले असताना शेकडो ज्येष्ठ नागरिकांनी यामध्ये सहभाग घेतल्याने गावातून निघालेल्या या आगळ्यावेगळ्या दिंडीमुळे गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. शिक्रापूर ता. शिरुर येथील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राच्या वतीने आषाडी एकादशीच्या निमित्ताने निघालेली ज्येष्ठ नागरिकांची दिंडी सटवाई मंदिरातून सुरु होऊन अनेकांनी डोक्यावर विठ्ठल रुख्मिणीची मूर्ती, तुळस, कलश, पताका घेऊन अनेकांनी पारंपारिक वेश परिधान करुन टाळ मृदुंगाच्या गजरात दिंडी संत तुकारामांचा जयघोष करत गावातील सर्व मंदिरांसमोरून जात गावामध्ये दिंडीचे रिंगण संपन्न झाले, दरम्यान अनेक ज्येष्ठ नागरिकांनी फुगड्या खेळत तसेच राधा करंजे या बालिकेने भक्ती गीतांवर नृत्य सादर करत ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले, त्यांनतर गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात या दिंडीचा समारोप करत सरावांना महाप्रसादाचे वाटप करत या ज्येष्ठ नागरिकांच्या दिंडीची सांगता करण्यात आली.

## विद्यार्थ्यांना घडविले मार्गदर्शन

# राजगुरू महाविद्यालयात करिअर संसदेची स्थापना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरु :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये करिअर कट्टा विभागांतर्गत जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून करिअर संसदेची स्थापन करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, करियर कट्टा तालुका समन्वयक डॉ. संजय शिंदे, महाविद्यालय समन्वयक डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते.



करिअर संसदेतील विद्यार्थ्यांना पद, जबाबदारी आणि कर्तव्याची शपथ देण्यात आली. यामध्ये दिव्या पिंगळे (मुख्यमंत्री), अथर्व चव्हाण (नियोजन मंत्री) रोहित राठोड (कायदे व शिस्तपालन मंत्री), प्रतीक्षा दौंडकर (सामान्य प्रशासन मंत्री), दिव्या दरेकर (माहिती व प्रसारण मंत्री), दिव्या जाधव (उद्योजकता विकास मंत्री) तनुजा पोटवडे (रोजगार व स्वयंरोजगार मंत्री), शिवानी गाडेकर (कौशल्य विकास मंत्री) सपना देठे (संसदीय कामकाज मंत्री) या विद्यार्थ्यांनी शपथ घेतली.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी करिअर कट्टा या उपक्रमाद्वारे उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांना कौशल्य विकास, स्वयंरोजगार, नोकरी, स्पर्धा परीक्षा व व्यवसायाच्या संधी यासारख्या विविध क्षेत्रात पदार्पण करण्यासाठी चालना मिळणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात डॉ. शिंदे यांनी करिअर संसदेमधील पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचा उपयोग विद्यार्थ्यांमध्ये करिअर व जीवनकौशल्यांबाबत जागृती निर्माण करण्यासाठी आणि त्यांना करिअर कट्टा उपक्रमांमध्ये अधिकाधिक सहभागी करून घेण्यासाठी करण्याचे आवाहन केले.

#रा

## विमानसेवा, बँका आणि अन्य कंपन्यांना फटका

# जगभरातील सर्व्हर डाऊन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** क्राउडस्ट्राईक ही सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील कंपनी डाऊन झाल्यामुळे जगभरातील विमानसेवा, बँका आणि अन्य कंपन्यांचे काम ठप्प झाले. भारतातील सेवांनाही त्याचा फटका बसला. क्राउडस्ट्राईक या सायबर सिक्युरिटी सेवेत आलेले नवे अपडेट जगभराला थांबवणारे ठरले.

माध्यमातील वृत्तानुसार, फटका बसलेल्या संगणकांना ब्लू स्क्रीन ऑफ डेथचा सामना करावा लागला. ज्यामुळे त्यांचे लॅपटॉप आणि पीसी रिस्टार्ट होत होते. मायक्रोसॉफ्टची क्लाऊड सेवा खंडित झाल्याने, दिल्ली आणि इतर शहरांतील विमानसेवा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली. प्रवाशांना चेक-इन, बोर्डिंगमध्ये दिरंगाईला सामोरे जावे लागले आणि अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली. या बिघाडामुळे अनेक विमान कंपन्यांवर विपरित परिणाम झाला.

एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, मायक्रोसॉफ्टच्या बिघाडामुळे एअरलाइन्सच्या यंत्रणेवर परिणाम झाला असून, प्रवाशांना लवकरात लवकर बाहेर काढण्यास आमचे प्राधान्य आहे. दिल्ली विमानतळावर विमान कंपन्यांनी प्रवाशांना हस्तलिखित बोर्डिंग पास दिले. बेंगळुरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील (केआयए) विमानसेवा विस्कळीत झाल्याने प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला आणि ते त्यांच्या उशीरझालेल्या विमानांची आतुरतेने वाट पाहत होते. विमानसेवा विस्कळीत झाल्याने केआयएच्या लाउंजमध्ये गर्दी झाली होती. देशभरात अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली.

स्टेट बँक ऑफ इंडिया, आयसीआयसीआय बँक, बँक ऑफ इंडिया आणि एचडीएफसी बँकेच्या ऑनलाइन सेवांमध्ये व्यत्यय आल्याच्या तक्रारी काही युजर्स करत आहेत.

मायक्रोसॉफ्ट ३६५, मायक्रोसॉफ्ट टीम आणि मायक्रोसॉफ्ट अॅज्युरसह अनेक मायक्रोसॉफ्ट ॲप्लिकेशन्सना या आउटेजचा फटका बसला. काही वापरकर्त्यांनी इन्स्टाग्राम, ॲमेझॉन आणि जीमेल वापरताना अडचणी आल्याचे नमूद केले. दरम्यान, नॅशनल स्टॉक एक्स्चेंजने मायक्रोसॉफ्ट प्रणालीच्या जागतिक बिघाडाचा आपल्यावर कोणताही परिणाम झालेला नाही, असे स्पष्ट केले.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

### फास्टॅग न लावल्यास दुप्पट टोल

**एनएचएआय**

**वाहनाच्या विंडस्क्रीनवर** फास्टॅग लावणे बंधनकारक असतानाही, अनेक वाहनचालक तो लावत नाहीत. असे प्रकार रोखण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अनेक उपाययोजना राबवल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून,



अशा वाहनांना दुप्पट टोल भरावा लागणार आहे. एनएचएआयने गुरुवारी जारी केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, फास्टॅग न लावणाऱ्या वाहनांकडून दुप्पट टोल आकारण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. ज्या वाहनांना आतून समोरच्या विंडशील्डवर फास्टॅग लावलेला नाही आणि ते टोल लेनमध्ये प्रवेश करतील, त्या वाहनांना दुप्पट टोल भरावा लागेल. विंडस्क्रीनवर जाणीवपूर्वक फास्टॅग न लावल्याने टोल नाक्यांवर अनावश्यक विलंब होतो, ज्यामुळे इतर वाहनांची गैरसोय होते. याबाबतची माहिती सर्व टोल नाक्यांवर ठळकपणे लावण्यात येणार असून, यामध्ये विंडशील्डवर फास्टॅग न लावता टोल लेनमध्ये प्रवेश केल्यास होणाऱ्या दंडाची माहिती नागरिकांना देण्यात येणार आहे. टोल नाक्यांवर वाहन नोंदणी क्रमांक (व्हीआरएन) असलेले सीसीटीव्ही फुटेज फास्टॅग नसलेल्या प्रकरणांमध्ये रेकॉर्ड केले जाईल. यामुळे आकारण्यात येणारे शुल्क आणि टोलनाक्यावर वाहनाची उपस्थिती याबाबत योग्य नोंदी ठेवण्यास मदत होणार आहे. तसेच अशा वाहनांना प्रसंगी ब्लॅक लिस्टही केले जाणार आहे.

## » Selected

### निर्देशांकात घसरण

**मुंबई** : जागतिक बाजारातील कमकुवत संकेत आणि अमेरिका-चीन व्यापार तणावाच्या भीतीमुळे शुक्रवारी भारतीय बाजारामध्ये घसरण झाली. शुक्रवारी सलग चौथ्या सत्रात विक्रमी उच्चांकी पातळी गाठल्यानंतर, शेअर निर्देशांकांत घसरण झाली. मेटल, ऑटो, फायनान्शियल सर्व्हिसेस आणि एनर्जी या क्षेत्रांमध्ये लक्षणीय घसरण दिसून आली. मायक्रोसॉफ्टच्या आउटेजमुळे कामकाजावर परिणाम झाल्याने ब्रोकरेज कंपन्यांचे समभाग घसरले. बेंचमार्क निर्देशांक सुरुवातीला ५२ अंकांनी वधारला पण लगेच विक्रीच्या दबावाला त्याला सामोरे जावे लागले. विक्रीचा दबाव वाढल्याने निर्देशांक घसरत राहिला आणि २६९ अंकांनी घसरून तो बंद झाला.

### मुस्लिम विवाह कायदे रद्द


**नवी दिल्ली** : आसाम सरकारने राज्य मुस्लिम विवाह आणि घटस्फोट नोंदणी कायदा, १९३५ रद्द केले असून हे दोन्ही कायदे आता आसाम रिपीलिंग बिल २०२४ द्वारे बदलले जातील, अशी



घोषणा आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सर्मा यांनी केली आहे. मुख्यमंत्री सर्मा म्हणाले की, राज्य सरकारने बालविवाहाविरूद्ध अतिरिक्त सुरक्षा उपाय करून राज्यातील भगिनींना न्याय मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. आसाम मंत्रिमंडळाच्या बैठकीत आसाम निरसन विधेयक २०२४ द्वारे आसाम मुस्लिम विवाह आणि घटस्फोट नोंदणी कायदा १९३५ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

# अंमली पदार्थांच्या पैशांचा सुरक्षेला धोका : अमित शाह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अंमली पदार्थांची तस्करी नार्को टेररशी जोडली गेली आहे. अंमली पदार्थांपासून मिळणारा पैसा हा देशाच्या सुरक्षेसाठी सर्वात गंभीर धोका बनला आहे. त्यामुळे तपास यंत्रणांचे उद्दिष्ट केवळ अंमली पदार्थ आणि व्यक्तींना पकडणे नसून संपूर्ण जाळे नष्ट करण्याचे उद्दिष्ट असावे, असे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी विज्ञान भवन येथे नार्को कोऑर्डिनेशन सेंटरच्या (एनकॉर्ड) च्या सातव्या उच्चस्तरीय बैठकीस संबोधित केले. यावेळी त्यांनी नॅशनल नार्कोटिक्स हेल्पलाइन 'मानस'चा प्रारंभ करून श्रीनगरमध्ये नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या झोन कार्यालयाचे उद्घाटन केले.

या बैठकीला संबोधित करताना गृहमंत्री म्हणाले की, अंमली पदार्थांचा सर्वात मोठा तोटा म्हणजे त्यामुळे भावी पिढी उध्वस्त होते. आता हा संपूर्ण व्यवसाय नार्को टेररशी जोडला गेला आहे आणि देशाच्या सुरक्षेला सर्वात गंभीर धोका अंमली पदार्थांच्या तस्करीमधून कमावलेला पैसा बनला आहे. अंमली पदार्थांच्या व्यापारामुळे आपली अर्थव्यवस्था पोकळ करण्यासाठी आर्थिक व्यवहारांचे मार्गही मजबूत झाले आहेत.

अशा अनेक संघटना तयार झाल्या आहेत ज्या केवळ औषधांची विक्रीच करत नाहीत, तर अवैध हवाला आणि करचोरीही करतात. अंमली पदार्थांची तस्करी हा आता बहुस्तरीय गुन्हा बनला आहे, ज्याचा कठोरपणे सामना केला पाहिजे, असेही केंद्रीय गृहमंत्र्यांनी यावेळी नमूद केले.

## उदयनिधी बनणार उपमुख्यमंत्री

**चेन्नई :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांचे चिरंजीव उदयनिधी स्टॅलिन उपमुख्यमंत्री होणार आहेत. ऑगस्टमध्ये ते हे पद स्वीकारण्याची शक्यता आहे.

द्रमुकच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उदयनिधी २२ ऑगस्टपूर्वी उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारण्याची शक्यता आहे. सीएम स्टॅलिन यांच्या अमेरिका दौऱ्यापूर्वी त्यांना उपमुख्यमंत्री केले जाण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री झाल्यानंतर उदयनिधी २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत अधिक महत्त्वाची भूमिका बजावण्यास सज्ज होतील.

गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये उदयनिधी यांनी एका कार्यक्रमात सनातन धर्माबाबत केलेले अवमानकारक व्यक्तव्य चर्चेत आले होते. सनातनचे उच्चाटन केले पाहिजे, असे वादग्रस्त विधान त्यांनी केले होते.

# झारखंडमध्ये काश्मीरसारखी परिस्थिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांची :** झारखंडमधील पाकुडमध्ये एका मुलीचा व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या आरोपीला मारहाण झाल्यानंतर, तेथे प्रचंड हिंसाचार उसळला. दगडफेक आणि तोडफोड करण्यात आली. या हल्ल्यानंतर हिंदूंना गाव सोडून जावे लागले, असा आरोप भाजपने केला आहे.

पाकुडमध्ये पोलिसांनाही लक्ष्य करण्यात आले. दगडफेकीत तीन पोलिस जखमी झाले, तर हिंदूंच्या घरांवर केलेल्या हल्ल्यांमुळे त्यांना जीव मुठीत घेऊन पळून जावे लागले, असा आरोप भाजपचे प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी आणि खासदार निशिकांत दुबे यांनी केला. झारखंडच्या संथाल परगण्यातील परिस्थिती काश्मीरसारखी झाली आहे, असेही ते म्हणाले आहेत.

हिंसाचारानंतर गावाचा व्हिडिओ शेअर करत खासदार निशिकांत दुबे म्हणाले की, झारखंडमध्ये काँग्रेसच्या राजवटीत पाकुडमधील तारानगर इलामी गाव निर्जन झाले आहे. एक मुस्लीम मुलगा अल्पवयीन मुलीचा व्हिडिओ बनवून तिला ब्लॅकमेल करत होता. या मुलाला विरोध केला, तेव्हा पश्चिम बंगालमधून बांगलादेशी घुसखोरांनी हिंदूंना गाव सोडण्यास भाग पाडले. झारखंड पोलीस हतबल झाले आहेत. संथाल परगणा काश्मीर खोरे होण्याच्या मार्गावर आहे, जिथे हिंदूंना त्यांच्याच देशात विस्थापित केले गेले, असा आरोप दुबे यांनी केला.

बाबूलाल मरांडी यांनी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यावर टीका केली आहे. घुसखोरांच्या दहशतीच्या आगीत संथाल परगणा भाग जळत असून, मुख्यमंत्री सोरेन दौऱ्यात व्यस्त आहेत. घुसखोरांच्या दहशतीमुळे संथाल परगण्यातील आदिवासी रहिवाशांना आता आपले घर सोडावे लागले आहे. झारखंडमधील परिस्थिती ९० च्या दशकातील काश्मीर सारखी बिकट होत चालली आहे, जिथे मुस्लिम तुष्टीकरणाच्या नावाखाली हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांकडे सरकारे डोळेझाक करीत आहेत, असे ते म्हणाले.

# पंतप्रधान मोदींचे स्नेह मिलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या केंद्रीय कार्यालयात जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर 'स्नेह मिलन' नावाची ही तिसरी बैठक होती. पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांनी पंतप्रधानांचे कार्यालयात स्वागत केले.

पंतप्रधानांचा कार्यकर्त्यांशी संवाद एक तासाहून अधिक काळ चालला. प्रसारमाध्यमांना याबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नव्हती.

पक्षाच्या सूत्रांनी सांगितले की, पंतप्रधानांनी लोकसभा निवडणुकीदरम्यान केलेल्या प्रयत्नांबद्दल कार्यकर्ते आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे आभार मानले आणि त्यांना 'राष्ट्र प्रथम' या भावनेसह, २०४७ 'विकसित-भारत'च्या प्राप्तीसाठी एकत्र येऊन पक्ष आणि देशाची सेवा सुरू ठेवण्यास सांगितले. भाजपला जनतेने दिलेला कौल हा पक्षाच्या विचारधारेवरील विश्वास आणि राष्ट्र उभारणीतील कामगिरीचे प्रतिबिंब आहे, असे मोदी कार्यकर्त्यांना संबोधित करताना म्हणाले. समर्पित कार्यकर्त्यांच्या मदतीने, पक्षाने दोन जागांवरून ३०३ पर्यंत मजल मारत, जगातील सर्वात मोठा पक्ष होण्याचे स्थान कसे मिळवले, याची आठवण त्यांनी करून दिली.

पक्षाचे आयटी प्रभारी अमित मालवीय यांनी म्हटले आहे की, पंतप्रधानांचा संवाद हा कार्यकर्त्यांसाठीचा भावनिक क्षण होता. पंतप्रधानांनी २०१४ पासून प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधला आहे.

## अमेरिकेला जाणारे विमान रशियात उतरले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्लीहून सॅन फ्रान्सिस्कोला जाणारे एअर इंडियाचे विमान तांत्रिक बिघाडामुळे रशियाच्या क्रास्नोयार्स्क आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवारी उतरवण्यात आले. विमान कंपनीने ही माहिती दिली. एअर इंडियाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टमध्ये याबाबतची माहिती दिली. माध्यमातील वृत्तानुसार, या विमानात २२५ प्रवासी होते. विमानात १९ क्रू सदस्य होते.

विमान पुन्हा सुरू होईपर्यंत प्रवाशांची काळजी घेतली जावी, यासाठी आम्ही संबंधित अधिकाऱ्यांशी जवळून काम करत आहोत, असे विमान कंपनीने म्हटले आहे. विशेष म्हणजे वर्षभरात एअर इंडियाचे विमान अशा प्रकारे रशियात उतरण्याची ही दुसरी वेळ आहे. गेल्या वर्षी जून महिन्यात एअर इंडियाचे बोईंग विमान तांत्रिक बिघाडामुळे एक दिवस अडकले होते.

## इस्रायल-गाझा बॉर्डर

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**इस्रायल :** युद्धबंदीचा ठराव अंतिम टप्प्यात असताना, गाझा पट्टी येथून काही इस्रायली सैनिक पुन्हा मायदेशात परतत आहेत.

## दुकानांवर नामफलक लावणे बंधनकारक

# योगींचा आक्रमक पवित्रा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** कावड यात्रेकरूंच्या श्रद्धेचे पावित्र्य राखण्यासाठी खानपानच्या दुकानांवर मालकाचे नाव लिहिणे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बंधनकारक केले आहे. त्याचवेळी हलाल प्रमाणपत्रासह उत्पादने विकणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. कावड यात्रा मार्गावर नावे लिहिण्याचा जिल्हा प्रशासनाच्या निर्णयावर टीका होत असताना, योगी आदित्यनाथ यांनी आक्रमकपणे हा निर्णय कायम ठेवला आहे.

कावड यात्रा मार्गावरील सर्व दुकानांच्या मालकांना दुकानाबाहेर त्यांचे पूर्ण नाव लिहिलेला फलक लावावा लागेल, असा आदेश मुझफ्फरनगर पोलिस प्रशासनाने जारी केला. या आदेशावरून उत्तर प्रदेशमध्ये राजकारण तापले. विरोधकांनी सरकारला घेरण्यास सुरुवात केली. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी यावर टीका केली होती. बसपा प्रमुख मायावती यांनीही हा आदेश मागे घेण्यात यावा, अशी मागणी केली होती. एमआयएमचे सर्वेसर्वा असदुद्दीन ओवेसी यांनीही यावर भाष्य केले होते.

योगी आदित्यनाथ यांनी मात्र हा आदेश कायम ठेवण्याचे आदेश देत, कावड यात्रेकरूंच्या श्रद्धेचा आदर राखला जाईल, असे स्पष्ट शब्दांत सांगितले. त्याचवेळी हलाल प्रमाणपत्रासह उत्पादने विकणाऱ्यांवर कारवाई करण्याचे त्यांनी निर्देश दिले आहेत.

पान १ वरून

### अंत्यविधीस गेलेल्यांना...

( वय ८०) यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती धोंडीभाऊ पिंगट हे जखमी झाले आहेत. ट्रक चालकाने पाच - सहा वाहनांना मागील बाजूने धडक दिल्याने या वाहनांचेही नुकसान झाले आहे. आळेफाटा पोलिसांनी ट्रक आणि ट्रकचालकाला ताब्यात घेतले असून आंदोलनकर्त्यांची समजूत घातली. ग्रामीण भागातदेखील हिट अँड रनच्या घटना मोठ्या प्रमाणात घडू लागल्याने हा चिंतेचा विषय बनला आहे. जि. प. सदस्य मोहित ढमाले व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सूरज वाजगे यांनी घटनेचा निषेध करून मृतांच्या कुटुंबीयांना न्याय देण्याची मागणी केली.


### तुतारी नव्हे ट्रम्पेट;...

उदयनराजे भोसले यांच्याकडून काही हजार मतांनी पराभव पत्करावा लागला. या ठिकाणी तुतारी चिन्ह घेतलेल्या उमेदवाराने शिंदे यांची मते खेचल्याचा निष्कर्ष काढण्यात आला होता. याशिवाय, अनेक जागांवर शरद पवार गटाला मिळू शकणारी आघाडी कमी झाली, असा युक्तिवाद करण्यात येत होता. बारामतीत एका अपक्ष उमेदवाराला निवडणूक आयोगाने तुतारी चिन्ह दिले होते. त्यास शरद पवार गटाने आक्षेप घेतला होता. दोन्ही चिन्हांच्या नावांमध्ये साधर्म्य आहे. त्यामुळे ट्रम्पेटला पर्यायी मराठी शब्द द्यावा, अशी मागणी करण्यात आली होती. त्यावर आता निवडणूक आयोगाने ट्रम्पेटचा उल्लेख मराठीत तुतारीऐवजी ट्रम्पेट असाच ठेवण्याला मान्यता दिली आहे.

## राज्यसभेत भाजपला घेरण्यात विरोधक ठरणार अयशस्वी

# दक्षिणेत काँग्रेसमुळे आघाडी अडचणीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** दक्षिणेत आपला विस्तार करण्यासाठी काँग्रेसने जे आक्रमक धोरण आखले आहे, त्याला विरोध करण्यासाठी बीआरएस आणि वायएसआर काँग्रेस इंडिया आघाडीत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. विशेषतः तेलंगणा, आंध्र प्रदेशमध्ये काँग्रेस आपला विस्तार करत आहे. मात्र, राज्यसभेत भाजपचे संख्याबळ कमी असूनही सत्ताधारी रालोआला रोखण्यात विरोधकांना अपयश येणार आहे.

राज्यसभेत बिगर एनडीए पक्षांनी भाजपविरोधात कोणतेही ठोस धोरण आखलेले नाही. म्हणूनच, केंद्र सरकारला रोखण्यात विरोधक अपयशी ठरणार आहेत. भाजपचे संख्याबळ ८६ असून, रालोआचा संख्याबळ १०१ इतके आहे. इंडिया आघाडीचे एकूण ८७ खासदार असून, त्यात काँग्रेसचे २६, टीएमसीचे १३ आणि द्रमुक, आम आदमीचे प्रत्येकी १० खासदार आहेत. केंद्र सरकारला रोखण्यासाठी हे बळ कमी आहे. अशा परिस्थितीत बिगर एनडीए पक्षांची भूमिका महत्त्वाची ठरते.

बिजू जनता दल (बीजेडी), वायएसआर काँग्रेस आणि भारत राष्ट्र समितीच्या (बीआरएस) २५ खासदारांवर इंडिया आघाडीची नजर आहे. राज्यसभेत हे तिन्ही पक्ष सरकारच्या विरोधात उभे राहिले, तर सरकारच्या अडचणी वाढू शकतात, पण तेलंगणात काँग्रेस सरकारमध्ये आहे आणि बीआरएस हा प्रमुख विरोधी पक्ष आहे. अशा परिस्थितीत बीआरएसला काँग्रेसच्या पाठीशी उभे राहणार नाही.

आंध्र प्रदेशात वायएसआर काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री जगन रेड्डी यांच्याविरोधातही काँग्रेस आक्रमक आहे. काँग्रेसने शर्मिला रेड्डी यांच्याकडे राज्याची जबाबदारी सोपवली आहे. शर्मिला ही जगन यांची बहीण असून, रेड्डी कुटुंबीय आणि दोन्ही पक्षांचे संबंध चांगले नाहीत. त्यामुळेच, बीआरएस आणि वायएसआर काँग्रेस हे दोन्ही पक्ष काँग्रेसच्या पाठीशी उभे राहू इच्छित नाहीत.

तेलंगणा आणि आंध्रमध्ये काँग्रेसच्या आक्रमकतेमुळे बीआरएस आणि वायएसआर काँग्रेस 'इंडिया आघाडी'मध्ये सामील होणार नाहीत, असे विश्लेषकांचे मत आहे.

#रा

## गंभीर विरुद्ध विराट राडा!

गौतम व विराट हे दोघंही दिल्लीचे आहेत आणि त्यामुळे क्रिकेटच्या मैदानावरील आक्रमकता ही त्यांच्या अंगी उपजतच आहे. आयपीएल २०२३ मध्ये लखनौ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातल्या लढतीत विराट व गौतम यांच्यात शाब्दिक राडा झाला होता. त्यानंतर दोघांवर बीसीसीआयने दंडात्मक कारवाईही केली होती. पण, आयपीएल २०२४ मध्ये दोघांमधील विस्तव विझल्याचे चित्रही दिसले होते. इंडियन प्रीमिअर लीगमध्ये दोन वेगवेगळ्या फ्रँचायझीकडून खेळणाऱ्या विराट व गौतम यांच्यात किती मोठं भांडण झालेलं, हे सर्वांनी पाहिलं. आता त्याच गौतमचं टीम इंडियाकडून खेळताना विराटला ऐकावं लागणार आहे. क्रिकबजने दिलेल्या वृत्तानुसार विराटाने गौतमसोबत काम करण्यास कोणतीच अडचण नसल्याचे बीसीसीआयला कळवले आहे. गौतमसोबतच्या पूर्वीच्या वादाचा टीम इंडियाकडून खेळताना व्यावसायिक कामात कोणताच अडथळा येणार नाही.

### स्वच्छंद'च्या गिर्यारोहकांची 'माऊंट पोलोगोंगका'

# शिखरावर यशस्वी चढाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** 'स्वच्छंद अॅडव्हेंचर फाऊंडेशन'च्या ४ गिर्यारोहकांनी ९ जुलै रोजी सकाळी १० वाजून ५ मिनिटांनी लडाखमधील 'माऊंट पोलोगोंगका' या ६,४०५ मीटर उंचीच्या शिखरावर यशस्वीरीत्या चढाई करत शिखरमाथा गाठला.

माऊंट पोलोगोंगका हे लेह-लडाख प्रांतातील त्सोकर तलावाजवळील ६,४०५ मीटर उंचीचे हिमाच्छादित शिखर आहे. त्सोकर व चुमाथांग या दोन खोऱ्यांमधील डोंगररांगेतील माऊंट पोलोगोंगका हे सर्वोच्च शिखर असून यावरील चढाई मार्गाची अत्यंत अल्प माहिती उपलब्ध आहे.

'स्वच्छंद अॅडव्हेंचर फाऊंडेशन'तर्फे या शिखर चढाईची मोहीम चार महिन्यांपुर्वीच निश्चित करण्यात आली होती. २३ जून रोजी डॉ मिलिंद ढमढेरे व डॉ सुमित मांदळे यांच्या हस्ते मोहिमेचा फ्लॅग ऑफ झाला आणि २९ जून रोजी स्वच्छंद चा ७ गिर्यारोहकांचा संघ पुण्याहून रवाना झाला होता. मनालीच्या पुढे लाहौल भागातील किलॉंग येथे अतिऊंचीवरील वातावरणाशी मिळतं-जुळतं होण्यासाठी संघाने दोन दिवस बिलिंग नाला व शशुर गोंपा या ठिकाणी क्रमशः ७५० मीटर व ३६५ मीटर चढाई केली. तिथून पुढे ५ जुलै ला त्सोकर तलावापासून १२ किलोमीटर अंतरावर असणा-या माऊंट पॉलोगोंगका शिखराच्या पायथ्याशी ४,९०० मीटर उंचीवर संघाने बेस कॅम्प प्रस्थापित केला.

७ जुलै रोजी संपूर्ण संघाने ५,४०७ मीटर उंचीवरील कॅम्प १ गाठला. त्यापुढे ५,९०० मीटर उंचीवर समीट कॅम्प लावायचा संघाचा मानस होता परंतु यंदा या भागात नेहमीपेक्षा कमी बर्फवृष्टी झाल्यामुळे प्रस्तावित समीट कॅम्पच्या ठिकाणी पाण्याच्या आभावाची समस्या निर्माण झाली होती. समीट कॅम्प साठी दुसरी कुठलीच योग्य जागा न मिळाल्यामुळे संघाने कॅम्प १ वरून १,००० मीटरची चढाई करून थेट शिखरमाथा गाठण्याचा निर्णय घेतला. यामुळे ही चढाई अधिक आव्हानात्मक झाली.

९ जुलै रोजी पहाटे १:३० वाजता हाडं गोठवणाऱ्या थंडीत संघाने या खडतर चढाईला सुरुवात केली. शिखरमाथ्याजवळील १५० फुटांची एक अवघड हिमभिंत चढून गेल्यानंतर पुढे आणखीन दोन उंचवटे पार करत गाईड स्तांझिन, फुनसुख व नवांग यांच्या मदतीने तृप्ती जोशी, केदार नरवाडकर, चैतन्य सहस्रबुद्धे व अनिकेत कुलकर्णी यांनी सकाळी १० वाजून ५ मिनिटांनी ६,४०५ मीटर उंचीवरील माऊंट पॉलोगोंगका शिखराचा सर्वोच्च माथा गाठून तिरंगा फडकावला. तसेच संघातील अन्य सदस्य जितेन्द्र बंकापुरे, संदीप पाटील व क्षितिज तारकर यांनी प्रयत्नांची शर्थ करत ६,२२५ मीटरपर्यंत मजल मारली. १३ तासांच्या अथक परिश्रमांनंतर दुपारी २:३० वाजता संघ सुखरूपपणे कॅम्प १ ला पोहोचला. १० जुलै ला बेस कॅम्प गाठून पुढे संघ लेह मध्ये परतला. या मोहिमेला लेह मधील'चो एक्सपिडीशन्स' या संस्थेने तांत्रिक साहाय्य केले.

"आयुष्यातली पहिली मोहीम असूनही कुठेही हार न मानता ६,२२५ मीटरपर्यन्त मजल मारू शकलो ही निश्चितच माझ्यासाठी कौतुकाची बाब आहे", असे मनोगत जितेन्द्र बंकपुरे यांनी व्यक्त केले. तर प्रथमच ६००० मीटरहून अधिक उंचीचे शिखर यशस्वीरीत्या सर करण्याचा आनंद अवर्णनीय आहे असे संघातील सर्वांत वरिष्ठ सदस्य चैतन्य सहस्रबुद्धे यांनी सांगितले. १९ वर्षांचा क्षितिज तारकर मोहिमेतील सर्वात तरुण सदस्य ठरला.



## ऑलिम्पिक गाजवून भेट द्यायचीय! ज्योतीची भावनिक गोष्ट

**नवी दिल्ली :** ज्योती यराजी पॅरिस ऑलिंपिकमध्ये हर्डल्स शर्यतीत प्रत्येक हर्डल्स पार करीत असताना ती एकप्रकारे तिच्या आईने तिला घडविण्यासाठी केलेला संघर्ष मागे टाकत जाईल. ज्योतीला घडविण्यासाठी तिची आई विशाखापट्टणमच्या रुग्णालयात मोलकरीण व साफसफाई कर्मचारी म्हणून दोन पाळ्यात काम करते. पॅरिसमध्ये १०० मीटर हर्डल्सच्या प्राथमिक फेरीत ज्यावेळी ज्योती स्टार्टिंग ब्लॉकवर पाय ठेवेल, त्यावेळी तिच्या आईचा सकारात्मक दृष्टिकोन तिच्यासोबत असेल. जागतिक रँकिंगच्या माध्यमातून पॅरिस ऑलिंपिकसाठी पात्र ठरलेली ज्योती ऑलिंपिक १०० मीटर हर्डल्स शर्यतीत भाग घेणारी पहिली भारतीय होय. 'आधी मी माझ्या घरची परिस्थिती, वैयक्तिक जीवन आणि परिवारामुळे खूप विचार व चिंता करायची', असे ज्योती म्हणाली. 'माझी परिस्थिती कधी-कधी खूप वाईट असते. कारण माझी आई म्हणते, आपण वर्तमान, भूतकाळ व भविष्यकाळ थांबवू शकत नाही, त्यामुळे पुढे चालत राहा. तू फक्त तुझ्यासाठी मेहनत करीत राहा, जो निकाल येईल, तो स्वीकार करायचा. माझी आई मला कधीही स्पर्धेच्या आधी सुवर्णपदक किंवा पदक जिंक असे म्हणत नाही. तिचे म्हणणे एवढेच असते की, तंदुरुस्त राहा, जे काही करशील, त्याबद्दल आनंदी व समाधानी राहा. त्यामुळेच मी सकारात्मक मानसिकतेने पुढे जात असते', असे ज्योतीने सांगितले. 'सकारात्मक मानसिकतेने आपण भूत आणि भविष्यकाळाचा फारसा विचार न करता आपण आपले वर्तमान उंचावू शकतो, असेही ती मला म्हणते', असेही ज्योतीने सांगितले. पूर्वी माझ्यासोबत फार काही चांगली टीम नव्हती. आता बरेच लोक आहेत, ज्यांच्यामुळे मला फायदा होतो. विशेषतः प्रशिक्षक जेम्स हिलर यांच्यामुळे मला खूप फायदा झाल्याचे तिने सांगितले. ज्योतीच्या नावावर १२.७८ सेकंदाचा राष्ट्रीय विक्रम असून ऑलिंपिकमध्ये पदार्पण करताना दबाव राहणार असल्याचे तिने मान्य केले.

### विविध वयोगट रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत

# विहान शहा, आरव काळे, मीत लाढे, शाश्वत यांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** जेकेज एक्सलंस चेस अकादमी व कल्याण तालुका बुद्धिबळ संस्था यांच्या वतीने आयोजित पहिल्या विविध वयोगटातील रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत विहान शहा, आरव काळे, मीत लाढे, शाश्वत गुप्ता यांनी आपापल्या गटात अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले. तर, खुल्या ब्लिटज स्पर्धेत प्रथमेश शेरलाने विजेतेपद पटकावले.

त्रिबेका हायस्ट्रीट, एनआयबीएम पोस्ट ऑफिस रोड, कोंढवा या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत ब मध्ये ९ वर्षाखालील गटात पाचव्या फेरीत विहान शहाने अर्जुन कौलगुड चा पराभव करून ४.५ गुणांसह अव्वल क्रमांक पटकावला. ११ वर्षाखालील गटात पाचव्या फेरीत मीत लाढेने वेदांत काळेला पराभुत करून ५ गुणांसह विजेतेपद पटकावले.

१३ वर्षाखालील गटात आरव काळेने यश करियाचा पराभव करून ५ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. १५ वर्षाखालील गटात पाचव्या फेरीत शाश्वत गुप्ताने अन्वय माळीला नमवून ५ गुणांसह विजेतेपदाचा मान पटकावला. खुला ब्लिटज गटात सहाव्या फेरीत प्रथमेश शेरलाने अथर्व माडकरचा पराभव करून ५.५ गुणांसह विजेतेपदाला गवसणी घातली. स्पर्धेतील विजेत्यांना रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली.

## रॅपिड बुद्धीबळ स्पर्धेत ५८ खेळाडू सहभागी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बुद्धिबळ क्रीडा ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित व पुणे जिल्हा बुद्धीबळ सर्कल (पीडीसीसी)यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या दुसऱ्या फिशर रँडम(बुद्धिबळ९६०) रॅपिड बुद्धीबळ स्पर्धेत ५८ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा प्रभात रोड येथील सिम्बायोसिस स्पोर्ट्स सेंटर या ठिकाणी २१ जुलै २०२४ रोजी रंगणार आहे.

बुद्धिबळ क्रीडा ट्रस्टचे व्यवस्थापकीय विश्वस्त प्रकाश कुंटे यांनी सांगितले की, स्पर्धेत एकूण २१,००० रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच, ही स्पर्धा स्विस लीग पद्धतीने सात किंवा आठ फेऱ्यांमध्ये खेळविण्यात येणार आहे. हि स्पर्धा खुल्या गटात होणार आहे.

स्पर्धेत मानांकित खेळाडूंमध्ये आयएम अभिषेक केळकर(२१४३), प्रथमेश शेरला(१९६२), विकास शर्मा (१९५२), विरेश शरणार्थी(१८९८), ओम लामकाने (१८७३), अक्षज पाटील(१८६१), आर्यन सिंगला(१८४५), सौरभ म्हामने(१८३०), श्लोक शरणार्थी(१८२६) हे खेळाडू आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. आयए नितीन शेणवी चीफ आरबीटर , तर आयए विनिता क्षोत्री डेप्युटी चीफ आरबीटर म्हणून काम पाहणार आहेत. स्पर्धेचे उदघाटन ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांच्या हस्ते २१ जुलै २०२४ सकाळी ९ वाजता होणार असून पहिल्या फेरीस९.१५ वाजता प्रारंभ होणार आहे. याच दिवशी गुरुपौर्णिमेनिमित्त पुण्यातील बुद्धिबळ प्रशिक्षक श्री.केतन खैरे व श्री. अभिजित जोशी यांना बुद्धिबळ क्रीडा ट्रस्ट द्वारा सन्मानित करण्यात येणार आहे.



## पत्नीच्या अपघाती मृत्यूनंतरही पूर्ण केले तिला दिलेलं वचन!

**नवी दिल्ली :** ही गोष्ट आहे, एका पतीची... जो वेटफिल्टर आहे आणि त्याने आपल्या पत्नीला ऑलिम्पिक गोल्ड देण्याचं वचन दिलं होतं.. पण, एका कार अपघातात तिचे निधन होते, पत्नीच्या निधानाने तो खचून गेला असता, परंतु तो हिमतीने उभा राहिला आणि पत्नीला दिलेलं वचन पूर्ण करताना गोल्डन कामगिरी केली. वेटलिफ्टर माथिआस स्टेइनर ( Weightlifter Matthias Steiner) याची ही गोष्ट... २५ ऑगस्ट १९८२ साली ऑस्ट्रीयाच्या व्हिएन्ना येथे माथिआसचा जन्म झाला. वेटलिफ्टिंग करण्याचे बाळकडू त्याला त्याच्या वडिलांकडून मिळाले. फ्राएड्रीच स्टेइनर यांनी २० वेळा IWF-Masters World Weightlifting Champion जिंकली होती आणि २००८ मध्ये IWF 2008 Hall of Fame Survey of Leading Master Lifters या यादीत ते अव्वल होते. वडिलांना पाहून १९९५मध्ये माथिआसने वेटलिफ्टिंगला सुरुवात केली. माथिआसला टाईप १ ची डायबिटीज होती आणि १८व्या वाढदिवसाला हे त्याला समजले. डायबिटीज असल्याचे समजण्यापूर्वी त्याच्या शरीरामध्ये तशी लक्षण दिसू लागली होती. पहिले लक्षण म्हणजे तीव्र तहान, त्यानंतर तीन महिन्यांत त्याची भूक कमी झाली आणि शरीराचे वजन ५ किलोग्रॅम कमी झाले. जेव्हा त्याची दृष्टी खराब झाली तेव्हा तो डॉक्टरांकडे गेला. पण, याही अडचणींवर मात करून तो वेटलिफ्टिंग करत राहिला.

# विद्यांचल, बॉलर हर्ट, डेक्कन जिमखाना विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धेत तेरा वर्षांखालील मुलीच्या गटात विद्यांचल, बॉलर हर्ट, डेक्कन जिमखाना या संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय प्राप्त करीत आगेकूच केली आहे.

डेक्कन जिमखाना क्लबच्या बास्केटबॉल कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत अनुषा सोनटक्के (१६ गुण) आणि मिहिका गदरेने (१४ गुण) केलेल्या सुरेख कामगिरीच्या जोरावर डेक्कन जिमखाना क्लबने विद्या व्हॅली संघावर ४५-१४ अशी ३१ गुणांनी सहज मात केली. मध्यतरांला डेक्कन जिमखाना संघाकडे २०-५ अशी पंधरा गुणांची मोठी आघाडी होती. विद्या व्हॅली संघाच्या आरना रायसिंघानीने (७ गुण) केलेली खेळी अपुरी ठरली.

दुसऱ्या लढतीत हेत्वी अमीन (१३ गुण), आर्या नांदेकरने (६ गुण) केलेल्या सुरेख कामगिरीच्या जोरावर विद्यांचल संघाने डी. पी. एस. संघावर २१-१२ असा नऊ गुणांनी विजय नोंदवला. मध्यतरांला विद्यांचलकडे ११-४ अशी सात गुणांची असलेली आघाडी उपयुक्त ठरली. पराभूत संघाच्या आशाना धारने (६ गुण) केलेली खेळी अपुरी ठरली.

बॉलर हर्ट संघाने ए. बी. सी. स्टार संघावर १२-४ असा आठ गुणांनी विजय नोंदवला मध्यतरांस त्यांनी ६-० अशी आघाडी घेतली होती. विजयी संघाकडून कायरा गौर व अनया मेहताने सुरेख खेळ केला.

श्रीया गुदगे (१५ गुण), समृद्धी धुमाळने (१२ गुण) केलेल्या सुरेख कामगिरीच्या जोरावर नहाटा संघाने सेंट मेरीज संघावर ४९-४६ असा तीन गुणांच्या फरकाने रोमहर्षक विजय नोंदवला. सेंट मेरीज संघाकडून अवंतिका आखियागावकर (२० गुण) आणि ईशल राठोडने (१५ गुण) केलेली खेळी अपुरी ठरली. या सामन्यात नहाटा संघाने मध्यतरांस मिळविलेली २३-२० अशी तीन गुणांची आघाडी उपयुक्त ठरली.

स्वरा बोरे व स्वरा साळवेने केलेल्या सुरेख खेळाच्या जोरावर चोंधे पाटील संघाने एस.पी.एम. संघाचा एकतर्फी लढतीत २२-० असा पराभव केला मध्यतरांस त्यांनी १४-० अशी आघाडी मिळवली होती.

इरा जाधव (११ गुण) आणि वाशीग्टंनसिंगने (१० गुण) केलेल्या सुरेख खेळाच्या जोरावर ग्राऊंडअप संघाने मिलेनियम संघाचा ३४-२८ असा सहा गुणांनी पराभव केला. मध्यतरांस मिलेनियमकडे १४-१३ अशी एक गुणांची आघाडी होती. त्यांच्या आरना सिंकर (९ गुण) व रक्षा जंगमने (६ गुण) केलेली खेळी अपुरी ठरली.

एबीसी हुस्टलर्स संघाने फाल्कन क्लबचा २८-२५ असा केवळ तीन गुणांना पराभव केला. मध्यतरांस १२-८ अशा चार गुणांची मिळविलेली आघार्ड उपयुक्त ठरली. त्यात महत्त्वाचा वाट सी. तनिष्का (८ गुण) व रवी लोंढे (७ गुण) केलेल्या सुरेख खेळाचा होता पराभूत संघाच्या लाहिका राजेश गुण) व व्ही. साक्षीने (७ गुण) केले खेळी अपुरी ठरलीपलीकडे हे

## एकटा वाघ जगाला भारी!

**नवी दिल्ली :** फ्रान्सचे पॅरिस शहर ऑलिम्पिक २०२४ साठी जगभरातील लोकांचे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. २६ जुलै रोजी या क्रीडा महोत्सवाची रंगतदार सुरुवात होईल, त्यानंतर २०६ सदस्य देशांतील हजारो खेळाडू ३२ खेळांमध्ये ३२९ सुवर्णपदकांसाठी स्पर्धा करतील. खेळांचा हा महाकुंभ ११ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. भारतातून ११७ खेळाडूंचा संघही सहभागी होणार आहे. ऑलिम्पिकमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूचे स्वप्न पदक जिंकण्याचे असते. पण सर्वच खेळाडू हे स्वप्न साकार करू शकत नाहीत. यावेळीही अॅथलेटिक्समध्ये पुरुषांच्या भालाफेकमध्ये नीरज चोप्रा, कुस्ती, बॉक्सिंग, वेट लिफ्टिंग, बॅडमिंटन आणि तिरंदाजीमध्येही भारतीय खेळाडूकडून देशाला सुवर्णपदकाची आशा आहे. पण ऑलिम्पिकच्या इतिहासात भारताची एकूण कामगिरी निराशाजनक राहिली आहे. भारताने १९०० मध्ये पहिल्यांदा ऑलिम्पिकमध्ये भाग घेतला होता, तेव्हापासून देशाने फक्त १० सुवर्णांसह केवळ ३५ पदके जिंकली आहेत. ज्यात फक्त पुरुष हॉकीमध्ये ८ सुवर्णपदकांचा समावेश आहे.

### ७१ व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा 'सतेज करंडक' स्पर्धा

# पालघर संघाचा सांगली संघावर ५८-२० असा दणदणीत पराभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बाणेर येथील बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यांच्या संयुक्तविद्यमाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, बाणेर, येथे सुरू असलेल्या ७१ व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा 'सतेज करंडक' स्पर्धेच्या चौथ्या दिवशी महिला विभागाच्या सायंकाळच्या सत्रात झालेल्या ड गटातील साखळी सामन्यात पालघर संघाने सांगली संघावर ५८-२० असा दणदणीत पराभव करीत आपल्या गटात विजय मिळविला. मध्यंतराला पालघर संघाकडे ३९-१० अशी आघाडी होती. पालघरच्या जुली मिस्कीता व मोक्षा पुजारी यांनी चौफेर हल्ला चढवित सांगली संघाला नमविले. पुजा पाटील व दिक्षा परब यांनी पकडी घेतल्या. सांगलीच्या रिया हिप्परकर व श्रध्दा माळी यांनी चांगला खेळ केला. तर प्रणाली जाधव हिने पकडी घेतल्या.



ड गटात झालेल्या दुसऱ्या साखळी सामन्यात परभणी संघाने नासिक ग्रामीण संघावर ५७-२९ असा पराभव करीत गटात विजय संपादन केला. मध्यंतराला परभणी संघाकडे २८-१३ अशी आघाडी होती. परभणीच्या निकिता लंगोट व नेहा राठोड यांनी जोरदार चढाया केल्या. तर दिशा चव्हाण हिने पकडी केल्या. नासिक ग्रामिणच्या निकिता कावडे हिने सुरेख खेळ केला. सायली खताले व रोशनी यादव यांनी सुरेख पकडी घेतल्या.

महिलांच्या फ गटात झालेल्या सामन्यात ठाणे शहर संघाने रायगड संघावर ३२-२९ असा विजय मिळविला. मध्यंतराला ठाणे शहर संघ १२-१८ असा पिछाडीवर होता. ठाणे शहर संघाच्या माधुरी गवंडी, प्राजक्ता पुजारी यांनी जोरदार आक्रमण करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. तेजश्री फाळके व पूजा जाधव यांनी पकडी घेतल्या. रायगडच्या रचना म्हात्रे व रश्मी पाटील यांनी चढाया केल्या. तर तेजा सपकाळ व सिध्दी नाखवा यांनी पकडी केल्या.

महिलांच्या इ गटात झालेल्या सामन्यात नांदेड संघाने नासिक शहर संघावर २७-२५ असा विजय मिळविला. मध्यंतराला नांदेड संघाकडे १६-९ अशी आघाडी होती. नांदेडच्या सानिका सुधाकर पाटील, सानिका दगडू पाटील यांनी आक्रमक खेळ केला. सानिया चौघुले व अनराधा जाधव यांनी पकडी घेतल्या. नासिक शहर संघाच्या ज्योती पवार व विदिशा सोनार यांनी चांगल्या चढाया केल्या. पौर्णिमा शिंदे, सुनंदा पवार यांनी पकडी केल्या.

महिलांच्या इ गटात मुंबई शहर पूर्व संघाने जळगाव संघावर ८८-१५ असा दणदणीत पराभव केला. मध्यंतराला शहर पूर्व संघाकडे ५६-९ अशी आघाडी होती. शहर पूर्व संघाच्या मेघा कदम, साक्षी सावंत यांनी आक्रमक खेळ केला. तर धनश्री पोटले हिने पकडी घेतल्या. जळगाव संघाच्या वैष्णवी पाटील, भाविका साईडणे यांनी चांगला खेळ केला. मुंबई उपनगर पूर्व संघाने धुळे संघावर ४१-३५ अशी मात केली.

#रा